# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००७

मूल्य रुपये दहा



हिमहीरक नगराज यशाचा
मानदंड उत्तुंग कृतीचा ।
पदचिन्हांकित करण्यासाठी
मज स्वातंत्र्य मिळाले हो !

# 'स्व'-रूपवर्धिनी

## कार्यवृत्त २००७

**संस्थेचे पदाधिकारी**

श्री. जयसिंहभाई मरिवाला

श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ

श्री. श्रीकांत सामळ

श्री. शिरीष पटवर्धन

**संपादक**

श्री. जयंत कवठेकर

**संपादकीय मंडळ**

सौ. बागेश्री पोंक्षे

श्री. सुनील कुलकर्णी

श्री. कृ. गो. लवळेकर

**दूरध्वनी संपर्क**

श्री. जयंत शंकर कवठेकर

संपर्क दूरध्वनी क्र. (घर) २४२२१२९४

(कार्यालय)२६१२१७०४, २६१३४३१०

किंमत रूपये ५/-

वार्षिक वर्गणी रूपये १००/-

(विशेषांकासह)

आजीव सभासद फी - रू.१०००/- फक्त

चेक अथवा ड्राफ्ट 'स्व'-रूपवर्धिनी या

नावाने काढावा.

## अंतरंग


- हृद्‌गत
- वार्षिक कार्यक्रम वृत्त
- विशेष लेख
- आर्थिक स्थिती व आवाहन



**छपाई**

प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२.

सर्व कायदेशीर बाबी पुणे कोर्टाच्या अखत्यारीत. हे मासिक 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष पटवर्धन, यांनी प्रबोध उद्योग, १२४८ शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे ११ येथे प्रसिद्ध केले.

वार्षिक विशेषांक — मुखपृष्ठ : श्री. अवधूत फडणीस, प्रा. श्री. राम डिंबळे

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

## सन्माननीय सभासद

✲ पद्मभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर ✲ श्री. प्रमोद चौधरी

### संस्थापक सदस्य

- श्री. पु. व. श्रॉफ
- श्री. श्री.शं. सामळ
- श्री. रा. प. देसाई
- श्री. कां. गि. शहा
- श्री. कृ. गो. लवळेकर
- श्री. वा. दे. संचेती
- कृ. ल. पटवर्धन
- अ. न. गोगावले
- दत्तोबा तांबे

### विद्यमान कार्यकारी समिती

***अध्यक्ष***

*श्री. जयसिंहभाई मरिवाला*

***उपाध्यक्ष***

*श्री. प्रतापराव पवार*
*श्री. उदय गुजर*
*श्री. अविनाश वारदेकर*
*श्री. आर. ए. मेहता*

***कार्याध्यक्ष***

*श्री. पुरूषोत्तमभाई श्रॉफ*

***सहकार्याध्यक्ष***

*श्री. श्रीनिवास तथा रमेश जोशी*
*श्री. शिरीष पटवर्धन*

***कोषाध्यक्ष***

*श्री. श्रीकांत सामळ*

***कार्यवाह***

*श्री. संजय तांबट*

**सहकार्यवाह**

- *श्री. ज्ञानेश पुरंदरे*
- *श्री. अविनाश जोशी*
- *श्रीमती पुष्पाताई नडे*

**सदस्य**

- *श्री. कन्हैयालाल बलदोटा*
- *श्री जयंत कवठेकर*
- *श्री. रामभाऊ डिंबळे*
- *ॲड. सौ. निलिमाताई गोखले*
- *सौ. बागेश्री पोंक्षे*
- *प्रा. डॉ. राजेंद्र देवपूरकर*
- *श्री. सुनील कुलकर्णी*
- *श्री. विलास कुलकर्णी*
- *श्री. विनोद बिबवे*
- *कु. दीपाली पवार*
- *श्री. अरविंद केळकर*
- *श्री. पराग लकडे*


**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे.**
**फॉरिन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र.८३९३०६०**
**आयकर सवलत - ५०% कलम ८० जी प्रमाणे**


संपर्काचा पत्ता : - 'स्व'-रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - (कार्यालय) - २६१२१७०४, २६१३४३१०
भ्रमण दूरध्वनी क्र. ९८२२६७५७६५ (पटवर्धन) ९८२२६७५७६० (पुरंदरे) ९८२२८२३७५७ (श्रीमती नडे)
ई-मेल : swaroopwardhinee@vsnl.net वेबसाईट : http://www.geocities.com/wardhinee/


**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# हृद्गत


*अनौपचारिक शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रजीवनाला, राष्ट्रीय अस्मितेला प्राधान्य देऊन स्वत:च्या जीवनाची उभारणी करणारी युवापिढी उभी करावी अशा हेतूने २८ वर्षांपूर्वी 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाची सुरुवात झाली. आजपर्यंत झालेला कामाचा विस्तार कार्यवृत्ताच्या माध्यमातून आपल्या सर्वांच्या समोर वर्धिनी ठेवत आलेली आहेच. वेगवेगळ्या प्रकारच्या उपक्रमांची आवश्यकता जाणवल्यावर तशा प्रकारचे उपक्रम सुरू करून समाजाची सेवा करण्याचा वर्धिनीचा सतत प्रयत्न राहिलेला आहे.*

*वर्ष २००७ चे कार्यवृत्त आपल्या समोर ठेवताना आम्हाला आनंद होत आहे. दरवर्षी कार्यवृत्त वाचल्यावर वर्धिनीच्या कामावर असलेल्या प्रेमापोटी, वर्धिनीकडून असलेल्या अपेक्षांमुळे आपल्यासारखे अनेक स्नेही दूरध्वनी करून, प्रत्यक्ष भेटून किंवा पत्ररूपाने अनेक उपयुक्त सूचना पाठवीत असतात. त्यातील काही सूचना या कार्यवृत्ताच्या रचनेसंबंधी होत्या. त्या सूचनांचा विचार करून यावर्षीच्या कार्यवृत्तामध्ये थोडा बदल केला आहे.*

*स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवाच्या टप्प्यावरील आपल्या देशाच्या 'समर्थ राष्ट्र' होण्याच्या दिशेने अपेक्षित असलेल्या वाटचालीला मार्गदर्शक ठरतील, असे तज्ज्ञांच्या मुलाखतींवर आधारीत लेख या कार्यवृत्तामध्ये समाविष्ट केले आहेत. याच विषयाला अनुसरून स्वामी विवेकानंदांचे विचार प्रत्येक पानाच्या खाली तळटीपेच्या स्वरूपात दिले आहेत. हा बदल कसा वाटला तसेच वर्ष २००७ मधील कामांसंबंधी आपले काय मत आहे यासंबंधी आपली प्रतिक्रिया जरूर कळवावी, अशी आपल्याला प्रार्थना आहे. आपल्या मौलिक सूचनांचे वर्धिनीत कायमच स्वागत आहे.*

जागृत भारत! भारता, पुन्हा एकदा जागा हो!

# चित्रकल्पना



*हिमहीरक नगराज यशाचा*
*मानदंड उत्तुंग कृतीचा ।*
*पदचिन्हांकित करण्यासाठी,*
*मज स्वातंत्र्य मिळाले हो !*



*चिखलातील नवपंकज बालक*
*भारतभूध्वजधारक आहे*
*विश्वविजयकामना मनातील*
*पहिले पाऊल टाकित आहे ।*

भारतीय स्वातंत्र्याला साठ वर्षे झाली. हजारो ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी, देशभक्तांनी त्यांच्या वैयक्तिक जीवनाला, सुखस्वप्नांना तिलांजली देऊन आपले कर्तृत्त्व, आपल्या साऱ्या क्षमता देशाच्या स्वातंत्र्यासाठी अर्पण केल्या. या सर्वांच्या त्यागामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. आपल्या देशाप्रमाणेच साधारणत: १९४७ च्या आसपास ज्या देशांनी त्यांच्यावर आलेल्या संकटांवर मात करून नव्याने देश घडवायला सुरुवात केली अशा जपान, इस्राईल या देशांनी गाठलेल्या प्रगतीकडे पाहिल्यावर आपण साठ वर्षांत केलेली प्रगती खरोखरीच समाधानकारक आहे का असा प्रश्न मनात येतो. स्वातंत्र्यानंतर जन्माला आलेल्या प्रत्येक नव्या पिढीला कोणत्या स्वप्नांचा वारसा मिळाला हे पाहणेही महत्त्वाचे वाटते. आपल्या वाट्याला आलेले स्वातंत्र्य हे फार मोठी किंमत देऊन मिळालेले आहे याची जाणीव आपण किती जागवू शकलो याचाही निश्चित विचार करायला हवा. मिळालेल्या या स्वातंत्र्यातून काय मिळवायचे आहे हे व्यक्त करण्याचा प्रयत्न मुखपृष्ठावरील चित्रातून आणि काव्यपंक्तीतून केलेला आहे.

एकीकडे आर्थिक सुधारणांमुळे शहरांमध्ये किंवा महानगरांमध्ये राहणाऱ्या भारतीयांच्या राहणीमानात वेगाने बदल होताना दिसतो आहे. त्या सुधारणा पाहिल्या की आपण खूप प्रगती केली आहे असे वाटते. पण त्याच शहराच्या, महानगराच्या उपेक्षित वस्त्यांमध्ये, भागांमध्ये, आणि या शहरांच्या-महानगरांच्या सीमेपलीकडे असलेल्या खेड्यांमध्ये, वनवासी पाड्यांमध्ये डोकावले तर मन विषण्ण होईल अशी राहणीमानातील विसंगती दिसते. दुसऱ्या चित्रात दाखवल्याप्रमाणे अनवाणी, पुरेशी वस्त्र नसलेली, रोज दोन वेळा खायला मिळेलच याची शाश्वती नसलेली आणि तरीही भारताचा ध्वज आपल्या कर्तृत्त्वाच्या बळावर फडकवत ठेवण्याची क्षमता असलेली मुले दिसतात. नेमकी हीच भावना चित्रातून आणि काव्य-पंक्तीतून साकारण्याचा प्रयत्न केला आहे. भारताची राष्ट्रीय संपत्ती असलेल्या या गुणी मुलांची जीवने समृद्ध करण्यासाठी आपण काय करू शकतो, काय प्रयत्न करीत आहोत हे एकमेकांना सांगू या आणि अंतर्मुखही होऊया.

चंद्रमौळी झोपड्यांमध्ये खरा देश आहे. तो आपला पुरुषार्थ, आपली अस्मिता विसरला आहे. त्या चैतन्याला फुंकर घातली पाहिजे, जागविले पाहिजे! *(पृ. २६/ दीपस्तंभ विवेकानंद)*

# वर्षभरातील नित्याचे कार्यक्रम

## शाखा विभाग (एकूण शाखा-११. एकूण विद्यार्थी संख्या-४५०)

**१) संक्रांत उत्सव :** बालवाडी व बालशाखा विभागाचा उत्सव दि. १८ जानेवारीला संपन्न झाला. बालवाडीच्या विद्यार्थ्यांनी अभिनय-गीते तर बालशाखेच्या विद्यार्थ्यांनी मानवी मनोरे सादर केले. कवयित्री सौ. आश्लेषा महाजन या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

शाखा व प्रकल्प विभागाचा उत्सव दिनांक २१ जानेवारीला झाला. प्रमुख अतिथी म्हणून ज्ञानप्रबोधिनीचे संचालक डॉ. गिरीशराव बापट उपस्थित होते. यावेळी विविध शारीरिक कौशल्यांची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली.

**२) १० वी-१२ वी शुभेच्छा कार्यक्रम :** प्रमुख अतिथी म्हणून सौ. उमाताई गुजर उपस्थित होत्या. आत्तापर्यंत काय-काय व किती तयारी झाली आहे हे माहिती करून घेत सौ. उमाताईंनी विद्यार्थ्यांना उरलेल्या दिवसात तयारी कशी करायची याविषयी मार्गदर्शन केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री. विलास कुलकर्णी उपस्थित होते. श्री. बिल गेट्स यांचे उदाहरण देत त्यांनी विद्यार्थ्यांना असे सूचित केले की जग ज्या वेगाने प्रगती करीत आहे तो वेग गाठण्यासाठी आपल्या सर्वांना प्रयत्नांनी शिकस्त करावी लागेल.

**३) विज्ञान दिन स्पर्धा :** वैयक्तिक प्रकल्पा-ऐवजी शाखांना या वर्षी एका विषयावर लघुपटाच्या माध्यमातून प्रकल्प सादर करण्यास सांगितले होते. परीक्षक म्हणून श्री. अमेय बरडे, श्री. प्रतीक गोखले आणि सौ. वेदवती जोगी यांनी काम पाहिले. या प्रसंगी ॲशडेन पुरस्काराने सन्मानित- आर्टी या संस्थेचे- श्री. दीपक कान्हेरे यांनी ऊर्जा समस्या व इंधनाचा पर्याय या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**४) शिबिरे :** उन्हाळी आणि दिवाळीच्या सुटीत वर्धिनीची निवासी शिबिरे होतात. या वर्षी एकूण नऊ शिबिरे संपन्न झाली. त्याचा तपशील खालीलप्रमाणे-

| कालावधही | वयोगट | शिबिराचा विषय | शिबिरार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १५ ते १७/४/०७ | ८ वी ते १२ वी | ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शिबिर घेण्यासाठी प्रशिक्षण | ११० |
| १७ ते २९/४/०७ | ५ वी ते १० वी | ग्राम शिबिर (सातारा जिल्ह्यातील ६ गावातील विद्यार्थ्यांसाठी) | ३५० |
| २४ ते २८/४/०७ | ३ री ते ७ वी | रामायण परिचय शिबिर | ६० |
| १८ ते २२/६/०७ | युवक-युवती | उद्योजकता, करियर आणि सामाजिक कार्य | ७० |
| १२ ते २१/११/०७ | ८ वी ते १२ वी | १८५७ ते १९४७ या कालावधीतील क्रांतीचा इतिहास | ४२५ |
| १२ ते १६/११/०७ | ५ वी ते ७ वी | १८५७ ते १९४७ या कालावधीतील क्रांतीचा इतिहास | २५० |
| १४ ते १७/११/०७ | ५ वी ते १२ वी | १८५७ ते १९४७ या कालावधीतील पराक्रमी महिला | ३० |
| १४ ते १७/११/०७ | १ ली ते ४ थी | स्वातंत्र्यलढ्यातील शूर बालांच्या कथा | ४० |
| २६ ते २७/११/०७ | महिला विभाग | आरोग्य | ५० |

**शुद्ध व्हा. म्हणजे आपोआप शक्तीचा आविष्कार तुमच्या ठायी होईल.** *(पृ. २५/ दी. वि.)*

**५) डॉ. आंबेडकर जयंती :** दरवर्षी रक्तदान शिबिर आणि पाणपोईची सेवा उपलब्ध करून डॉ. आंबेडकर जयंती साजरी केली जाते. रक्तदान शिबिरातून ८६ रक्तपिशव्या संकलित होऊ शकल्या, तर पाणपोईच्या सेवेचा लाभ ५५०० हून अधिक नागरिकांना देता आला. पाणपोईचे उद्घाटन परिसरातील राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील एक कार्यकर्ते श्री. अजय तायडे यांच्या हस्ते करण्यात आले.

**६) वार्षिक नियोजन बैठक :** पहिल्या सत्रात शाखाप्रमुखांनी गेल्या वर्षातील कामाचा वृत्तांत सांगितला. दुसऱ्या सत्रात गटश: बैठका झाल्या. यामध्ये अभ्यास तासिका, कार्यक्रम, मैदान या विषयांशी संबंधित कार्यकर्त्यांच्या बैठका झाल्या त्याच वेळात शाखाप्रमुख व युवकप्रमुखांच्या गटाने प्रभावी शाखा संचालनाच्या संदर्भात चर्चा केली. तिसऱ्या सत्रात नव्या शाखाप्रमुखांनी आपापल्या शाखांचा आगामी वर्षाचा संकल्प जाहीर केला.

**७) गुणगौरव कार्यक्रम :** संस्थेचे सहकार्याध्यक्ष श्री. रमेश जोशी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ११५ वर्धक, वर्धिका व युवक-युवतींचे त्यांनी मिळवलेल्या उत्कृष्ट यशाबद्दल कौतुक करण्यात आले. 'ससा कासवाची' पारंपरिक गोष्ट सांगता सांगता श्री. रमेश जोशी यांनी 'आपल्याजवळ असलेल्या गुणांचा, कौशल्यांचा विकास कसा केला पाहिजे हे सांगितले. प्रतिवर्षाप्रमाणे काका हलवाई स्वीटस्‌चे श्री. सुरेंद्रशेठ गाडवे यांनी पेढ्यांच्या रूपाने देणगी देऊन सर्वांचे तोंड गोड केले.

**८) स्वातंत्र्यदिन कार्यक्रम :** या निमित्ताने शाखांतर्गत क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. तसेच समरगीत स्पर्धाही झाली. या स्पर्धेत भगिनी निवेदिता शाखेला प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळाले. महिला विभागाने घेतलेल्या देशभक्तीपर गीतांच्या स्पर्धेत बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्गाचा प्रथम क्रमांक आला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अनाम वीरांच्या कथा सांगून देशभक्तीची भावना जागी करण्यासाठी दुर्गपंडित श्री. प्रमोद मांडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**९) गणेशोत्सव :** ***श्री गणेशमूर्ती प्राणप्रतिष्ठा पूजा प्रशिक्षण वर्ग-*** २५ नागरिकांनी याचा लाभ घेतला. सौ. आर्या जोशी यांनी वर्गाला मार्गदर्शन केले.

***मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम*** - ८० वादक व ३०० वर्धक-वर्धिकांच्या पथकांच्या साह्याने सहा गणेशोत्सव मंडळांच्या मिरवणुकीत वर्धिनीने सहभाग घेतला. तसेच रेव्ह पार्टी, कचरा व्यवस्थापन, सांस्कृतिक प्रदूषण, प्लॅस्टिकचा राक्षस या विषयांच्या माध्यमातून व देशभक्तीपर गीते सादर करून वर्धिनीने प्रबोधनात्मक कार्यक्रम ४० गणेशोत्सव मंडळांच्या समोर सादर केले.

**१०) वारकऱ्यांचे स्वागत :** विठू माऊलीच्या दर्शनासाठी शेकडो मैल चालत जाणाऱ्या हजारो वारकऱ्यांचे स्वागत दरवर्षी पुण्यात होत असते. वारकऱ्यांच्या पुणे मुक्कामातील हे दिवस वेगळेच मंतरलेले असतात. यावर्षी वर्धिनीच्या शाखांनी त्यांचे स्वागत वेगवेगळ्या पद्धतीने केले. कुणी १० किलो तांदूळ शिधा म्हणून दिंडी प्रमुखाच्या हाती दिला, कुणी वारकऱ्यांच्या बरोबर बसून भजने म्हटली तर काहींनी पायी चालून दमलेल्या वारकऱ्यांचे पाय चेपून देण्याची सेवाही केली.

**तुम्ही जर आपले अध्यात्म सोडून दिलेत आणि पश्चिमेच्या भौतिकवादी विचारसरणीच्या पाठीमागे लागलात तर तीनच पिढ्यात तुमचा वंश नामशेष होईल.** *(पृ. २२ / दी.वि.)*

**११) दुर्गभ्रमण/पदभ्रमण :** वेगवेगळ्या ऐतिहासिक स्थळांना तसेच निसर्गाच्या कुशीतील सौंदर्यस्थळांना वर्षभरात भेटी देण्याचे कार्यक्रम शाखाशाखांवर होत असतात. यावर्षी खालील स्थळांना भेटी देण्यात आल्या:- रायरेश्वर (भोर ते कुर्ला मार्गे पदभ्रमण), तुंग तिकोना, राजगड, तोरणा, नागफणी, पुरंदर.

**१२) शाखा वर्धापन दिन :** वर्धिनीच्या शाखांनी शाखेचा वर्धापन दिन खालील प्रमाणे साजरा केला.

| | |
|---|---|
| रामकृष्ण शाखा | पु.ल. देशपांडे उद्यानातील वनसंपदेचा परिचय तसेच रामकृष्ण मठातील सेवाकार्याचा परिचय |
| विवेकानंद शाखा | श्री. नंदकुमार एकबोटे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |
| निवेदिता शाखा | सौ. रंजनाताई खरे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |
| श्रद्धानंद शाखा | स्वातंत्र्यसैनिक श्री. मारुती शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |
| अभेदानंद शाखा | व्यावसायिक युवकांची संपर्क व गप्पा |
| सुबोधानंद शाखा | निवृत्त नौदल अधिकारी श्री. विनायक अभ्यंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |
| अखंडानंद शाखा | डॉ. प्रदीप आगाशे यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |
| दयानंद शाखा | सौ. तृप्ती आगरवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |
| योगानंद शाखा | विंग येथील रामेश्वर विद्यालयातील शिबिरार्थी विद्यार्थ्यांसमवेत कार्यक्रम |
| ब्रह्मानंद शाखा | सौ. उमाताई गुजर व स्थानिक नगरसेवक श्री. जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम |

## महिला विभाग (उद्योगशिक्षण-१३० : साक्षरता-४५ : बचतगट-२८ : सदस्य- ६००)

**१) उद्योगशिक्षण वर्ग :** शिवण वर्ग, सहायक परिचारिका वर्ग, बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग असे जे शिक्षण वर्ग महिला विभागाद्वारे चालतात. त्याचा लाभ यावर्षी ५७ महिलांना झाला. या तीनही अभ्यासक्रमांच्या वर्गांचा समारोप १० एप्रिलला झाला. दोन वर्षांपूर्वी माडगांवकर न्यासाने सुरू केलेला 'कै. किशाभाऊ पटवर्धन स्वयंरोजगार प्रेरणा पुरस्कार' यावर्षी सौ. मीना कानडे व सौ. शिल्पा शिंदे यांना मिळाला. प्रत्येकी एक शिलाई मशीन असे पुरस्काराचे स्वरूप आहे. नव्या वर्षात उद्योगशिक्षण वर्गांसाठी १२० गरजू महिलांनी वेगवेगळ्या वर्गांसाठी नावे नोंदविली असून त्यांचे शिक्षण चालू आहे.

**व्याख्याने :** प्रत्येक शुक्रवारी उद्योगशिक्षण तसेच अन्य उपक्रमातील महिलांसाठी व्याख्यान आयोजित केले जाते. या वर्षी झालेल्या व्याख्यानांपैकी काही व्याख्यानांची सूची खालीलप्रमाणे-

| *व्याख्यानाचा विषय* | *वक्त्याचे नाव* |
|---|---|
| महिला आरोग्य | डॉ. विनेश नगरे |
| खेळातून व्यक्तिमत्त्व विकास | सौ. मेघा नगरे |
| डॉ. आनंदीबाई जोशी (चरित्र) | श्री. जयंत कवठेकर |
| डॉ. किरण बेदी (चरित्र) | श्री. शिरीष पटवर्धन |
| आत्मविश्वास | श्रीमती हेमाताई होनवाड |
| राजमाता जिजाऊ (एकपात्री प्रयोग) | सौ. संध्या साबणे |
| कीर्तन- परमपूजनीय श्री गोळवलकर गुरुजी | सौ. मानसी जोशी |

**पश्चिमेच्या भौतिकवादी विचारसरणीच्या मागे लागलात तर राष्ट्रीय चारित्र्याचा कणाच मोडून पडेल.**

**संस्थाभेटी :** ताराचंद रुग्णालय : पोषक आहारावरील प्रदर्शनाला भेट, अंधदिनानिमित्त कोथरूड येथील अंधशाळेला भेट, श्रीवत्स अर्भकालय, राणी लक्ष्मी सैनिकी शाळा तसेच पौड येथील आश्रमशाळेला राखी पौर्णिमेच्या निमित्ताने भेट देण्यात आली.

**शिबिर :** उद्योगशिक्षण वर्गातील विद्यार्थिनीसाठी दि. २४ व २५ नोव्हेंबर रोजी निवासी शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मार्गदर्शन करणाऱ्या वक्त्यांची नावे याप्रमाणे-

सौ. उषाताई दांडेकर - व्यवस्थापकीय खेळ.

श्रीमती सिंधुताई संकपाळ - अनाथ मुलांचे विश्व अनुभवकथन.

डॉ. शिरीषा साठे - सकारात्मक दृष्टिकोन

डॉ. गणपुले - परिचारिकेची रुग्णालयातील भूमिका

प्रा. राम डिंबळे यांनी या शिबिराचा समारोप केला.

## २) 'पाकोळी' बालवाडी

**शुभेच्छा कार्यक्रम :** बालवाडीच्या मोठ्या गटातील विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा कार्यक्रम १२ एप्रिलला झाला. प्रत्येक मुलाला देण्यासाठी शिक्षिकांनी भेटवस्तू स्वत: तयार केल्या होत्या. 'आमच्या मुलांना खूप चांगले संस्कार वर्धिनीमुळे मिळाले आहेत' अशी पालकांची उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती.

**बालमेळा :** ज्या शैक्षणिक साधनांचा उपयोग बालवाडीच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी केला जातो, ज्या साधनांशी खेळायला या वयोगटातील मुलांना आवडते. या सर्व शैक्षणिक साधनांचा परिचय पालकांना व्हावा या हेतूने बालमेळा घेण्यात आला. विविध बालवाड्या व प्राथमिक शाळांमधील सुमारे २००० बालकांनी तसेच किमान १५०-२०० पालक व शिक्षकांनी या मेळाव्याला भेट दिली.

**फेरी :** वटपौर्णिमेच्या निमित्ताने 'पर्यावरण रक्षणाच्या' घोषणा देत, गोकुळाष्टमीला कृष्णाचा वेष परिधान करून बालवाडीच्या मुलांनी वर्धिनीच्या इमारतीच्या परिसरात फेरी काढली होती.

**आषाढी एकादशी :** वारकरी, संत महंतांचे वेष परिधान करून तसेच प्रत्यक्ष श्री विठोबा-रखुमाई सारखी वेषभुषा करून बालवाडी, बालशाखा या विभागांची दिंडी परिसरातील विठ्ठल मंदिरात पोहोचली. वाटेमध्ये विठुनामाचा गजर करीत, गोल रिंगणासारखे वारीतील प्रकार या दिंडीने सादर केले. मंदिरात कुमार अनिकेत भांड याचे 'वृक्षांचे महत्त्व' या विषयावर कीर्तन झाले. कु. साई खैरे याने त्याला साथ केली.

**गणेशोत्सव :** बालवाडीच्या मोठ्या गटातील मुलांनी अथर्वशीर्ष पाठांतर केले.

## ३) बालशाखा

**सहल :** भाज्याची लेणी पाहण्यासाठी ३ री ४ थी मधील ३० मुलांची सहल गेली होती. या लेण्यांमधील दगडी पलंग मुलांना खूपच आवडला. या सर्व मुलांनी या सहलीच्या निमित्ताने पहिल्यांदाच रेल्वेनी प्रवास केला.

**राष्ट्रजीवनाची उभारणी ज्या पायावर व्हायची तो पायाच खचेल आणि उरतील केवळ विनाशाच्या खुणा.** *(पृ. २२ / दी.वि.)*

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त २००७

**शिबिर :** ३ री ४थीच्या मुलांसाठी रामायण परिचय शिबिर एप्रिल महिन्यात संपन्न झाले. शिबिरात सोबतच्या तक्त्यात दिल्याप्रमाणे व्याख्याने झाली.

**छंदवर्ग :** १ली व २ रीच्या मुलांसाठी १५ ते २९ एप्रिल या काळात छंदवर्ग संपन्न झाला. चित्रे काढणे, रंगवणे, चिकटकाम, कुंड्यांमध्ये रोपे लावणे, गाणी -गोष्टी असे विविध कार्यक्रम या वर्गात झाले.

| विषय | वक्त्याचे नाव |
|---|---|
| श्रावणबाळ ते रामजन्म | सौ. वेदवती जोशी |
| त्राटिकावध ते रावणवध | सौ. सरिताताई बापट |
| कथा जानकीच्या | सौ. संध्याताई साबणे |
| रामायणातील विविध प्रसंग | सौ. कुसुमताई कुलकर्णी |

## ४) नेत्रचिकित्सा विभाग :

(१३ वस्त्यांमधील २५००० लोकसंख्या) यावर्षी नेत्रविषयक खालीलप्रमाणे कामे झाली.

| विषमज्वर/एम.एम. आर लस | नेत्ररुग्ण तपासणी | चष्मे वाटप | मोतीबिंदू शस्त्रक्रिया | आरोग्य तपासणी १५ वर्षाखालील मुले | | | ब प्रकारची कावीळ प्रतिबंधात्मक लस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तपासणी | उपचार | कुपोषणासाठी उपचार | |
| लाभार्थी संख्या १४२१ | २१३३ | ४०१ | ४१ | २७५४ | १५९९ | २७१ | ११२२ |
| | | | अ जीवनसत्वाचा डोस | | | | |
| | | | स्तनदा माता | | मुले | | |
| | | | १४६ | | १४९० | | |

## ५) बचत गट :

एकूण २८ बचत गटांची बांधणी झाली आहे. या माध्यमातून सुमारे ६०० महिलांचे संघटन उभे करण्याचा प्रयत्न सुरू आहे. गेल्या वर्षभरात या सर्व बचत गटांची एकूण आर्थिक उलाढाल ही रुपये १,५०,०००/- इतकी झाली.

छोटे उद्योग, व्यवसाय करण्याची इच्छा असलेल्या सुमारे २५ महिलांना उद्योग प्रशिक्षण देण्यात आले.

- सिंहगड रोड परिसरातील बचत गटांनी धान्य व कपडे गोळा करून गरजू सामाजिक संस्थांना भेट म्हणून दिले.

- नोव्हेंबर मध्ये बचत गटातील ५० महिलांची पाचगणी व केतकावळे या गावी सहल गेली होती.

- महाराष्ट्रातील सुमारे १२०० बचत गटातील महिला व पदाधिकाऱ्यांच्या झालेल्या पुण्यातील अधिवेशनामध्ये वर्धिनीच्या बचत गटांचाही सहभाग होता. खेड शिवापूर येथील कार्यक्रमातही वर्धिनीच्या बचत गटांनी सहभाग घेतला होता.

- गेल्या वर्षांत दिवाळी उटणे, भीमथडी जत्रेत लोकरी कपड्यांची विक्री, मनपाच्या नागरवस्ती विभागामार्फत दिवाळी सेलमध्ये वर्धिनीच्या बचत गटांनी सहभाग घेतला होता. एकूण रु. ४५००/-ची विक्री या निमित्ताने झाली.

**६) संस्कार वर्ग :** एकूण २५ विद्यार्थी सहभागी आहेत. त्यांना शिकण्याची गोडी वाटायला लागली आहे.

**७) माता बाल आरोग्य केंद्र :** के.ई.एम. रुग्णालयाच्या सहकार्याने चालते. दर आठवड्याला किमान ४० ते ५० रुग्णांना या केंद्राचा लाभ मिळतो.

**हा असा एक देश आहे की, अध्यात्म आणि चरम त्याग हेच इथले जीवनस्वर आहेत.**
*(पृ. १६ / दी.वि. नवी प्रत)*

## फिरती प्रयोगशाळा (एकूण गावे १२ अंदाजे लाभार्थी संख्या १५००)

- घेण्यात आलेले प्रयोग- आर्कमेडिजचे तत्त्व, चुंबकाचे प्रकार, ऊर्ध्वपातन, विलगीकरण, घनता, पदार्थांच्या अवस्था, मानवी शरीर इ.

- शिवथरघळ येथील कुंभे शिवथर व वरंधा या गावातील १०वीच्या १६० विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमातील सर्व प्रयोग शिकवण्यात आले. प्रयोगशाळेची सोय शाळेत नसल्याने हे सर्व प्रयोग सर्व विद्यार्थ्यांना स्वत: करता आले याचा विलक्षण परिणाम मुलांच्या चेहऱ्यावर व शिक्षकांच्या प्रतिसादातून लक्षात आला.

- खराडी येथील सुंदराबाई मराठे शाळेतील ७ वीच्या २२५ विद्यार्थ्यांसाठी एका प्रयोग प्रात्यक्षिक सत्राचे आयोजन केले होते.

●●●

## संस्कार शिदोरी

अखंडानंद शाखेचा युवक कार्यकर्ता. इंजिनियर म्हणून एका कंपनीत नोकरीला. लग्न ठरल्याचे समजल्यावर एका ज्येष्ठ कार्यकर्त्याने भेट घेतली. गप्पा मारताना समजले की एका मोठ्या कंपनीत ‘मोठ्या पॅकेजची’ आलेली संधी त्याने स्वीकारली नाही. न राहवून या कार्यकर्त्याने विचारले ‘अरे! तुझे लग्न ठरले आहे ना! आणि चांगल्या कंपनीत मोठ्या पगाराची आलेली संधी तू का सोडलीस?’ त्याने दिलेल्या उत्तराने मात्र त्याच्याबद्दलचा आदर आणखीनच वाढला. हा कार्यकर्ता म्हणाला मी सध्या ज्या कंपनीत नोकरी करतो ती कंपनी छोटी आहे. ३-४ महिन्यांपूर्वी या कंपनीच्या मालकाचे निधन झाले. त्यांचा मुलगा काम पाहायला लागला आहे. त्याला माझ्या मदतीची गरज आहे. केवळ मोठ्या आर्थिक लाभाच्या नोकरीसाठी त्याला या स्थितीत सोडून जाणे मला योग्य वाटले नाही. तो स्थिर झाला की मी निश्चित चांगल्या पगाराची नोकरी मिळवीन. मला त्याची चिंता नाही अशा स्थितीत त्याच्या आधाराचे बोट काढून घेणे योग्य नाही. मग वर्धिनीने दिलेल्या संस्काराचा काय उपयोग?

## पैशाचे झाड आणि अंगठीचा वेल

‘पाकोळी’ बालवाडीमध्ये अनेक गमती जमती घडतात. मुलांमधील उत्कंठा, औत्सुक्य वेगवेगळ्या निमित्ताने प्रकट होते. बालवाडीच्या मोठ्या गटातील विद्यार्थ्यांना त्यांच्या ताईंनी वर्धिनीच्या गच्चीवर नेले. प्रत्येकाला एकेक कुंडी व कुंडीत लावण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या बिया दिल्या. दोन विद्यार्थ्यांनी मात्र मागणी वेगळीच केली एक म्हणाला ताई मला पैशाचे झाड लावायचे आहे तर दुसरी म्हणाली ताई मला अंगठीचा वेल लावायचा आहे. त्यांच्या इच्छेप्रमाणे एका कुंडीत नाणे तर दुसऱ्या कुंडीत अंगठी पेरली. सर्वजण रोज पाणी घालत होते. अन्य कुंड्यात अंकुर आले, कोवळी पाने आली, पाने वाढू लागली पण या दोन कुंड्यात मात्र काहीच उगवेना. शेवटी त्यांनीच पुन्हा कुंडी उकरायला सांगितल्यावर पैशाचे झाड आणि अंगठीचा वेल लागत नाही हे सगळ्यांनाच समजले.

**आपल्या उपेक्षित बांधवांना आज हवी आहे ती केवळ प्रेरणा!** *(पृ. २० / दी.वि. नवी प्रत)*

## वर्षभरातील विशेष कार्यक्रम/अनुभव/प्रसंग

➢ कै. भालभा केळकर स्मृती करंडक एकांकिका स्पर्धेत बालवाडीच्या मोठ्या गटाने सहभाग घेतला. या स्पर्धेत या वयोगटातील मुलांनी सहभाग घेतलेला हा एकमेव संघ होता. लहान वयातही दाखविलेल्या धाडसाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले आणि सादर केलेल्या एकांकिकेला विशेष उत्तेजनार्थ बक्षिस देण्यात आले.

➢ प्रसिद्ध नृत्यांगना श्रीमती मल्लिका साराभाई यांनी बालवाडीच्या वर्गांना भेट दिली. मुलांनी सादर केलेल्या कार्यक्रमांनी त्या खूप खूष झाल्या.

➢ संक्रांत उत्सवामध्ये बालशाखेने मानवी मनोऱ्याचे प्रात्यक्षिक सादर केले. या प्रात्यक्षिकाचे वेळी स्टेजवर कोणीही शिक्षिका/कार्यकर्त्या सूचना देत नव्हते. या बालांनी संगीताच्या ठेक्यावर नेमक्या हालचाली करून आकर्षक मनोरे रचले.

➢ सिमेंटेक सॉफ्टवेअर कंपनीच्या स्टाफकडून बालशाखेच्या स्वतंत्र ग्रंथालयाला ५०० पुस्तकं व कपाटाची भेट देण्यात आली.

➢ झी वाहिनीने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय ढोल-ताशा स्पर्धेत स्वामी अखंडानंद शाखेला शालेय स्तरावरील तिसऱ्या क्रमांकाचे बक्षिस मिळाले. ५०००/- रुपये आणि मानचिन्ह असे त्याचे स्वरूप आहे.

➢ उद्योजक श्री. प्रवीण नपाते यांनी आगामी तीन वर्षांमध्ये गरजू महिलांसाठी चालविल्या जाणाऱ्या सर्व उद्योगशिक्षण वर्गांना **‘स्वर्गीय भगवानराव नपाते स्मृती निधीतून’** सहाय्य देण्याचे मान्य केले असून यामध्ये लाभ घेणाऱ्या महिलांची संख्या दरवर्षी वाढती असावी अशी अपेक्षा केली आहे. याचा थेट परिणाम म्हणजे गेल्या वर्षी उद्योग शिक्षण वर्गाचा लाभ ५७ महिलांना मिळाला होता. हीच संख्या या वर्षी १२० च्या वर गेली आहे. होम नर्सिंग कोर्सची एक बॅच पौड येथे सुरू झाली आहे. त्यालाही प्रतिसाद उत्तम मिळाला आहे.’

➢ दिवाळीच्या निमित्ताने वर्धकांना आकाश-कंदिल बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी श्री. विजय केळकर, विक्रांत दिघे यांनी मार्गदर्शन केले.

➢ दिवाळी शिबिरे - मुलभूत संकल्पनांवर आधारित प्रयोग हे ८ वी ते १२ वी च्या दिवाळी शिबिराचे मुख्य सूत्र होते. घनता, प्रकाश, उष्णता, गती व साधी यंत्रे या मूलभूत संकल्पनांवर आधारित शिबिराचे कार्यक्रम या शिबिरासाठी ठरविण्यात आले होते. शिबिरातील एकूण १० गटांनी ५ ते ८ मिनिटांचा वरील विषयांवर आधारित एकेक लघुपट बनविला.

➢ विज्ञान दिनाच्या निमित्ताने आपापले विषय शाखांनी फिल्म बनवून सादर केले. अपारंपारिक ऊर्जास्रोत, प्रकाश, स्पेससूट, स्वप्न आणि भास, बल, बहिर्गोल-अंतर्गोल भिंगाच्या साह्याने मिळणाऱ्या प्रतिमा, नैसर्गिक शीतगृह, आपली सूर्यमाला, प्रयोगशाळेतील साधनांचा परिचय असे विषय या वेळी सादर करण्यात आले.

**दृष्टीपुढे हेच ध्येय ठेवा. धर्माला सन्मान्य पदी ठेवून जनसामान्यांची उन्नती.**
*(पृ. २० / दी.वि.नवी प्रत)*

➢ उद्योगव्यवसाय क्षेत्रातील श्री. रमेश जोशी, श्री. प्रवीण नपाते, श्री. किशोर करमरकर तसेच सामाजिक क्षेत्रातील श्री. मुकुंदराव गोरे, ॲड. गणेश हिंगमिरे यांचे कार्यकर्त्यांना मार्गदर्शन मिळाले. युवकांसाठी सैन्यदलातील संधी या विषयावर कॅप्टन किरण कुडलिंगार या वर्धक कार्यकर्त्याने एक 'पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन' दिले.

➢ महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभागातर्फे संस्कारवर्ग चालविले जातात. या वर्गांवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या शिबिरात निवेदिता शाखेच्या युवतींनी जाऊन विविध प्रकारचे मैदानी खेळ, देशभक्तीपर गीते, हस्तकला या विषयांवर मार्गदर्शन केले.

➢ यमगरवाडी येथील एकलव्य विद्यार्थी वसतीगृहासाठी वर्धिनीच्या शाखांनी तांदूळ, ज्वारी व डाळ या स्वरूपात मदत गोळा केली. एकूण ११ पोती धान्य या निमित्ताने गोळा केले.

➢ विक्रयकला अनुभव शिबिर- दिवाळीच्या निमित्ताने वर्धक-वर्धिकांनी एकूण २०७० उटण्याच्या पुड्यांची विक्री केली.

➢ पूर्वभागातील शाळांसाठी सामुदायिक पसायदान पाठांतर स्पर्धा व सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन रामकृष्ण व निवेदिता शाखेने केले होते.

➢ संस्था परिचय कार्यक्रम : स्वामी सुबोधानंद शाखेने स्व-रूपवर्धिनीच्या कामाचा परिचय परिसरातील नागरिकांना करून देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शाखेच्या युवक गटाने कार्यक्रमाचे निमंत्रण सुमारे ५०० घरांमध्ये जाऊन प्रत्यक्ष दिले. या भेटींमुळे शाखेच्या परिसरात राहणाऱ्या आणि शाखेला उपयोगी होऊ शकतील अशा अनेक व्यक्तींचा परिचय झाला. प्रत्यक्ष कार्यक्रमाचे वेळी आलेल्या जोरदार पावसामुळे प्रत्यक्ष उपस्थितीवर त्याचा परिणाम झाला तरीसुद्धा ३२ नागरिक या कार्यक्रमाला उपस्थित होते. एकूण वर्धिनीच्या कामाचा परिचय आणि सुबोधानंद शाखेच्या कामाची माहिती असे या कार्यक्रमाचे स्वरूप होते.

➢ **काचेची परिक्षानळी पहिल्यांदा हातात धरताना :** शिवथरघळ येथील कुंभे शिवथर व वरंधा या गावातील १० वीच्या १६० विद्यार्थ्यांसाठी वर्धिनीच्या फिरत्या प्रयोगशाळेची मदत घेण्याचे शिवथरघळ येथील समर्थसेवा प्रतिष्ठान या सेवाभावी संस्थेने ठरविले. त्यांच्या निमंत्रणानुसार फिरत्या प्रयोगशाळेचे काम पाहणारे श्री. सुनील कुलकर्णी, श्री. प्रशांत कवडे तसेच श्री. राहूल जगताप असे तिघेजण रवाना झाले. तेथे पोहोचल्यावर विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांच्याही चेहऱ्यावर उत्सुकता ओसंडून वाहत होती. प्रत्यक्ष कोणताच प्रयोग कधी पाहिलाही नव्हता व केलाही नव्हता त्यामुळे उत्सुकता आणि दडपण अशा मिश्र मनस्थितीत विद्यार्थ्यांनी प्रयोग करायला सुरुवात केली. काचेची परीक्षानळी पहिल्यांदाच हातात धरताना विद्यार्थ्यांचे हात थरथरत होते. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांनी त्यांच्यामध्ये आत्मविश्वास जागवला आणि हळूहळू विद्यार्थ्यांच्या हालचालीत तो जाणवला. अभ्यासक्रमातील सर्व प्रयोग सर्वांनी प्रत्यक्ष केले. प्रयोगशाळेची सोय शाळेत नसल्याने प्रत्यक्ष

**हे राष्ट्र उभे राहणार हे कोणातून? - भंगी आणि चांभार यांच्यातून, कोळ्यांच्या झोपड्यातून आणि शेतकऱ्यांच्या खोपटातून** *(पृ. २१ / दी.वि.)*

प्रयोग करून पाहण्याचा आनंद विद्यार्थ्यांना या उपक्रमामुळे मिळाला.

➢ **रेव्ह पार्टी आणि पुणे :** डोणजे गावी झालेल्या रेव्ह पार्टीमुळे समाजमनात खूप अस्वस्थता होती. त्याला वाचा फोडण्यासाठी अ.भा. विद्यार्थी परिषदेच्या सहयोगाने वर्धिनीच्या शाखा विभागाने एकत्र येऊन एका परिसंवादाचे आयोजन केले होते. या परिसंवादाला विद्यार्थी, पालक व सामान्य नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महाविद्यालयातील विद्यार्थी, आय.टी. क्षेत्रातील व्यक्ती, पत्रकार, महिला पोलिस अधिकारी यांच्याबरोबर रेव्ह पार्टी उध्वस्त करणारे पोलीस अधिकारी श्री. विश्वास नांगरे पाटील तसेच प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनील अवचट हे या परिसंवादाला उपस्थित होते. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य अनिरुद्ध देशपांडे सर होते.

या कार्यक्रमानंतर काही दिवसांनी प्रत्यक्ष डोणजेगावच्या मंदिराच्या प्रांगणात प्रतिकात्मक नांगर चालविण्याचा कार्यक्रम झाला. इतिहासतज्ज्ञ श्री. निनाद बेडेकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. सिंहगड घेऱ्यातील वेगवेगळ्या गावचे सरपंच या कार्यक्रमाला उपस्थित होते व या सर्वांनी सिंहगडा-सारख्या पवित्र वास्तूच्या परिसरात रेव्ह पार्टीसारखे संस्कृती विध्वंसक कार्यक्रम पुन्हा होऊ न देण्याची प्रतिज्ञा यावेळी घेतली.

➢ **शताब्दी-एका अतुलनीय साहसाची :** मादाम कामा यांनी १९०७ साली स्टुटगार्ट येथे आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट काँग्रेसच्या अधिवेशनात पहिल्यांदा स्वतंत्र भारताचा म्हणून ध्वज प्रदर्शित केला होता त्या घटनेला २२ ऑगस्ट रोजी १०० वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने पुण्यात झालेल्या कार्यक्रमांमध्ये वर्धिनीचा मोठा सहभाग होता. मादाम कामा यांनी स्टुटगार्ट येथे जो ध्वज प्रदर्शित केला होता तो ध्वज पुण्याच्या केसरी वाड्यातील संग्रहालयामध्ये जतन केला आहे. या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी ध्वजाला अभिवादन करण्याच्या हेतूने केसरी वाड्यामध्ये एक कार्यक्रम २२ ऑगस्ट रोजी सकाळी संपन्न झाला. या कार्यक्रमाला डॉ. दीपक टिळक, खासदार राणा सौ. हिमानी सावरकर, सौ. कविताताई गाडगीळ यांची प्रमुख उपस्थिती होती. मध्यवर्ती पुण्यातील शाळांमधील ५०० विद्यार्थी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते. या प्रसंगी विद्यार्थ्यांना मादाम कामा यांचे प्रेरणादायी चरित्र सांगितले गेले.

याच दिवशी दुपारी चार वाजता या ऐतिहासिक ध्वजाची शालेय घोषांच्या निनादामध्ये केसरीवाडा ते बालगंधर्व रंगमंदिर या मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली. मुलींच्या सैनिकी शाळेसह पुण्यातील ६ शाळांची घोषपथके या मिरवणुकीत सहभागी झाली होती. मिरवणुकीच्या मार्गावर वेगवेगळ्या शाळांचे विद्यार्थी आणि नागरिकांनी या ध्वजाचे स्वागत केले. बालगंधर्व रंगमंदिर चौकात झाशीची राणी लक्ष्मीबाईंच्या पुतळ्याशी झालेल्या मानवंदनेच्या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. **या दोन्ही कार्यक्रमांच्या संयोजनाची जबाबदारी वर्धिनीकडे होती.**

➢ **बचत गटाकडून 'बचाव' गटाकडे :** उद्योगशिक्षण वर्ग, बचत गट, साक्षरता वर्ग, अशा अनेक उपक्रमांमुळे महिलांचा वर्धिनीशी नित्याचा

**या नव्या भारताचे चैतन्य उसळणार आहे कुंभाराच्या भट्टीतून आणि वाण्याच्या दुकानातून!**
*(पृ. २१ / दी.वि.)*

संपर्क असतो. त्यांच्याशी होणाऱ्या औपचारिक संवादातून वेगवेगळया व्यसनांच्या वाढत्या दुष्परिणामांचे चित्र वारंवार समोर येत होते. रेव्ह पार्टीमुळे आर्थिक सुबत्ता लाभलेल्या घरांमधील तरुणांची व्यसनांच्या दिशेने कशी वाटचाल होत आहे हे समाजासमोर आले होतेच. या निमित्ताने आर्थिक/सामाजिक दृष्ट्या समस्याग्रस्त घरांमधील या समस्येचा शोध घ्यावा असे महिला विभागातील कार्यकर्त्यांना वाटले. या विचारातून अशा विषयावर सर्वेक्षण घेण्याचे ठरले. नेत्रचिकित्सा विभागातील उपक्रमांमुळे वर्धिनीच्या परिसरातील सुमारे १३-१४ वस्त्यांशी वर्धिनीचा नियमित संपर्क आहेच. याच वस्त्यांमध्ये हे सर्वेक्षण करण्याचे ठरले. होमनर्सिंग कोर्स करणाऱ्या विद्यार्थिनीच्या सहाय्याने हे सर्वेक्षण करण्यात आले. त्याचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.

एकूण सर्वेक्षण करण्यात आलेली कुटुंब संख्या : १५००

व्यसनविषयक माहिती मिळालेली घरांची संख्या : ८४१

**व्यसनांविषयी मिळालेली माहिती :**

| व्यसनांचे प्रकार | दारू | सिगारेट बिडी | तंबाखू | गुटखा | मटका/लॉटरी | अन्य व्यसने |
|---|---|---|---|---|---|---|
| व्यसनाधिन व्यक्तींची संख्या | ३५६ | १४१ | ४५१ | १८७ | २५ | १२२ |
| दोनपेक्षा अधिक व्यसने असलेल्या व्यक्तींची संख्या | २५८ | | | | | |

या सर्वेक्षणातून गुटखा खाण्यामध्ये महिलांची संख्याही वाढत असल्याचे लक्षात आले.

व्यसनविषयक माहिती मिळालेल्या ८४१ घरांमधील व्यसनाधीन व्यक्ती रोज खर्च करीत असलेली एकूण रक्कम रुपये २२,८८०/- (याचाच अर्थ या व्यक्ती दरमहा रुपये ६,८६,४००/- इतकी रक्कम व्यसनांवर खर्च करतात.)

हाती आलेला हा तपशीलच इतका धक्कादायक आहे की त्यामुळे या प्रश्नांची तीव्रता सर्वांना जाणवली. याविषयी जनजागरण करण्याचे हेतूने महिला विभागाने सार्वजनिक गणेशोत्सवाचे काळात दिनांक २२ सप्टेंबर रोजी एका प्रबोधन फेरीचे आयोजन केले होते. बचतगट, उद्योगशिक्षण वर्गाशी संबंधित महिला-मुली व पालक महिला अशा सुमारे १५० महिलांनी या प्रबोधन फेरीमध्ये सहभाग घेतला. होम नर्सिंग कोर्सच्या विद्यार्थिनींनी व्यसनाच्या दुष्परिणामावर आधारलेले एक पथनाट्य या वेळी अनेक ठिकाणी सादर केले. प्रबोधन फेरीच्या मार्गावर असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या फेरीचे हार्दिक स्वागत केले. गणेशोत्सव मंडळाच्या मांडवापुढे झालेल्या कार्यक्रमात व्यसन विरोधी घोषणा, पथनाट्य याच्या बरोबरीने व्यसनी कुटुंबातील महिलेचे अनुभव, व्यसनातून मुक्त झालेल्या व्यक्तीचे अनुभव असे

**नव्या भारताचे स्फुरण आहे कारखाने आणि बाजारपेठांमधून! वनातून, डोंगरदऱ्यांमधून!**

*(पृ. २३ / दी.वि.)*

कार्यक्रम सादर करीत ही फेरी मंगळवार पेठेतील वजनकाटा या ठिकाणी पोहोचली. या ठिकाणी झालेल्या समारोप सभेमध्ये श्री. रामभाऊ डिंबळे यांनी 'व्यसनी व्यक्तीमुळे होणाऱ्या त्रासातून मुक्त होण्यासाठी अशा घरातील महिलांनी एकत्र येऊन एकमेकींना आधार दिला पाहिजे तसेच संघटितपणे व्यसनी व्यक्तीला जाब विचारला पाहिजे' असे मार्गदर्शन केले. 'बचतगटाच्या माध्यमातून एकत्र आलेल्या महिलांनी आता बचत गटाचे रूपांतर बचाव गटात करून घरातील व्यसनाचा प्रश्न सोडविला पाहिजे' असा मुख्य विचार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## संस्कार शिदोरी

बऱ्याच वर्षापूर्वीचा प्रसंग आहे. वर्धिनीची वार्षिक नियोजन बैठक चालू होती. बैठकीतील एका सत्रामध्ये उपस्थित प्रत्येकाने वर्षभरामध्ये आपण वर्धिनीचे काय काम केले याचे निवेदन करायचे होते. हे सत्र सुरू असताना क्रमाक्रमाने प्रत्येकजण आपला नित्यकामात सहभाग कसा होता हे सांगत होता. एका कार्यकर्त्याने त्याची पाळी आल्यावर सांगितले की 'नोकरीमुळे मी काही दैनंदिन कामात सहभागी होऊ शकत नाही. त्यातच तीनही पाळ्यांमध्ये काम करावे लागत असल्याने वेळापत्रकही बदलते राहते. पण एक गोष्ट नक्की सांगाविशी वाटते. कामाच्या कामाच्या ठिकाणी डबा खाण्याच्या सुटीत मी दररोज एका कामगार मित्राबरोबर डबा खातो; त्याच्याशी गप्पा मारतो. मी नोकरीला लागलो तेव्हा जे कामगार माझ्याबरोबर नोकरीला लागले त्यांच्यापैकी ७०-७५ % जणांना कोणते ना कोणते व्यसन होते. रोज डबा खाताना अशा सहकाऱ्यांना मी व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन करतो, त्यांना समजावून सांगतो आणि मला आनंद वाटतो की त्यांच्यातील काही जणांचे व्यसन पूर्ण सुटले तर काहींच्या व्यसनांचे प्रमाण कमी झाले आहे'.

वर्धिनीत येऊन मिळणारा संस्कार समाजात वावरताना प्रत्यक्ष जागा ठेवणारे व तो संस्कार आपल्या सहकाऱ्यांमध्ये रुजवणारे कार्यकर्ते घडवावेत हाच तर या कामामागचा हेतू असल्याने या कार्यकर्त्याने जरी नम्रपणाने म्हटले की मी दैनंदिन कामात काही सहभाग देऊ शकलो नाही तरी प्रत्यक्ष त्याने केलेले काम हे अधिक बोलके उदाहरण आहे.

**आपल्या धर्माने आपल्याला शिकविले आहे की, प्रत्येक जीव हे तुझ्या ठायी असलेल्या आत्म्याचेच दुसरे रूप आहे.** *(पृ. २३ / दी.वि.)*

# क्षण आनंदाचे

- श्री. उमेश बिबवे हे बी.एड (फिजिकल) च्या परीक्षेत पुणे विद्यापीठात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण.
- चऱ्होली बुद्रुक सर्व्हे नं. ३०५ मधील एक एकर जागा बक्षिस पत्राने श्री. पुरुषोत्तमभाई श्रॉफ व सौ. सुरेखाताई मश्रुवाला यांनी वर्धिनीला दिली तर सर्व्हे नं. १२५/१ येथील सहा एकर जागा खरेदीखताने वर्धिनीच्या नावे झाली आहे. दोन्ही जागांच्या शासकीय कागदपत्रांवर वर्धिनीचे नाव लागले आहे.
- कुमार आकाश निंबर्गीकर हा स्वामी अखंडानंद शाखेचा वर्धक ७वी च्या माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत पुणे जिल्ह्यात ११ वा आला. त्याला ३०० पैकी २६७ गुण मिळाले आहेत.
- श्री. सुभाषराव नडे यांची पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर संचालक म्हणून निवड झाली, तसेच कीर्तन महाविद्यालयाने घेतलेल्या परीक्षेत ते पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले.
- 'स्व'-रूपवर्धिनीचे युवक कार्यकर्ते श्री. श्रीकांत यादव यांनी बी.एस.एन.एल.च्या अखिल भारतीय सांस्कृतिक महोत्सवात उत्कृष्ट नाटक, उत्कृष्ट दिग्दर्शन आणि उत्कृष्ट अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे बक्षिस मिळवले. त्यांचे हार्दिक अभिनंदन. त्यांचीच छोटी भूमिका असलेला 'वळू' हा चित्रपटही प्रकाशनाच्या वाटेवर आहे. या क्षेत्रातील त्यांच्या वाटचालीस हार्दिक शुभेच्छा.

## विशेष भेट

सुप्रसिद्ध नृत्यांगना आणि सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती मल्लिका साराभाई यांनी वर्धिनीला भेट दिली. वर्धिनीच्या बालवाडीमधील मुलांची साभिनय गीते पाहून त्यांनी खूप आनंद व्यक्त केला. पालकांच्या प्रशिक्षणासाठी त्यांच्या संस्थेने निर्माण केलेल्या व्हीसीडी कॅसेटसूचा संच त्यांनी लगेचच पाठवून दिला. तसेच बालवाडीमधील मुलांसाठीचे एक सुंदर गीतांचे पुस्तकही पाठवून दिले.

## पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे

वर्धिनीच्या प्रार्थनेतील या ओळी कृतीत आणणारा वर्धक हा अभिमानाचाच विषय. रामकृष्ण शाखेतील युवक श्री. राम जगताप हे पोलीस दलात काम करतात. मुष्टीयुद्धात देशपातळीवरील स्पर्धांमध्ये त्यांनी यापूर्वी अनेकदा चमकदार कामगिरी केली आहेच. परंतु अलीकडेच त्यांनी एक मोठी कामगिरी पार पाडली. रेव्ह पार्टीच्या निमित्ताने पोलीस खात्याने तरुणांना व्यसनाधीन करणाऱ्यांची पाळेमुळे उखडण्यास सुरुवात केली व या कारवाईचा एक भाग म्हणून एका संशयित आडदांड नायजेरियन तरुणाला अटक करण्यात आली. या मोहिमेत श्री. राम जगताप यांचा मोठा सहभाग होता. वर्धिनीच्या युवकाची ही कामगिरी सर्वांनाच अभिमानास्पद आहे.

**प्रत्येक जीवाशी आपल्या आत्म्याचे नाते आहे सांगाव्याचे आचरण आपल्या हातून घडले नाही कारण सहभावाचा ओलाव्याचा अभाव.**

➢ एप्रिल महिन्यात बालवाडीच्या मोठ्या गटासाठी झालेल्या छंदवर्गामध्ये किती वेगवेगळ्या प्रकारच्या प्रदुषणात आपण राहतो, त्याचा आरोग्यावर कसा परिणाम होतो ही गोष्ट सोप्या रीतीने सांगितली जात होती. त्यामुळे मुलांना पाणी कसे प्रदुषित होते. हवा कशी प्रदुषित होते याची थोडी थोडी माहिती मिळाली होती. ध्वनी प्रदुषण म्हणजे काय हेही समजावून सांगितले होते. आपण त्यांना सांगतो आहोत खरे पण मुलं इतकी लहान आहेत की त्यांना त्यातील फार काही समजले नसेल असं कार्यकर्त्यांना वाटत होतं. पण पुढे दिलेल्या दोन प्रसंगामुळे या वयातील मुलांनासुद्धा ही गोष्ट समजू शकते हे लक्षात आले.

- एका पालकांची रिक्षा होती. आपल्या मुलाला रिक्षातून घेऊन जात असताना वर्धिनीच्या छंदवर्गातील त्यांचा मुलगा म्हणाला, 'बाबा! आपल्या रिक्षातून किती धूर येतो आहे त्यामुळे हवेचे प्रदुषण होईल ना! तुम्ही लगेच गाडी दुरुस्तीला द्या.'
- दुसऱ्या एका प्रसंगात छंदवर्गातील एक मुलगी आपल्या पालकांबरोबर एका लग्नाला गेली होती. लग्नाच्या ठिकाणी खूप मोठ्या आवाजातील रेकॉर्डस लावल्या होत्या. त्या ऐकून ती पट्कन म्हणाली, 'आई! किती हे ध्वनीप्रदूषण, यांना समजत कसं नाही.'

## अभिनंदन गंगोत्री समुहाचे....

ऊर्जा विषयात संशोधनाचे काम करणाऱ्या गंगोत्री संस्थेला, अलिकडेच एक पेटंट मिळाले आहे. ज्या विषयातील संशोधनासाठी हे पेटंट मिळाले ते निश्चितच अभिमानास्पद आहे. व त्यासाठी गंगोत्री समुहाचे अभिनंदन करायला हवे.

**गंभीर समस्यांना कारणीभूत ठरणारा प्रश्न - ऊर्जा :** चिरंतन विकासाच्या दिशेने घोडदौड करताना भारतवर्ष अनेक क्षेत्रांत मुसंडी मारत महासत्तेची स्वप्नं पाहत आहे. भारतापुढे 'ऊर्जा' एक मोठा बिकट प्रश्न आ वासून उभा आहे.

हजारो खेडी अद्याप अंधाराने वेढली आहेत. दुसरीकडे औद्योगिक व विकास कामात भार-नियमनाने बाधा आणणारी विजेची तूट वाढतेच आहे.

केवळ किंमत मोजून ऊर्जेचा प्रश्न सुटणारा नाही. पुरवठा व मागणी यांच्या व्यस्ततेत घुटमळणारी आजची आकडेवारी पाहता काही नवीन पर्याय शोधण्याची गरज आहे.

याच ध्येयाने प्रेरित होऊन गंगोत्रीचे श्री. संतोष गोंधळेकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी अथक परिश्रमाने सादर केलेल्या संशोधन प्रकल्पास जागतिक स्वामित्व (Global Patent) मिळाले आहे. अपारंपारिक ऊर्जास्रोत, 'जैव वायू'चे संशोधन व विकास गंगोत्री संस्थेत गेली ४-५ वर्षे अविरत चालू आहे. त्याचीच ही फलनिष्पत्ती आहे. 'जैव वायु' म्हणजे पिष्टमय पदार्थ किंवा शर्करायुक्त शेतीमालापासून तयार केलेला **मिथेन वायू.**

'Three stage Biomethanation' या प्रक्रियेकरिता गंगोत्री समुहाला जागतिक स्वामित्व (Global Patent) बहाल करण्यात आले. 'गंगोत्री'च्या या संशोधन गटामध्ये वर्धिनीचा युवक कार्यकर्ता संजय राचेट्टी याचाही सहभाग होता याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.

**प्रतिकूल परिस्थितीवर मात करणारी वीरताच आपल्या आत्म्यांना उन्मत्त बनवेल, त्यांचा विकास करेल.**

# वर्धिनीत येऊन माझ्यात काय बदल झाले?

वर्धक नव्याने शाखेत येतो ते वेगवेगळ्या आकर्षणाने वर्धिनीच्या कार्यक्रमातून, कार्यकर्त्यांच्या मित्रांच्या अनौपचारिक सहवासातून, संवादातून त्याच्यामध्ये हळूहळू बदल होत असतात. या होणाऱ्या बदलांची जाणीव केव्हा तरी एखाद्या प्रसंगातून होते. युवक शिबिराच्या निमित्ताने उपस्थित युवकांना वर्धिनीत येऊन आपापल्यात काय बदल झाले याविषयी लिखाण करायला सांगितले होते. ही सर्वच टिपणे वाचण्यासारखी, नोंद घेण्यासारखी आहेत. यापैकी स्वत:मधील बदलांसंबंधी काही निवडक निरीक्षणे खालीलप्रमाणे आहेत-

- वर्धिनीत यायला लागल्यापासून शाळेत व्यवस्थित वागायला शिकलो. शाळेतील कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हायला लागलो.
- समोरची व्यक्ती कशा स्वभावाची आहे ते ओळखून त्याच्याशी संवाद करण्याचे कौशल्य माझ्यामध्ये आले.
- शाखेत होणाऱ्या सांघिक खेळांमुळे माझ्यामध्ये संघभावना वाढीला लागली.
- अतिशयोक्ती नाही परंतु जन्मापासून मी वर्धिनीशी जोडले गेलो आहे. माझ्या घराच्या भोवतीचे वातावरण चांगले नाही. भोवतालची अनेक मुलं शाळेत जात नाहीत, व्यसनी आहेत.अशा वेळी मला आधार आहे तो केवळ वर्धिनीचाच.

  वर्धिनीमुळे एका चांगल्या संस्थेचा कार्यकर्ता म्हणून समाजात मला मान मिळतो. वर्धिनीने मला माझी माणसं दिली, माझं भविष्य दिलं, माझा समाज मला दिला.
- शाखेत यायला लागल्यापासून वेगवेगळ्या इयत्तांच्या टप्प्यांवर वेगवेगळे बदल नकळत होत गेले. भाषण करण्याची कला, गीते सांगण्यातील आत्मविश्वास, गटनायकाचे काम पाहू लागल्यावर नेतृत्त्वक्षमतेत झालेली वाढ असे अनेक बदल सांगता येतील. शाखेची मोठी जबाबदारी सांभाळताना तर माझ्या स्वभावातच बदल झाला. शिव्या देण्याची माझी सवय मोडली गेली. वाईट गोष्टींबद्दल आवाज उठवण्याची हिंमत माझ्यात आली.
- शाखेत छोट्या वर्धकांचा 'दादा' म्हणून काम करायचो तेव्हा माझ्यात मताला मान मिळायचा पण घरात सगळ्या धाकटा त्यामुळे माझे मतही ऐकून घेतले जायचे नाही. त्यामुळे माझ्यातील अहंकार अनेकदा उफाळून येतो व घरातील मोठ्यांशी मी उद्धटपणाने वागतो. माझे हे वागणे चूक आहे हे समजते पण अजून हा दुर्गुण पूर्णपणे गेला नाही.

  वर्धिनीत यायला लागल्याने मी माझ्या आईला किमान वाचायला व सही करायला शिकवू शकलो. फक्त स्वत:चा विचार करायचा नाही सर्वांना सोबत न्यायचे असते हा विचार वर्धिनीमुळे माझ्यात भिनला.
- शाखेत मैदानी खेळ खेळू लागल्याने कबड्डी सारख्या खेळात शाळेकडून मी जिल्हा पातळीपर्यंत खेळू शकलो. माझ्यातील सामाजिक जाणीव जागृत झाली. संक्रांत उत्सवातील प्रात्यक्षिकांतून धाडसाचा अनुभव मिळाला.
- माझ्यातील आशावादी वृत्ती वाढली. दुसऱ्याचे मत ऐकण्याची सवय वर्धिनीतच लागली.

**लहानपणापासूनच रचनात्मक, शक्तिदायी आणि सहाय्यक विचारांना तुमच्या मेंदूत प्रवेश करू द्या.**

- वर्धिनीत येत असल्याने मित्रांची कमतरता कधीच वाटली नाही.
- वर्धिनीत आल्यापासून वक्तशीरपणा, नीटनेटकेपणा या गुणांबरोबरच सर्वधर्म समभावाचा संस्कार माझ्यावर वर्धिनीतच कोरला गेला. वर्धिनीतील संस्कारांमुळे शाळेचा 'आदर्श विद्यार्थी' पुरस्कार मला मिळाला.
- वर्धिनीत मी एक गोष्ट निश्चित शिकलो ती म्हणजे कोणत्याही परिस्थितीत घाबरून न जाता परिस्थितीचा सामना करणे. वर्धिनीत आल्यामुळे बाहेरच्या जगात टिकायचे कसे, वागायचे कसे हे शिकलो. समाजाबद्दल आपलीही काही जबाबदारी आहे याची जाणीव जागृत झाली.

●●●

## एक विलक्षण जिद्दीचा प्रवास

परमेश्वर कधी कधी खूप कठोर परीक्षा पाहतो. परिस्थितीची प्रतिकूलता रोजचे जगणंसुद्धा कठीण करून टाकते. पण अशाही परिस्थितीत जिद्दीच्या बळावर माणसं जेव्हा यशाचे शिखर गाठतात तेव्हा मिळणारा आनंद हा शब्दात व्यक्तही करता येत नाही.

वर्धिनीच्या शाखेची एक कार्यकर्ती तशी अकरावीमध्ये असताना वर्धिनीच्या संपर्कात आली. अकरावीपर्यंतचा तिच्या आयुष्याचा प्रवास हा खूप खाचखळग्यांच्या, जातियतेची झळ सोसायला लावणारा होता. परिस्थितीच्या तडाख्यात निवारासुद्धा एका जागी स्थिर राहू शकला नाही. वेळ आली तेव्हा पदपथावरही मुक्काम करावा लागला. अशा परिस्थितीत शिक्षणात सातत्य कुठून राहणार? असे तडाखे खात खात नियतीला पराभूत करण्याची जिद्द मनात बाळगत ही कार्यकर्ती शिकत होती. वाट्याला आली ती सर्व कष्टाची कामे करीत होती. अफाट कष्ट आर्थिक विवंचना आणि सामाजिक उपेक्षा वाट्याला येऊनही तिच्या मनातील शिकण्याची उमेद खचली नाही. स्वार्थी आणि जातींच्या झापडांमधून पाहणारा अन् व्यवहार करणारा समाज तिनं अनुभवला होता आणि त्यामुळे अशा समाजाविषयी तिच्या मनामध्ये एक विलक्षण संताप होता. अशाच वळणावर तिचा वर्धिनीत प्रवेश झाला आणि पाहता पाहता आपण किती मोठ्या कुटुंबात आलो याच्या अनुभूतीने तिच्या चेहऱ्यावर हास्य फुलू लागले. तिला जिवाभावाचे बहिणभाऊ तर मिळालेच पण शिक्षणासाठी, पुढे जाण्यासाठी प्रेरणाही मिळाली. स्वतःचे शिक्षण पूर्ण करता करता वर्धिनीतील लहान भावंडांची ती ताई झाली. कार्यकर्ती म्हणून कामात समरस होऊन गेली. आज स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर एका महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून काम करीत आहे. जो आदर्श विचार वर्धिनीचे काम करताना ऐकला, पाहिला, अनुभवला तो विचार ती आता महाविद्यालयातील आपल्या विद्यार्थ्यांमध्ये रुजवते आहे. एका जिद्दीच्या प्रवासाची ही सत्यकथा अनेकांना प्रेरणा देते आहे.

**धीट व्हा, साहसी व्हा- माझ्या संतानांनी प्रथम वीर बनले पाहिजे.**

# स्वप्न प्रबळ भारताचे

भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या देशातील तरुण पिढीला २०२० साली भारताला एका प्रबळ राष्ट्राच्या स्वरूपात जगात स्थान मिळवून देण्याचं स्वप्न दिले आहे. आज भारतीय युवापिढी ज्या आत्मविश्वासाच्या बळावर जगातील अनेक देशांमध्ये नाव कमावते आहे, आपल्याबद्दल आकर्षण निर्माण करते आहे ते पाहता हे स्वप्न साकारले जाणे अशक्य नाही. अर्थात नुसती स्वप्ने बघून ती साकारण्याची शक्ती येत नाही. अशी भव्य दिव्य स्वप्ने साकारण्यासाठी प्रचंड जिद्द, कष्ट या गुणांची जोपासना जाणीवपूर्वक करावी लागेल. गेल्या ६० वर्षांमध्ये आपण जी प्रगती केली आहे ती आपल्या क्षमतांच्या मानाने फारशी समाधानकारक नाही असे तज्ज्ञ सांगतात. याचाच अर्थ आपल्यामध्ये काही कमतरता आहेत, ज्या आपल्याला प्रयत्नपूर्वक दूर कराव्या लागतील. याच हेतूने वेगवेगळ्या क्षेत्रातील मान्यवरांना सर्वश्री. शिरीष पटवर्धन, जयंत कवठेकर, पराग लकडे व संजय राचेल्ली यांनी समक्ष भेटून त्यांच्या खालील प्रश्नांवर आधारित मुलाखती घेतल्या. कामाचा प्रचंड व्याप असूनही, केवळ वर्धिनीच्या कामावरील त्यांच्या आत्मियतेमुळे, वेळ काढून त्यांनी त्यांची मते विस्ताराने व्यक्त केली. ती लेखस्वरूपात या अंकामध्ये प्रसिद्ध करीत आहोत. पहिल्या भेटीत एकूण प्रश्नांसंबंधी चर्चा, दुसऱ्या भेटीत लेखासाठीची मुलाखत आणि तिसऱ्या भेटीत लेखाचा मसुदा तपासून त्यामध्ये आवश्यक असेल तर काही बदल करणे, भर घालणे अशा जवळपास तीन वेळा झालेल्या सविस्तर भेटीतून हे लेख सिद्ध झाले आहेत. यासाठी सर्व तज्ज्ञांविषयी मनापासून कृतज्ञता व्यक्त करीत आहोत. या सर्व तज्ज्ञांचे विचार आणि आगामी वाटचालीला निश्चित मार्गदर्शक ठरतील असा विश्वास आहे.

## प्रश्नावली

१) स्वातंत्र्याचा हीरक महोत्सवाच्या टप्प्यावर आपल्या देशाने जी वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केली आहे त्याविषयी आपल्याला काय वाटते? हा प्रगतीचा वेग आपल्या दृष्टीने समाधानकारक आहे का? वेग समाधानकारक वाटत नसल्यास तो तसा होण्यासाठी कोणते बदल, कोणत्या पातळीवर करावे लागतील असे आपल्याला वाटते?

२) आपल्या देशाच्या सर्वांत मोठ्या ताकती कशात आहेत आणि देशापुढील सगळ्यात मोठी संकटे/आव्हाने कोणती आहेत असे आपल्याला वाटते?

३) आपला देश सामर्थ्यशाली होण्यासाठी कशा प्रकारचा आव्हानांचा, बदलांचा विचार आत्तापासून करावा लागेल असे आपल्याला वाटते?

४) देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये सेवाभावी संस्थांच्या आजवरच्या योगदानाबद्दल आपले काय मत आहे?

५) देश सामर्थ्यशाली होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांमध्ये सेवाभावी संस्था कोणती भूमिका बजावू शकतील असे आपल्याला वाटते?

६) देश सामर्थ्यशाली होण्यासाठी प्रचलित शिक्षणप्रणालीमध्ये काही बदल करायला हवे आहेत असे आपल्याला वाटते का? असल्यास कशा प्रकारचे बदल आपण सुचवाल?

७) सेवाभावी संस्थांनाही आपल्या कामाच्या पद्धतीत काही बदल करावे लागतील असे आपल्याला वाटते का? हे बदल कसे व्हायला हवे असे आपल्याला वाटते?

८) व्यक्तिगत पातळीवरही देश विकासाचे कोणते प्रयत्न होऊ शकतात असे आपल्याला वाटते?

**तुमच्यामधील ईश्वरत्व प्रकट करा, मग त्याच्या भोवती सर्व गोष्टींची सुसंगतपणे जुळणी होऊन जाईल.**

# जर भारतीय पूर्ण कार्यक्षमतेने काम करू लागले...

**श्री. प्रताप गोविंद पवार**

*श्री. प्रताप गोविंद पवार यांनी बिर्ला इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड सायन्सेस या संस्थेतून इंजिनिअरिंगची पदवी धारण केली असून दै. सकाळ या आघाडीवरील वृत्तपत्राचे ते संचालक व व्यवस्थापकीय संपादक आहेत. अजय मेटॅकेम ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे ते चेअरमन आहेत. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंडस्ट्रीज अँन्ड ॲग्रिकल्चर, प्रेस काऊन्सिल ऑफ इंडिया, पुणे विद्यापीठ, कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे अशा देशातील अनेक अग्रगण्य शासकीय व स्वायत्त संस्थांचे सभासद व पदाधिकारी म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले आहे. 'वर्ल्ड असोसिएशन ऑफ न्युजपेपर्स' या जागतिक पातळीवरील संस्थेचे ते २००७ पासून उपाध्यक्ष आहेत. अनेक सामाजिक संस्थांच्या प्रत्यक्ष कामात त्यांचा सहभाग असून ते **'स्व'-रूपवर्धिनीचे विद्यमान उपाध्यक्ष*** आहेत.

स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवाच्या टप्प्यावर आपल्या देशाच्या केलेल्या वाटचालीकडे पाहताना एक गोष्ट नक्की म्हणता येते की आपण चांगली प्रगती केली आहे. प्रगतीच्या वेगाबद्दल समाधानी आहे असे म्हणता येत नाही कारण प्रगती ही सतत घडत राहणारी प्रक्रिया आहे. आपल्या देशाच्या प्रगतीची तुलना अन्य विकसित देशांशी करून काहीजण आपल्या देशाच्या पगतीच्या वेगाविषयी थोडे अस्वस्थ होतात. माझ्या मते अशी तुलना करू नये. ऑलिंपिक सारख्या क्रिडा स्पर्धांमध्ये पहिला येणारा आणि दुसरा येणारा यांच्यामध्ये तसा गुणवत्तेत फरक काही नसतो. दुसऱ्या क्रमांकावरचाही खेळाडू तितक्याच क्षमतेचा असतो. एका व्यक्तीच्या हातात सत्ता एकवटलेली असेल आणि ती व्यक्ती जर दूरदृष्टीची असेल तर ते देश वेगाने प्रगती करतात. सिंगापूर, मलेशिया अशा देशाची उदाहरणे यासाठी देता येतील. अशा देशांचा प्रगतीचा वेग आपल्यापेक्षा निश्चितच जास्त आहे. पण आपल्या देशाने लोकशाही पद्धत स्वीकारली आहे. लोकशाही पद्धतीत एखादा निर्णय घ्यायला अधिक वेळ जातो. त्याचा परिणाम प्रगतीच्या गतीवर होऊ शकतो हे खरे आहे. लोकशाही पद्धतीत परिवर्तनाला वेळ लागतो. लोकशाहीच्या या मर्यादा मान्य करूनही मी लोकशाहीच पसंत करीन. आफ्रिका, पाकिस्तान अशा देशांच्या तुलनेत लोकशाही पद्धत स्वीकारूनही आपण प्रगती चांगली केली आहे असे दिसेल.

पंडित नेहरू यांनी देशाच्या विकासाचा विचार करताना मोठे मोठे कारखाने, अवजड उद्योग यांचा विचार केला. तो करीत असताना त्यांच्या डोळ्यासमोर सामाजिक हित होते. खूप मोठ्या संख्येने लोकांना या उद्योगांमुळे नोकऱ्या मिळाल्या. त्यामुळे मोठ्या संख्येने असलेल्या कामगारांच्या हिताचे दृष्टीने कामगार कायद्यांसारखे कायदे आले. त्यावेळच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर ते बरोबरच होते, पण त्यावेळी बरोबर असलेल्या गोष्टी कायमच्यासाठी बरोबर असत नाहीत.लोक जेव्हा उपाशी होते तेव्हा त्यांना संरक्षण मिळणे गरजेचे होते. कोणी त्यांच्या स्थितीचा गैरफायदा घेऊ नये हे पाहणे गरजेचे होते पण आर्थिक स्थितीत बदल होत गेल्यानंतरही त्याच प्रकारचे संरक्षण चालू राहणे उचित नाही. अशा संरक्षण देणाऱ्या गोष्टींचे परिणाम देशाच्या प्रगतीच्या वेगावर होतात

**आज आपल्या देशाला लोखंडी स्नायूंची आणि पोलादी मज्जातंतूंची खरी गरज आहे.**

आणि त्यामुळेच काही काळापूर्वी आमच्या प्रगतीच्या अल्प दराची जगातील विकसित देश 'Hindu rate of progress' अशी थट्टा करीत असत.

आपल्या देशाच्या प्रगतीचा वेग समाधानकारक आहे की नाही याचे उत्तर हो किंवा नाही असे देता येणे अवघड आहे कारण समाधानाला अंत नाही. देशाच्या प्रगतीचा वेग वाढण्यासाठी समर्थ समाज, दूरदृष्टीचे नेतृत्त्व आणि प्रभावी शासन यंत्रणा या तीनही गोष्टींची गरज असते. ज्यांच्याकडे क्षमता आहे त्यांना उत्तेजन दिले तर प्रगती होते असा अनुभव सर्वत्र येतो. सर्वच गोष्टी सरकार करायला लागले तर लोकशाही पद्धतीत प्रगतीला मर्यादाच येतात. याउलट सरकारने प्रोत्साहन दिले तर एखाद्या क्षेत्रात प्रचंड वेगाने क्रांती होते. उदाहरण घ्यायचे झाले तर टेलिफोन क्षेत्राचे देता येईल.एक काळ असा होता की फोन मिळण्यासाठी प्रतिक्षा यादी होती. शासन यंत्रणेने हे क्षेत्र खाजगी उद्योगांना खुले केले आणि त्या क्षेत्रात आपण कमालीची क्रांती आपण अनुभवत आहोत. रस्त्यावर भाजी विक्री करणाऱ्या सामान्य भाजीवाल्या महिलेच्या किंवा वॉचमनच्या हातात आज मोबाईल फोन पाहून कोणाला आश्चर्य वाटत नाही.

आपल्या देशात प्रगतीचा वेग गेल्या १० वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात झाला. ती प्रगती पाहून आपण पुन्हा तुलना करायला लागतो की प्रगत देशातील लोक कुठे आणि आपल्या देशातील सामान्य माणसांना काय मिळाले. अशी तुलना करण्याची आवश्यकता नाही. गेल्या पाच वर्षांमध्ये दरवर्षी २५ ते ३० % अधिक करआकारणी होत आहे हे सरकारच सांगते आहे. हे घडते आहे निर्मितीमुळे. निर्मितीला प्रोत्साहन दिले तर असे चित्र दिसणे स्वाभाविक आहे. पण अशारीतीने सरकारच्या गंगाजळीत पडणाऱ्या संपत्तीचा विनियोग चांगल्या प्रकारे करता यायला हवा. जर सरकारच म्हणत असेल की जेव्हा १०० रुपये देशातील नागरिकांसाठी खर्च केले जातात त्यातील फक्त १४ रुपयांचाच लाभ नागरिकांना मिळतो, ८६ रुपये मध्येच गळतात. असे १०० रुपयातील ८६ रुपये गमवायला आम्ही श्रीमंत देश आहोत का? उपहासाने आपल्यासंबंधी जे म्हटले जाते की 'India is a rich country where poor people live' ते अशा कारणांमुळे. जर सरकारची क्षमता नसेल तर सरकारने ज्यांच्याकडे क्षमता आहे अशा लोकांवर कामे सोपविली पाहिजेत. पुण्यातील पी.एम.टी.चे उदाहरण यासाठी पुरेसे आहे. शेकडो कोटी रुपयांचा तोटा होऊनही जर महापालिका म्हणत असेल की, पी.एम.टी. आम्हीच चालविणार तर त्याला काय म्हणायचं? अशा क्षेत्रात ज्यांच्याकडे ती क्षमता आहे, गुणवत्ता आहे त्यांना संधी द्या हेच त्याचे उत्तर असू शकते. पण असे घडताना दिसत नाही कारण त्यामागे अनेकांचे vested interests असतात आणि त्यांना जाब विचारणारे कोण आहे? यासाठी समर्थ जनता उभी राहायला हवी. जोपर्यंत जनता समर्थ नाही तोपर्यंत हे चित्र असेच राहील. आम्हाला सुधारणा हव्यात. त्या गतीनेही व्हायला हव्यात पण त्यासाठी पैसा कोठून आणणार? सरकारच्या कार्यक्षमतेला मर्यादा आहेत मग सुधारणेच्या प्रक्रियेला मर्यादा पडतात. १९९१ ची परिस्थिती काय होती? देश दिवाळखोरीच्या टोकावर

**उठा, धीट बना, शक्तिसंपन्न बना. तुम्ही सगळी जबाबदारी स्वतःच्या शिरावर घ्या आणि जाणून असा की, तुम्हीच आपल्या भाग्याचे निर्माते आहात.**

होता. आमच्यावरच्या कर्जाचे व्याजही आम्ही भरू शकत नसल्याने सरकारी तिजोरीतील सोने तारण म्हणून ठेवायची वेळ आपल्या देशावर आली होती. पण त्यानंतर आपण जी आर्थिक नीती स्वीकारली, खुलेपणा स्विकारला त्यामुळे खाजगी क्षेत्रातील क्षमता असलेल्या शक्ती पुढे आल्या आणि यातून देशाचे आर्थिक चित्र बदलते आहे हे आपण पाहतो आहोत. अंबानी, टाटा आणि सामान्य माणूस यांच्यात फरक राहणार आहेच. पण त्यांच्या उद्योग व्यवसायातून निर्माण होणारा पैसा देशातच राहणार असल्याने त्याचा अंतिमत: फायदा सर्वसामान्य जनतेचाच होणार आहे. सामान्य माणसाच्या जगण्याच्या स्थितीत काहीच फरक झाला नाही, काही प्रगती झाली नाही असे आपण म्हणू शकणार नाही. तुम्ही स्पर्धा आणा की त्या स्पर्धेमुळे गुणवत्तेत फरक पडतो, सेवा देण्यात फरक पडतो, किमतीत फरक पडतो म्हणजे सरते शेवटी जो लाभार्थी ग्राहक आहे त्याचा फायदा होतो. या स्पर्धेमध्ये काही जण बाहेर फेकले जाणार हे निश्चित पण त्याची चिंता करण्याचे कारण नाही. या प्रोसेसमध्ये ज्याचा निभाव लागणार नाही तो बुडालेलाच बरा. ज्यांच्याकडे बुद्धी आहे, शक्ती आहे ते प्रथम प्रगती करतात. अशी संख्या कोठेही २ ते ३ % इतकीच असते. त्याची काळजी न करता या २ ते ३ % लोकांनी केलेल्या प्रगतीचा फायदा उरलेल्या ९७-९८ % लोकांना कसा देता येईल याचा विचार करा.

आपल्या देशातील तरुण ही आपल्या देशाची आगामी काळात सगळ्यात महत्त्वाची ताकत बनणार आहे. सामान्यपणे काही हजार वर्षांनी अशी स्थिती येते. या संधीचा उपयोग आपण करू शकलो पाहिजे. युरोपियन देशात नेमके उलटे चित्र आहे. तेथे आगामी काळात वृद्धांची संख्या अधिक होणार आहे. आपल्या देशातील या तरुण शक्तीला आपण संधी देऊ शकतो आहोत का? या तरुणांच्या विकासासाठी आमच्याकडे आवश्यक त्या सोयीसुविधा आहेत का? याचा विचार आपण केला पाहिजे अन्यथा या तरुण शक्तीचा काय उपयोग? त्यांच्या क्षमतांचा काय उपयोग? जिथे अज्ञान आणि दारिद्र्य असते तेथे नक्षलवाद उभा राहतो आणि त्यात काय चूक आहे? अज्ञान, दारिद्र्याच्या निवारणासाठी प्रामाणिक प्रयत्न होत नसतील तर असे घडणार. काही विशिष्ट धर्म-पंथ आपल्या अनुयायांमध्ये विकासाच्या क्षमता निर्माण होऊच देत नाही. त्यांना फक्त धार्मिक कडवेपणाच शिकवतात. अशा धर्म-पंथांतील अनुयायांची प्रगती कशी होणार? शिक्षण मिळले, संधी मिळाली तर चित्र बदलते. आमची लोकसंख्या खूप मोठी, आमच्याकडे भाषा अनेक, धर्म-जाती अनेक त्यामुळे विकास प्रक्रियेमध्ये अनेक समस्या निर्माण होतात. अशा स्थितीत ज्यांचे बरे चालले आहे, समाजातील अशा घटकांनी ज्यांची काहीच व्यवस्था नाही अशांसाठी काहीतरी केले पाहिजे. आज वेगवेगळ्या उद्योगसमुहांमध्ये सामाजिक जबाबदारीची ही जाणीव वाढताना दिसते आहे आणि हे चांगले लक्षण आहे.

ब्रेन-ड्रेनविषयी आम्ही खूप बोलतो. आपल्या देशात काही काळापूर्वी असे चित्र होते की खूप मोठ्या संख्येने बुद्धिमान विद्यार्थी विदेशात शिकायला आणि नोकरी करायला जात होते आणि आम्ही त्यांच्या जाण्याविषयी नाराजी प्रकट करीत होतो. जे शिकायचे

**माझ्या वीर युवकांनो, विश्वास असू द्या की, तुम्ही सर्वजण महान कार्ये करण्यासाठी जन्मास आला आहात.**

आहे त्याची व्यवस्था नाही, संधी नाही, पुरेसा पगार आणि सुविधा नाही अशा स्थितीत बुद्धिमान तरुण विदेशांकडे आकर्षित झाला. पण त्यांच्या विदेशात जाण्याचा एक फायदा देशाला नक्की झाला तो म्हणजे देशाच्या गंगाजळीमध्ये चांगली भर पडली. आज आपल्याच देशात शिक्षणाच्या उद्योगव्यवसायांच्या संधी निर्माण होत आहेत त्यामुळे विदेशातील भारतीय तरुण पुन्हा परत यायला लागले आहेत.

आमच्याकडे काय नाही? नैसर्गिक संपदा आहे, बुद्धिमत्ता आहे, विकासाची क्षमता आहे. तरीही आमची प्रगती वेगाने होत नाही कारण आमच्याकडे कोणतीही गोष्ट सहजपणे आणि चटकन् होत नाही. शासकीय नियमांचे अडथळे प्रगतीला खीळ घालतात. कोणी व्यवस्थेचा गैरफायदा घेत असेल तर त्याला शासन झालेच पाहिजे. पण याचा अर्थ सर्वांकडे संशयानेच बघायचे असा होत नाही. इंग्रजांची आपल्या देशावर सत्ता होती तेव्हा त्यांनी त्यांना नियंत्रणाला अनुकूल असे कायदे केले. आज इंग्रज गेल्यानंतरही आपण तीच यंत्रणा कायम ठेवली, कायदा तसाच ठेवला. मग विकास वेगाने कसा होणार? समाजाला विकासाचा फायदा लगेच कसा मिळणार? सरकारी यंत्रणेतील बहुतेक सर्व माणसं काम करीत नाही आणि तरीही तुम्ही त्यांना काही करू शकत नाही अशी व्यवस्था असताना प्रगती होणार नाही. विदेशांमध्ये अधिकाधिक संशोधन विद्यापिठांमध्ये होते. आपल्याकडे काय स्थिती आहे? विद्यापीठ स्तरावर किती संशोधनाचे काम होते? शिकविणाऱ्या प्राध्यापकांचे त्यांच्या त्यांच्या विषयातील ज्ञान किती अद्ययावत असते? यामध्ये सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. आम्ही आमच्याकडच्या उपलब्ध संशोधनांचा सर्वोत्तम उपयोग करण्याची सवय लावून घ्यायला हवी. आम्ही पाणी वाया घालवतो, अन्नधान्य वाया घालवतो, वेळ वाया घालवतो, अशा देशाची प्रगती वेगाने होणार नाही. आमच्या देशाला निसर्ग अनुकूल आहे याचा आपण किती फायदा घेतो? युरोपसारख्या देशांमध्ये पेपर निर्मितीसाठी लागणारे बांबूचे झाड तयार व्हायला ७०-७५ वर्षे लागतात आणि आमच्याकडे ऊन आणि अनुकूल हवामानामुळे हेच झाड १० वर्षांत तयार होते. या अनुकुलतेचा आम्ही किती उपयोग करून घेतला?

आम्ही २००८ मध्ये असलो तरी अनेकदा १८६४ चा कायदा आम्ही तसाच चालवतो. घरमालक-भाडेकरू कायद्याचा विचार केला तर हे अधिक स्पष्ट होईल. भाडेकरूंच्या बाजूने निकाल लागला तर सामाजिक न्याय आणि मालकांच्या बाजूने लागला तर अन्याय अशी भूमिका घेऊन मुंबईसारख्या शहरातील जागेचे प्रश्न कसे सुटणार? दोन्ही बाजूंनी यात पारदर्शकता आली, कायद्यातील तरतुदींचा गैरफायदा घेण्याचे टाळले तर मुंबईसारख्या ठिकाणी कितीतरी जणांना राहण्यासाठी चांगल्या जागा उपलब्ध होतील, त्यासाठी झोपडपट्ट्यांमध्ये राहावे लागणार नाही. परंतु सामाजिक आणि राजकीय अपरिहार्यतेच्या नावाखाली आपण कायद्यातील तरतुदी बदलण्याचे टाळतो.

मुंबईचा माल बेंगलोरला पोहोचायला जर ७-७ दिवस लागतात. तर हा वेळ कमी कसा करता येईल याचा विचार व्हायला हवा. लाखो करोडो रुपयांचे हा

**चारित्र्याचाच सर्व ठिकाणी जय होतो.**

माल नियमांच्या जंजाळात ७-७ दिवस पडून राहिला तर त्यासाठी गुंतवलेल्या पैशाच्या व्याजाचे जे नुकसान होते त्याची जबाबदारी कोणाची? ऑक्ट्रॉय काढून टाकला तर नाक्यावरच्या गाड्यांच्या रांगा आणि माल वेळेवर पोहोचण्यात होणारी दिरंगाई टळेल, ग्राहकाला आणखी कमी किमतीत वस्तू मिळू शकतील. पण शासन यंत्रणेने केवळ उत्पन्नाचे साधन म्हणून असे कर चालू ठेवले तर कसे चालेल. लोकांना जर वस्तू कमी दरात उपलब्ध झाल्या तर त्यांची क्रयशक्ती वाढणार आहे आणि वाढत्या क्रयशक्तीचा फायदा हा शेवटी सरकारी कोषाला होतोच.

देशाच्या विकासाच्या कामात सेवाभावी संस्थांची निश्चित भूमिका आहे परंतु ती तितक्या परिणामकारकतेने काम करू शकलेली नाही असे माझे मत आहे. याचे कारण सेवावृत्तीने समाजाची मनोभावे सेवा करणारी माणसे मुळातच संख्येने कमी आणि अशा व्यक्तींचे निम्मे आयुष्य हे त्यांनी पत्करलेले काम चालू राहण्यासाठी निधी गोळा करण्यात जाते. अगदी महर्षी कर्व्यांपासून ते किशाभाऊ पटवर्धनांपर्यंतच्या समाज कार्यकर्त्यांच्या बाबतीत हेच घडलं. अशा व्यक्तींनी अंगिकारलेल्या सामाजिक कामांना शासनाचे कोणते प्रोत्साहन आहे? उलट अशा संस्थांना ८०-जी सारख्या सवलती मिळवताना सरकारी यंत्रणांकडून अडथळे निर्माण केले जातात. अशा परिस्थितीत सेवाभावी संस्था किती प्रभावीपणे देश विकासाच्या कामात योगदान देऊ शकतील? याउलट अमेरिकेसारख्या देशाचे उदाहरण पाहिले पाहिजे. या देशात ५०० बिलियन डॉलर (सुमारे दोन लाख कोटी रुपये) एवढी मोठी रक्कम प्रतिवर्षी समाजाने दिलेल्या देणग्यांतून सेवाभावी संस्थांना मिळते. तेथील समाजाच्या, शासनाच्या अशा प्रोत्साहनातून मोठी मोठी विद्यापिठे उभी राहिली आहेत. हे त्या समाजाचे वैशिष्ट्य आहे आणि यातून आपण काहीतरी शिकलं पाहिजे.

सेवाभावी संस्थाच काय पण एखादी व्यक्तीसुद्धा देशाच्या विकासासाठी लहान-मोठे योगदान देऊ शकते. डॉ. महमद युनुस यांचे उदाहरण जगासमोर आहे. बचत गटाच्या संकल्पनेतून त्यांनी बांगला देशाच्या विकासासाठी जे योगदान दिले आहे ते अजोड आहे आणि म्हणूनच जगाने नोबेल पारितोषिक देऊन त्यांच्या या कर्तृत्वाचा गौरव केला. सामान्य माणसामध्ये ही शक्ती असते म्हणूनच ओला कचऱ्याचा कसा उपयोग करता येऊ शकतो याविषयी सकाळ सारख्या वृत्तपत्रातून सामान्य लोकांनी केलेल्या प्रयोगाला प्रसिद्धी दिली जाते. अशा प्रयोगातून सामान्य माणसंही देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये आपले योगदान देऊ शकतात.

प्रसार आणि प्रचार माध्यमांचा विचार केला तर आज या क्षेत्रात प्रचंड स्पर्धा आहे आणि त्यामुळे पहिली लढाई ही जगण्याची राहते. प्रसार आणि प्रचार माध्यम हे आज समाज शिक्षणाचे माध्यम राहिले नसून तो एक व्यवसाय झाला आहे तसंच समाजाच्या बदलत चाललेल्या स्थितीचेही काही वेगळे परिणाम याही माध्यमावर होतात. लोकमान्य टिळकांच्या वेळचा समाज आणि आजचा समाज यात कमालीचा बदल झालेला आहे. आज प्रत्येक मिनिटाला माहिती उपलब्ध होण्याचे अनेक स्रोत सर्व समाजाला सहज

**पाश्चात्य देशात येण्यापूर्वी मी भारतावर प्रेम करीत असे. आता तर भारतातील धूळदेखील मला पवित्र वाटू लागली आहे.**

उपलब्ध आहेत अशा वेळी समाजाला काहीतरी नवी माहिति सांगण्यासाठी, समाजाचे शिक्षण करण्यासाठी मोठ्या नेत्याची आवश्यकता राहिलेली नाही.

देश विकासाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षण क्षेत्राची फार मोलाची भूमिका असू शकते पण आपल्याकडे काय चित्र दिसते? मुलांचा ओढा एका विषयाकडे असतो आणि पालकांना त्यांनी दुसरेच काहीतरी व्हावे असे वाटते. सर्वोत्तम बुद्धिमत्तेची मुलं खूप मोठ्या संख्येनी इंजिनियरींग आणि इलेक्ट्रॉनिक्स विषयांकडे वळतात परंतु त्यातील ३० ते ४० % विद्यार्थी पुढे अत्यंत सामान्य कामासाठी आपले आयुष्य वाया घालवतात. त्यांच्या बुद्धिमत्तेचा उपयोग संशोधनाच्या कामासाठी किती होतो? अलिकडेच एक गणितज्ज्ञांची परिषद झाली आणि या परिषदेत एक खंत व्यक्त करण्यात आली की गणितासारख्या विषयात करियर करायला, संशोधन करायला पुरेसे विद्यार्थीच मिळत नाहीत. असे का घडते? कारण पहिला प्रश्न पोटाचा. अशा तीव्र स्पर्धेच्या वातावरणात ज्या क्षेत्रातून पैसे खात्रीने मिळणार तिकडे गर्दी होते. एखाद्या विषयाची आवड असलेली व्यक्ती त्याच क्षेत्रात करियर म्हणून जाण्यासाठी त्याही क्षेत्रात उत्तम पैसे मिळतील अशी स्थिती निर्माण करावी लागेल. त्यासाठी लागेल प्रचंड पैसा आणि हा पैसा उभा राहण्यासाठी लागेल उद्योगांचे जाळे. हे एका साखळीसारखे आहे.

आपण आपली तुलना अमेरिका आणि चीन अशा देशांशी करण्याची फारशी आवश्यकता नाही. आपण प्रत्येकाने जर आपला देश सधन कसा होईल आणि ज्ञानी कसा होईल याची काळजी घेतली तर आम्ही जगामध्ये प्रबळ देश म्हणून ओळखले जाऊ. आम्हाला आमच्याच शक्तीचा/कार्यक्षमतेचा अंदाज नसतो. एखादा भारतीय भारताच्या प्रगतीबाबत बोलताना अनेक तक्रारी करेल पण जग आमच्याकडे वेगळ्या दृष्टीने पाहते आहे. एका डोईश बँकेच्या अहवालात म्हटले आहे की भारतीय लोक अनेक अडथळे सातत्याने असूनही ८-९ % आर्थिक प्रगतीचा वेग राखतात ही फार कौतुकास्पद गोष्ट आहे. हेच भारतीय जर पूर्ण कार्यक्षमतेने काम करू लागले, उपलब्ध संसाधनांचा सर्वोत्तम उपयोग करू लागले, जागरूकतेने वागू लागले तर मग या देशाच्या विकासाचा दर किती होईल याची आपणच कल्पना करू शकतो.

या देशातील प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, प्रत्येक गाव देशाच्या विकासामध्ये प्रभावी भूमिका बजावू शकतो हे निश्चित. दोष देत राहण्यापेक्षा मार्ग शोधू या.

With Best Compliments From :

**ADEPT FLUIDYNE PVT. LTD.,**

Plot No. 4, S. No. 17/1-B, Kothrud Industrial Estate,
Kothrud, Pune 411 038
Phone : 25431474, 25441124, 25464551

**पाश्चात्त्य देशात आल्यानंतर आता भारत मला परमपवित्र धाम वाटतो, तो माझ्या लेखी आता एक तीर्थक्षेत्रच होऊन बसला आहे.**

# भारताचिया महारथा या सारे मिळूनी ओढू या!

**श्री. प्रमोद चौधरी**

*प्राज इंडस्ट्रीज लिमिटेड या कंपनीचे चेअरमन श्री. प्रमोद चौधरी यांनी आय.आय.टी., पवई येथून शिक्षण पूर्ण केले असून १९८४ मध्ये त्यांनी कंपनीची स्थापना केली. प्राज कंपनीकडे जग 'Biotech Processes and systems' या विषयातील ज्ञानाच्या स्त्रोताचे ठिकाण म्हणून पाहते आहे. श्री. चौधरी हे National Biofuels Policy समितीचे ते सदस्य असून राष्ट्रीय नियोजन समितीतही त्यांनी योगदान दिलेले आहे. त्यांना जागतिक मराठी चेंबर ऑफ कॉमर्सने उद्योजकता पुरस्कार देऊन तर आय.आय.टी. पवईच्या 'Distinguished Alumnus Award' देऊन सन्मानित केले आहे. 'As Is What Is' या पुस्तकात प्राज कंपनीची यशोगाथा शब्दांकित झालेली आहे. श्री. प्रमोद चौधरी हे 'स्व'-रूपवर्धिनीचे **सन्माननीय सभासद** आहेत.*

देशाच्या आजवरच्या विकाससंबंधी जेव्हा माझ्या मनात आपल्या देशाचा विचार येतो तेव्हा भारताचा एक नागरिक म्हणून मला असे वाटते की, आपल्या देशाने आजपर्यंत जी प्रगती केली आहे ती समाधानकारक आहे. सर्वच क्षेत्रात ही प्रगती समाधानकारक झाली आहे किंवा नाही या विषयी अनेक मते असू शकतील, परंतु एकूण विचार केला तर मला ही प्रगती समाधान देणारी वाटते. मी जेव्हा म्हणतो की, आपल्या देशाने समाधानकारक प्रगती केली आहे, तेव्हा माझ्या डोळ्यासमोर दोन टप्पे येतात- १) पंडित जवाहरलाल नेहरू यांनी आखलेली प्रगतीची दिशा. ज्यामध्ये स्टील इंडस्ट्रीज सारख्या अवजड उद्योगांच्या उभारणीचा विचार केला होता आणि २) १९९० पासून आपल्या देशाने स्वीकारलेली आर्थिक नीति. १९९० साली जी आर्थिक नीति आपण स्विकारली ती जर १९८० मध्ये म्हणजे १० वर्षे आधी स्विकारली असती तर कदाचित देशाच्या प्रगतीच्या वेग आणखीन वाढला असता असेही माझे प्रामाणिक मत आहे. ही प्रगती करतानासुद्धा अनेक गोष्टींसाठी संघर्ष करावा लागला आहे आणि पुढेही करावा लागणार आहे. आपल्या देशाचा एकूण विस्तार, लोकसंख्या याचा विचार केला तर या प्रगतीच्या मार्गावर अनेक अडचणी आहेत हे लक्षात येते. उदा. (१) आपल्या देशामध्ये अनेक भाषा आहेत. या बहुविध भाषांमुळेसुद्धा मला वाटते की, प्रगतीच्या वेगाला मर्यादा पडतात. याचा अर्थ अनेक भाषा या आपल्या देशाच्या विकासाच्या दृष्टीने घातक आहेत असे नसून त्या उपयोगी नाहीत असे मला वाटते. (२) दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण हे प्रगतीचा वेग कमी राहण्याचे एक प्रमुख कारण आहे. या वेगवेगळ्या अडचणींचा पार्श्वभूमीवर देशाच्या एकूण प्रगतीचा विचार करताना Inclusive Growth चा विचार केला पाहिजे असे मला वाटते.

देशाची प्रगती वेगाने होण्याच्या दृष्टीने अनेक आघाड्यांवर काम करावे लागेल परंतु ज्या क्षेत्राचा प्रगतीच्या वेगावर चांगला परिणाम होऊ शकतो असे एक क्षेत्र म्हणजे शिक्षण क्षेत्र. दुदैवाने शिक्षणावर आज

**या पृथ्वीच्या पाठीवर जर अशी कोणती एखादी भूमी असेल की, 'पुण्यभूमी' असल्याचा ती दावा करू शकेल, तर ती म्हणजे आपली ही मातृभूमी भारतच होय.**

होणारा एकूण खर्च विचारात घेतला तर ते प्रमाण आजही खूप कमी आहे असे जाणवते. शिक्षणांवरच्या आर्थिक तरतुदींमध्ये खूप वाढ होण्याची आवश्यकता आहे कारण या शिक्षण क्षेत्रातूनच देशाच्या विकासाला गती देऊ शकणाऱ्या पिढ्या घडतात. स्वातंत्र्यपूर्व काळात देशाचे स्वातंत्र्य हे सर्वांसाठी एक 'लक्ष्य' होते. त्या काळातील शिक्षकही त्यादृष्टीने पिढी घडण्याचे काम करीत होते. स्वातंत्र्यानंतर देशाचा विकास हे लक्ष्य शिक्षण क्षेत्रापुढे सातत्याने राहिले असते तर कदाचित चित्र वेगळे दिसले असते. शिक्षकांना मिळणाऱ्या वेतनाचा आणि सुविधांचा विचार केला तरी हे जाणवेल की शिक्षक व्हावे/प्राध्यापक व्हावे असे आकर्षणसुद्धा या क्षेत्रात नाही. त्यामुळे ज्यांच्याकडे विद्यार्थ्यांना शिकवण्याची/घडवण्याची चांगली क्षमता आहे असे लोक या क्षेत्राकडे वळत नाहीत. या बाबतीत माझा एक अलिकडील अनुभव सांगावासा वाटतो. आय.आय.टी.च्या माजी विद्यार्थ्यांच्या संघटनेने अलिकडेच सुमारे सहा कोटी रुपयांचा निधी गोळा केला आहे. या निधीमार्फत आय.आय.टी.मधील विद्यार्थ्यांना शिकवायला येणाऱ्या नव्या प्राध्यापकाला सुरुवातीची काही वर्षे joining bonus दिला जाणार आहे. आय.आय.टी.च्या. माजी विद्यार्थ्यांनी ही योजना याच हेतूने आखली आहे की जर चांगले प्राध्यापक शिकवायला यावे असे वाटत असेल तर त्यांना आकर्षण वाटावे अशी आर्थिक रचना हवी. शासकीय पातळीवर याचा विचार होईल तेव्हा होईल. माजी विद्यार्थी या नात्याने त्यांनी त्यांचे योगदान म्हणून या योजनेची सुरुवात केली आहे.

उद्योगक्षेत्र आणि शिक्षणक्षेत्र यांना एकत्र आणण्याच्या दिशेनेही काही प्रयत्न आपल्याकडे होत आहेत. अर्थात ही सुरुवात आहे. C.I.I. च्या पुणे झोनचा प्रमुख या नात्याने मी शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापकांच्या विविध कंपन्यांच्या Chief Executive Officers शी भेटी घडवून आणण्याचा 'Meet the CEO' हा उपक्रम केला. यामागचा हेतू हाच होता की, उद्योग क्षेत्रात कशा प्रकारच्या शिक्षणाची गरज आहे, बदलते तंत्रज्ञान या विषयी प्राध्यापकांना नेमकी माहिती असावी. जेणेकरून विद्यार्थ्यांना शिकवताना तो दृष्टीकोन त्यांच्याही डोळ्यासमोर राहील. या उपक्रमातील अनुभव उत्साह वाढवणारे आहेत. असे वेगवेगळे प्रयोग आणि प्रयत्न आणखी व्हायला हवे आहेत, पण त्याची सुरुवात झाली आहे एवढे मात्र नक्की म्हणता येईल.

शिक्षणक्षेत्राचा विचार करताना सध्याच्या अभ्यासक्रमाचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. व्यवसायाभिमुख शिक्षण आणि ते ही त्या भौगोलिक परिस्थितीला अनुकूल. अशा व्यवसायांचे शिक्षण देता येईल असा अभ्यासक्रम तयार करता आला तर तसे करण्याची आवश्यकता आहे. आमच्याकडे बेकारी आहे असे आपण सतत म्हणतो पण त्याच वेळी उद्योगांना ज्या प्रकारच्या क्षमता किंवा शिक्षण झालेल्या लोकांची आवश्यकता असते ते मिळत नाहीत ही पण स्थिती आहे. सुयोग्य

**या पृथ्वीच्या पाठीवर माणसातल्या कोमलता, औदार्य, शुचिता, दया, दाक्षिण्य, क्षमा प्रभृती, सदगुणांचा सर्वाधिक विकास झालेली भूमी म्हणजे आपली ही मातृभूमी भारतच होय.**

शिक्षण-क्षमता असलेल्या लोकांची उद्योगक्षेत्रांत कमतरता आणि त्याचवेळी प्रचंड बेकारी असे विरोधाभासाचे चित्र आपल्याला दिसते. या गरजेतून उद्योगांनी I.T.I. सारख्या तंत्रशिक्षण संस्था दत्तक घेण्याच्या प्रयोगाला सुरुवात झाली आहे. ही माझ्यादृष्टीने चांगली गोष्ट घडते आहे. आमच्या भाषेत हा उपक्रम म्हणजे 'We have launched finishing schools'. असे आणखी कोणकोणते उपक्रम करता येतील याचा विचार करायला हवा. प्रचंड लोकसंख्या ही आपली ताकतही आहे आणि समस्याही. आपण या शक्तीचा कसा उपयोग करून घेऊ शकतो यावर त्याचे परिणाम कसे होणार हे ठरेल. आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या वाढीचा वेग लक्षात घेतला तर आगामी काळामध्ये आपल्या देशामध्ये तरुण वयोगटातील लोकसंख्या ही जगातील अन्य देशांच्या तुलनेत अधिक असणार आहे. त्यामुळे देशाच्या विकासाचा लाभ एकूण लोकसंख्येच्या किती % लोकांपर्यंत पोहोचतो त्यावर या 'तरुण वयोगटातील लोकसंख्येचा' देशाच्या विकासाच्या कामी उपयोग होईल की नाही हे ठरेल. देशाच्या विकासामध्ये उद्योग क्षेत्राची भूमिका महत्त्वाची आहे. उद्योगांच्या विकासासाठी शासनाने विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करण्याचे धोरण आखले आहे. यामागचा हेतू स्तुत्य आहे. उद्योगांच्या वाढीसाठी अशा विशेष आर्थिक क्षेत्राची (S.E.Z.) गरज ही आहेच पण अशी क्षेत्रे विकसित करताना सामाजिक भानही हरवून चालणार नाही. या विशेष आर्थिक क्षेत्राला अनेक ठिकाणी समाजातून विशेषत: शेतकऱ्यांकडून विरोध झाला आहे. या विरोधामागच्या सामाजिक कारणांचा विचार करायला हवा. ज्यांच्या जमिनी यासाठी जाणार आहेत अशा लोकांच्या मुलांच्या शिक्षणाची, नोकरीची आणि अन्य आवश्यक सुविधांचाही विचार अशा योजना आखताना आणि अंमलबजावणी करताना करायला हवा. असे घडले तर या महत्त्वाकांक्षी योजनेला यश मिळेल.

आजच्या तरुण पिढीसंबंधी बोलताना अनेकजण तक्रारीचा, नाराजीचा सूर काढतात. माझा अनुभव मात्र असा आहे की, आजची तरुण पिढी जबाबदारीने वागते आहे. त्यांना त्यांच्यासमोर असलेली आव्हानेही माहिती आहेत आणि समस्याही.ही तरुण पिढी हा देशाच्या विकासाचा आधार आहे. त्यांच्यामध्ये काही कमतरता असतील तर त्या दूर करण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे. देशाचा विकास आणि मी असाही विचार प्रत्येकाने करायला हवा, कारण एकेक व्यक्ती देशाचा विचार कसा करते, त्यासाठी स्वत: काय करते यावर देशाचे भवितव्य अवलंबून असते. माझ्या एकट्याच्या चांगल्या वागण्याने, नियम पाळण्याने सामाजिक परिस्थितीत काय फरक पडणार आहे अशी मनोभूमिका असलेला एक वर्ग आहे हा तथाकथित पांढरपेशी समाजातील न्यूनगंड आहे. प्रत्येक व्यक्ती देशासाठी काहीतरी चांगले कार्य करू शकते यात शंका नाही. **किमान देशाच्या आणि समाजाच्या एकूण विकासाला अनुकूल असे जगणे हे**

**या भारतातूनच फिरून अशी एक लाट उठणार आहे की, जी आधुनिक जगातल्या इहलोकनिष्ठ संस्कृतीला आध्यात्मिक संजीवन प्रदान करणार आहे.**

**प्रत्येकाला शक्य आहे** व्यक्तीच काय पण उद्योगक्षेत्रही अधिक सकस सामाजिक दृष्टिकोन विकसित करण्यात हातभार लावू शकतात. आम्ही आमच्या उद्योगात काम करणाऱ्यांना त्यांनी त्यांचे नाव मतदार म्हणून नोंदविले आहे ना? त्यांनी मतदान केले आहे ना? अशा लोकशाही भक्कम करू शकणाऱ्या अनेक मूलभूत गोष्टींचा आग्रह धरीत आहोत. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी वेगळ्या न्यासाच्या माध्यमातून सक्रीय काम करीत आहोत. यापुढे आमच्याकडे नोकरी करणाऱ्यांपैकी ज्यांना प्रत्यक्ष सामाजिक विकासाच्या कामात काही करायचे आहे त्यांना असे प्रत्यक्ष सामाजिक काम करण्यासाठी आमच्याच कामाचा भाग समजून आठवड्यातील काही तास 'ON DUTY' समजून पाठवावे अशीही आमची कल्पना आहे. आपल्या कंपनीच्या सेवकांवर चाबूक उगारून नाही तर त्यांना आवाहन करून त्यांचा सामाजिक सहभाग वाढवता येऊ शकेल असा आमचा विश्वास आहे. असा विचार फक्त आम्हीच करीत आहोत असे नाही. उद्योगक्षेत्रात फार मोठ्या प्रमाणावर सर्वांगीण सामाजिक उत्कर्षाच्या दृष्टीने 'Corporate Social Responsibility' या संकल्पनेचा विचार केला जातो आहे. ही संकल्पना सर्वांगीण सामाजिक विकासाच्या दृष्टीने अतिशय प्रभावशाली साधन बनू शकेल असा मला विश्वास वाटतो. 'Global Warming' च्या पार्श्वभूमीवर जगाच्या पाठीवरील आमचे खरेदीदार आज आम्हाला ऑर्डर देताना आम्ही Corporate Social Responsibility म्हणून काय करीत आहोत, आमचा 'Green Index', आमचे 'Carbbon Credit' याचा विचार नक्की करणार आहे किंबहुना त्याची सुरुवातही झाली आहे.

आमच्या देशात सेवाभावी संस्थांची एक परंपरा आहे. या सेवाभावी संस्थांची देशाच्या विकासामध्ये निश्चितच महत्त्वाची भूमिका आजवर राहिली आहे आणि यापुढील काळातही राहणार आहे. 'स्व'-रूपवर्धिनी हे त्याचे एक उदाहरण आहे. अशा सेवाभावी संस्थांना मुख्य मर्यादा पडतात त्या आर्थिक कमतरतेमुळे. प्रामाणिकपणे सामाजिक काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांच्या कामात आर्थिक मार्गाने आणि उद्दिष्ट-पूर्तीच्या कार्यक्रमात शक्यतेप्रमाणे प्रत्यक्ष सहभागी होऊन उद्योगसंस्था सेवाभावी संस्थांना प्रोत्साहित करू शकतात. एकूणच आपला देश एक सामर्थ्यसंपन्न देश म्हणून जगात उभा राहण्यासाठी सर्वच आघाड्यांवरून प्रयत्न करावे लागणार आहेत. आज सर्वांच्या बोलण्यातून आपण एक सामर्थ्यशाली देश म्हणून उभे राहू शकतो याविषयी आत्मविश्वास प्रकट होतो आहे पण हे स्वप्न वास्तवात येण्यासाठी आवश्यकता आहे ती नेमक्या दिशेने आणि एकत्रित प्रयत्नांची. चला तर यादिशेने एक पाऊल पुढे टाकू या!

**बांधवांनो माझ्यावर विश्वास ठेवा. भविष्यात घटना अशीच घडणार आहे,**
**आपला भारतच जगाला आध्यात्माचे पसायदान देणार आहे.**

# हम ना सोचे हमे क्या मिला है।
# हम ये सोचे किया क्या है अर्पण?

**डॉ. जयंत नारळीकर**

*जागतिक कीर्तीचे खगोल शास्त्रज्ञ असलेल्या डॉ. नारळीकर यांना गणित विषयातील आंतरराष्ट्रीय मानाच्या 'रँगलर' आणि 'टायसन' पदकांनी सन्मानित करण्यात आले आहे. केंब्रिज येथे राहून त्यांनी फ्रेड होले यांच्यासारख्या मार्गदर्शकाच्या सहाय्याने 'कॉस्मॉलॉजी' व 'ॲस्ट्रोफिजिक्स' या विषयातील आपल्या मूलभूत संशोधनाचा पाया घातला. या विषयातील त्यांच्या योगदानामुळे त्यांना अनेक आंतर्राष्ट्रीय व राष्ट्रीय ख्यातीचे सन्मान प्राप्त झालेले आहेत. वयाच्या अवघ्या सव्वीसाव्या वर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण पदकाने सन्मानित केले. २००४ साली त्यांना पद्मविभूषण पदकाने गौरवण्यात आले आहे. 'टाटा इन्स्टीट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' या संस्थेत त्यांनी अनेक वर्षे काम केले असून 'ॲस्ट्रोनॉमी' व 'ॲस्ट्रोफिजिक्स' या विषयांसाठी त्यांनी **आयुका** या जागतिक कीर्तीच्या संस्थेची स्थापना पुणे विद्यापीठात केली.*

स्वातंत्र्याच्या हीरक महोत्सवाच्या टप्प्यावर आपल्या देशाचा आढावा घेताना पहिली गोष्ट जी डोळ्यात भरते ती म्हणजे आपल्या देशात रुजलेली लोकशाही. आपल्या देशात नियमितपणे निवडणुका होतात आणि सत्तेत असलेला पक्ष पुन्हा निवडून येईल याची खात्री नसते. याचे कारण भारतीय लोकांमध्ये योग्य ती जाणीव/जागरुकता निर्माण झालेली आहे. एखाद्या सरकारची कामगिरी ही लोकांना समाधानकारक वाटली नाही तर मतदार त्यांना पुन्हा निवडून देत नाहीत. आपल्या आजुबाजूच्या, विशेषतः आपल्याला लागून असलेल्या अनेक देशांकडे पाहिल्यानंतर आपल्याकडील ही गोष्ट मला unique (विशेष) वाटते. पूर्वीच्या साम्राज्यवादाच्या जोखडातून मुक्त झालेल्या अनेक देशांमध्ये एक तर अराजकाची स्थिती आहे किंवा हुकूमशाही आहे असे दिसते. त्या तुलनेत आपण बरेच पुढे आहोत ही निश्चितपणे आपली जमेची बाजू आहे.

गेल्या साठ वर्षात झालेल्या प्रगतीच्या वेगासंबंधी माझे मत असे आहे की याहून अधिक वेगाने प्रगती करता आली असती. पण गेल्या १० वर्षांत जो वेग वाढला आहे तो वेग आपण टिकवू शकलो तर २०२० साली एक प्रबळ राष्ट्र म्हणून जगात आपल्या देशाची नोंद होऊ शकेल. आजवर झालेली प्रगती ही पुरेशी नाही याची मला जी कारणे वाटतात त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश मी करीन.

**१) वाढता भ्रष्टाचार :** सार्वजनिक क्षेत्रात म्हणजे अगदी सरकार या पातळीपासून ते खाली अगदी सामान्य नागरिकांपर्यंत भ्रष्टाचार खूप वाढला आहे. त्यामुळे प्रगती गाठण्यासाठी जो निधी असतो तो त्या कामी लागत नाही. तो एका अर्थी वाया जातो.

**२) नागरिकत्त्वाच्या जाणिवेचा अभाव (civic sence) :** आपण नागरिक आहोत, शहराची, आपल्या गावाची स्वच्छता राखणं, ते प्रदुषण मुक्त ठेवणं अशा अनेक गोष्टीत जी जागरुकता असायला हवी ती तेवढी आपल्याकडे निर्माण झालेली नाही. ही गोष्ट केवळ अशिक्षित नाही तर शिकलेल्या

**येथील वातावरणाच्या अणुरेणूतही आध्यात्मिकतेची स्पंदने जाणवतील.**

समाजालाही लागू आहे. सार्वजनिक जीवनात शिस्तही अभावाने दिसते. सिंगापूरसारख्या देशामध्ये जी शिस्त आहे त्यामुळे त्या देशाची वेगाने प्रगती झाली आहे. अशी शिस्त आपल्याकडे आल्यास आपल्याकडे जी संसाधने आहेत त्याचा आपण चांगला उपयोग करून घेऊ शकू.

**३) अंध:श्रद्धेचा प्रभाव :** विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रचार आणि प्रसार होऊनही आपल्याकडे शिक्षित-अशिक्षित सर्व स्तरांमध्ये अंध:श्रद्धा वाढते आहे. या अंध:श्रद्धेमुळे प्रगतीची जी पावले जाणीवपूर्वक आपण टाकायला पाहिजेत ती आपण टाकू शकलेलो नाही. पूर्वग्रहदूषित अशा काही अंध:श्रद्धांच्या बाबतीत विचारसुद्धा होत नाही. काही पारंपरिक अंध:श्रद्धा आपण टाकून द्यायला हव्यात पण आपण त्यांना चिकटून बसलेलो आहोत.

आपल्या देशाला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा मी नऊ वर्षांचा होतो. त्यावेळी एक उत्साह होता की पारतंत्र्याच्या जोखडातून आपला देश आता स्वतंत्र झाला आहे. आता आपल्या देशाला नवी दिशा मिळेल, आपण आपला देश आता चांगल्या दिशेने वळवू शकू. पण हे घडू शकले नाही याचे कारण नागरिक पातळीवर मार्गदर्शन करणारे, नेतृत्त्व करणारेही अंध:श्रद्धा असलेले होते. काळानुसार अंध:श्रद्धा कमी होईल असे वाटत होते परंतु ती कमी होण्याऐवजी नवीन अंध:श्रद्धा समाजात रुजल्या. संगणकाच्या आणि टि.व्ही. च्या माध्यमातूनही त्याचा प्रचार प्रसार होतो याची खंत वाटते. अशा वेळी मनामध्ये प्रश्न पडतो की खरंच आपण पुढे गेलो आहोत की मागे चाललो आहोत?

आपल्याला जो सांस्कृतिक वारसा मिळालेला आहे तो अनेक दृष्टीने उपयोगी ठरणारा आहे. अहिंसा, जीवदया/भूतदया अशा गोष्टी आपल्याकडे रुजलेल्या आहेत. अंध:श्रद्धा आहे तशी परिवर्तनशीलताही (pragmatism) आहे. त्यामुंळे येथील समाज हा पोथीनिष्ठ नाही/रुढीनिष्ठ नाही. येथील लोक काळानुसार बदल करून घेणारे आहेत ही चांगली गोष्ट आहे. अंध:श्रद्धा हे मात्र फार मोठे आव्हान सर्वांच्यासमोर आहे. त्यावर मात करायची असेल तर अगदी लहान मुलांपासून सुरुवात करावी लागेल. ती पिढी मोठी झाल्यावर हे बदल झालेले दिसतील.

आपला देश सामर्थ्यशाली होण्यासाठी आपल्याला अनेक गोष्टींचा विचार करावा लागेल त्यामध्ये माझ्या मते शिक्षण हे फार महत्त्वाचे आहे. इतक्या वर्षांनंतरही शिक्षणाला सरकारी पातळीवर कमी महत्त्व दिले जाते. यामध्ये बदल व्हायला हवा आहे. शाळांची संख्या जशी वाढण्याची आवश्यकता आहे तशी एकेका वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी करणे गरजेचे आहे. जशी शाळांची, वर्गांची संख्या वाढेल तशी शिक्षकांचीही संख्या वाढायला हवी. एकेका वर्गात जर ७०-८० विद्यार्थी असतील तर विद्यार्थी शिकणार कसे आणि शिक्षक शिकवणार कसे? आणि त्यामुळेच पुष्कळ मुले शाळांबाहेरचे क्लासेस लावतात. शिक्षण ही महत्त्वाची गरज आहे ही गोष्ट जेव्हा समाजात रुजेल तेव्हा समाजात बदल दिसून येतील.

शाळांमध्येही एकेका वर्गातील विद्यार्थी संख्या ही ३० असावी. ती ४० च्या पुढे तर निश्चित जाऊ नये.

**ही भूमी तत्त्वज्ञानाची, नीतिशास्त्राची आणि आध्यात्मिकतेची पुण्यभूमी आहे.**

आज शिक्षणाच्या पद्धतीत जे शिकवले जाते त्यात घोकंपट्टी जास्त आहे. विद्यार्थ्याला विषय समजला आहे का नाही याकडे लक्ष दिले जात नाही. उदा. इयत्ता पहिली मधील विद्यार्थ्याला सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो. हे पाच वेळा लिहून आणायला सांगितले जाते पण सूर्य पश्चिमेला मावळल्यानंतर पुन्हा पूर्वेला कसा येतो अशा गोष्टीचा विचार करायला शिक्षक विद्यार्थ्याला उद्युक्त करतात का? **विद्यार्थ्यांना विचार करायला उद्युक्त केले तर त्या शिक्षणाचा उपयोग होईल. नुसत्या घोकंपट्टीने ते साध्य होणार नाही. म्हणून अभ्यासक्रमाचा विचार करताना घोकंपट्टी कमी करावी, माहिती कमी करावी परंतु जे शिकवले आहे ते समजले आहे की नाही यासाठी शिक्षकांकडून अधिक प्रयत्न केला जावा.** शहरी आणि ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रम एकच असावा परंतु त्यामध्ये **ग्रामीण आणि शहरी दोन्ही जीवनपद्धतींचे प्रतिबिंब असायला हवे.**

शिक्षणामध्येसुद्धा सर्जनशीलतेला (creativity) महत्त्व द्यायला हवे. एखाद्याने एखादा शोध लावला व तो शोध उपयोगी असेल तर त्याला प्रोत्साहन मिळायला हवे. पण दुर्दैवाने पुष्कळदा आपल्याकडे हे घडत नाही आणि त्यामुळे अनेकजण परदेशांमध्ये जातात, 'ब्रेनड्रेनला' खतपाणी मिळते.

सगळ्या गोष्टी सरकारने कराव्या ही मनोवृत्ती चांगली नाही. या पार्श्वभूमीवर सेवाभावी संस्थांचे काम उत्तम आहे. अशा संस्थांचे काम वाढायला हवे. समाजजीवनात अशी अनेक क्षेत्रे आहेत की जेथे सरकारी यंत्रणा पोहोचत नाही. अशा ठिकाणी सेवाभावी संस्थांचे योगदान महत्त्वाचे ठरते. उदा. विज्ञान प्रसार या विषयात सरकार पूर्वी फार काही करीत नव्हते. परंतु मराठी विज्ञान परिषद, केरळा शास्त्र साहित्य परिषद अशा अनेक सेवाभावी संस्थांनी केलेले काम जेव्हा डोळ्यात भरले तेव्हा सरकारने विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी Dept. of Science and Technology मध्ये 'विज्ञान प्रसार' हा स्वतंत्र विभाग सुरू केला.

आगामी काळात सेवाभावी संस्थांचे कार्यक्षेत्र अधिक विस्तारण्याची गरज आहे. जास्तीतजास्त लोकांचा सहभाग कसा वाढेल याचा विचार करून सेवाभावी संस्थांनी आपल्या कामाचा आवाका वाढविला पाहिजे. उदा. आयुका मार्फत हौशी खगोलप्रेमींसाठी माहिती आणि सुविधांचे आयोजन केले जाते. ह्या उपक्रमाच्या माध्यमातून फलज्योतिष सारख्या अंध:श्रद्धा कमी करण्यासाठी मार्गदर्शन करता येणे शक्य आहे. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाचा विचार केला तर वर्धिनीचे काम नाशिक, कोल्हापूर अशा वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये पोहोचायला हवे. अशा वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये ज्या अन्य सेवाभावी/शिक्षण संस्था आहेत त्यांच्याशी वर्धिनीचे व्यवस्थित Networking व्हायला हवे.

एक नागरिक म्हणून प्रत्येकजणच देशासाठी काही करू शकतो. प्रत्येकाने शिस्तीत वागावे त्यात देशाचा फायदा आहे. **मला देशाकडून काय मिळते यापेक्षा मी देशाला काय देऊ शकतो याचा प्रत्येकाने विचार करावा.**

**केवळ येथेच मानवी हृदय इतके विकास पावले की त्याचे केवळ मानवच नव्हे, तर पक्षी, पशू व तरुलता यांनाही आपल्यात सामावून घेतले.**

# भारताची साठोत्तरी विकास प्रक्रिया काही अंतर्विरोध, काही आव्हाने

प्रा. डॉ. द.ना. धनागरे

*एम.ए. (समाजशास्त्र) या विषयात नागपूर विद्यापीठात प्रथम. पदव्युत्तर शिक्षणासाठी अमेरिकेला रवाना. '१९२० ते १९५० या कालावधीतील भारतातील शेतकऱ्यांची चळवळ' या शोधनिबंधाला इंग्लंडमधील ससेक्स विद्यापीठाची पीएच.डी. प्राप्त. त्यासाठी अत्यंत सन्मानाची समजल्या जाणाऱ्या कॉमनवेल्थ शिष्यवृत्तीचे मानकरी. पुणे विद्यापीठाचा 'व्ही. के. जोग सर्वोत्कृष्ट शिक्षक' पुरस्कार प्राप्त. डेन्मार्क, जपान कॅनडा अशा अनेक देशांमध्ये व्हिजिटिंग रिसर्च प्रोफेसर म्हणून काम पाहिले आहे. ICHR च्या तसेच ICSSR च्या शिष्टमंडळाचे सदस्य म्हणून रशिया, चीन, जपान, नेदरलँड, फ्रान्स, उत्तर कोरिया अशा अनेक देशांना त्यांनी भेटी दिल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून पाच वर्षे काम पाहिले आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील मासिकांमधून त्यांचे आजवर ५७ लेख प्रसिद्ध झाले आहेत. अलिकडेच 'संकल्पनांचे विश्व आणि सामाजिक वास्तव' या त्यांच्या पुस्तकास महाराष्ट्र साहित्य परिषदेचा सामाजिक शास्त्र विषयासाठीचा अभिजात साहित्य पुरस्कार, तसेच महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक संचलनालयातर्फे दिला जाणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्राप्त झाला आहे.*

गेल्या साठ वर्षांमध्ये आपल्याला जेव्हा स्वातंत्र्य मिळाले तेव्हा आपले साक्षरतेचे प्रमाण होते १८%. आज ६० वर्षांनंतर हे प्रमाण ६५ ते ६८ टक्क्यांवर पोहोचले आहे. अर्थात अजुनही सुमारे ३५ कोटी जनता निरक्षर आहे हे पण विसरून चालणार नाही. वेगळ्या आकडेवारीत सांगायचे तर स्वातंत्र्याच्या वेळी आपली जेवढी लोकसंख्या होती साधारणत: तेवढी लोकसंख्या अजून निरक्षर आहे. निरक्षरतेच्या आजच्या स्थितीकडे आणखीन एका वेगळ्या दृष्टीने पाहायला हवे. जगामध्ये आज जेवढी निरक्षरांची संख्या आहे त्याच्या ५० ते ५५ % लोक केवळ भारतात आहेत. ही स्थिती वाईट आहे आणि यामध्ये वेगाने सुधारणा व्हायला हवी. १८ % ते ६५ % हे साक्षरतेचे प्रमाण आपण गाठले आहे याचा अर्थ सुमारे पाच कोटीवरून आपण जवळजवळ ७० ते ७५ कोटी जनता साक्षर केली आहे. ही भारतात साक्षर केलेली जनसंख्या युरोपच्या एकूण लोकसंख्येच्या दीडपट आहे आणि **युरोपला त्यांचे साक्षरतेचे उद्दिष्ट गाठायला ३०० वर्षे लागली होती. आणि आपण तेच उद्दिष्ट ६० वर्षांमध्ये गाठले आहे. ही उपलब्धी आपण आधी समजून घेतली पाहिजे.** त्यानंतर 'साक्षरता-प्रसार', 'सर्वशिक्षा अभियान', अपारंपारिक शिक्षण आदी अभियानांवर जी टीका करायची ती जरूर करावी पण जेवढे साध्य केले आहे ते आपण मान्य करायलाच हवे.

आपल्या देशाने आर्थिक प्रगतीसुद्धा मोठ्या प्रमाणावर केली आहे असे मला वाटते. पायाभूत सुविधा मोठ्या प्रमाणावर भागविण्याचा आपण या काळामध्ये प्रयत्न केला आहे. रस्ते, परिवहन, आरोग्य, वीज, धरणे, पाणी अशा अनेक गोष्टी आहेत ज्यामध्ये आपली प्रगती चांगली आहे आणि समृद्ध देशांपैकी एक आपण आहोत असे म्हणायला हरकत नाही. ११ व्या पंचवार्षिक योजनेच्या प्रस्तावनेत असे म्हटले आहे की आज आपल्या देशात २७ ते ३० % लोक-

**या भूमीतच मानवी आत्म्याने विश्व हे अखंड एकरूप आहे आणि त्याचे प्रत्येक स्पंदन हे आपल्याच नाडीचे स्पंदन आहे असे समजून विश्वाचे अध्ययन केले.**

दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. परंतु १०व्या पंचवार्षिक योजनेमध्ये मात्र हेच प्रमाण २५ ते २७ % असल्याचे म्हटले होते, हे चूक होते. याचा अर्थ आजही ३० कोटी जनता ही दारिद्र्य रेषेखाली आहे. हे प्रमाण पाहिल्यावर 'एकीकडे झालेल्या पायाभूत सुविधांमधील सुधारणा आणि दुसरीकडे दारिद्र्यरेषेखाली जगणाऱ्यांचे प्रमाण दुर्लक्ष न करण्याइतके मोठे आहे अशी आपल्या देशात विरोधाभासाची सद्यस्थिती आहे.

आर्थिक प्रगतीचा दर आज ७ ते ८ % आहे आणि तो नजिकच्या भविष्यात १० ते ११ % होईल असे अहवालात म्हटले आहे. उद्योगधंद्यात तर प्रगतीचा दर १८ ते २० % आहे. परंतु शेतीमधील उत्पादकता मात्र चिंता वाटावी इतकी घसरते आहे. लोकसंख्या वाढीच्या आपल्याकडे असलेल्या दराच्याही पेक्षा कमी दर शेती उत्पादकतेचा आज आहे. लोकसंख्या वाढीचा दर २ ते २.५ % आहे तर शेती उत्पादकतेचा दर २ टक्क्यांहूनही कमी आहे. आर्थिक प्रगतीचा दर १० % गाठला आहे असे म्हटले तरी रोजगारवाढीचा दर मात्र १.५ टक्क्यांनीच वाढतो आहे. ही तफावत पाहिली की आपण एका दुसऱ्या विरोधाभासाच्या टप्प्यावर आहोत असे दिसते. त्यामुळे आर्थिक प्रगतीबद्दल समाधान आहे पण पूर्ण समाधान नाही असे म्हणण्याजोगी परिस्थिती आहे.

आपण आज जगातील एक प्रबळ राष्ट्र होण्याचे स्वप्न पाहत आहोत ही चांगली गोष्ट आहे. पण प्रबळ राष्ट्र होण्यासाठी आपल्याकडील ताकतीचा-बलस्थानांचा अंदाज आपल्याला असला पाहिजे आणि आपल्यातील कमतरतेकडेही दुर्लक्ष करून आपल्याला चालणार नाही. '२०२० पर्यंत भारत एक महासत्ता होणार' हे शब्द गुळगुळीत होण्याइतपत आज सर्व व्यासपीठांवर ऐकायला मिळतात. हे शब्द सारखे सारखे वापरून आपली अशी कल्पना होईल की पहिल्यांदाच आपण जगातील एक प्रबळ राष्ट्र म्हणून उभे राहत आहोत पण ही वस्तुस्थिती नाही.

आपल्या देशाला किमान ५००० वर्षांचा इतिहास आहे. जगाच्या इतिहासात अनेक देशांतील संस्कृती, सभ्यता या कोलमडून पडल्या, इजिप्त, इंका (पेरू) चीन ही या संदर्भातील उदाहरणे पुरेशी आहेत. ३०० वर्षांपूर्वी युरोप आणि अमेरिका तरी कोठे होते? आपण विविध दर्शने, साहित्य, शिल्प, गणित (भास्कराचार्य), अंतरिक्षविज्ञान (आर्यभट्ट) अशी विविध शास्त्रे निर्माण केली आहेत. ही आमची श्रीमंती आहे, आमचे ऐश्वर्य आहे, हा आमचा ऐतिहासिक वारसा आहे. १९४७ साली स्वातंत्र्य मिळाले आणि जादूची कांडी फिरावी तशी ६० वर्षांत प्रगती झाली असे घडलेले नाही, हे लक्षात ठेवावे. प्रगतीच्या दिशेने जाताना आम्ही आमची ताकत कशात आहे हे विसरून चालणार नाही.

१) आमच्याकडे इतिहास आहे, परंपरा आहे, संस्कृती आहे (गुणदोषांसह ती आमची ताकत आहे) या तुलनेत अनेक देशांना म्हणावा असा इतिहासच नाही. विकासापेक्षा विनाशासाठी अधिक उपयोग केला जाईल असे नवे विज्ञान-तंत्रज्ञान विकसित करून एका अर्थी चुकीच्या दिशेने काही देश 'नवा इतिहास' घडवत आहेत.

**दुसऱ्या कोणत्याही देशात जाण्यापूर्वी ज्ञानाने जेथे प्रथम वास्तव्य तो हाच प्राचीन भारत देश होय.**

२) मनुष्यबळ ही आमची मोठी शक्ती आहे. लोकसंख्येच्या बाबतीत चीन आजही आमच्यापुढे आहे परंतु पुढील ३०-३५ वर्षांमध्ये लोकसंख्येच्या बाबतीत आपण चीनच्या पुढे असणार आहोत. लोकसंख्येकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले तर हे एक मोठे संसाधन आम्हाला उपलब्ध आहे. या त्यामध्ये म्हणजे मनुष्य शक्तीमध्ये कौशल्य निर्माण करणे हे आपल्यापुढचे एक मोठे आव्हान आहे.

३) आपल्याकडे पारंपरिक कौशल्यांचा वारसा आहे त्यामुळे २ ते ६ महिन्यांच्या प्रशिक्षणाद्वारे टेल्को, महिंद्रा अशा उद्योगांना लागणारे कुशल मनुष्यबळ निर्माण करणे शक्य आहे.

४) आपल्याला लाभलेली नैसर्गिक परिस्थिती ही सुद्धा आपली एक फार मोठी शक्ती आहे. आसेतूहिमाचल निसर्गाचे आपल्या देशाला वरदान व संरक्षण मिळाले आहे. अफाट जंगले, खनिजसंपत्ती, पर्वत-नद्या, आश्चर्य वाटावे असे विरोधाभासी हवामान लाभलेले प्रदेश (अति-उष्ण, अतिथंड प्रदेश, अति पाऊस, अवर्षण, वाळवंट, बर्फाच्छदित शिखरे इ.) आपल्या इथे आहेत. तसेच आपल्याला खूप मोठा समुद्रकिनारा लाभला आहे आणि त्यावर कोट्यवधी जनता मासेमारीचा व्यवसाय करून उपजीविका चालवते आहे.

भारताचे नैसर्गिक वैशिष्ट्य हे जसे वरदान आहे तसा शापही आहे. आपल्या देशाच्या सीमा Porous आहेत, म्हणजे त्या सुरक्षित ठेवणे हे आव्हान आहे. या सीमांमधून घुसखोरीची आव्हाने आपल्यापुढे आहेत. आज लाखोंच्या संख्येनी बांगलादेशी घुसखोर आपल्या देशात राहत आहेत. कोणीही येतो, कोठेही राहतो त्यावर आमचे काहीही नियंत्रण नाही. एकगठ्ठा मतांच्या क्षुद्र स्वार्थामुळे हे घुसखोरीचे आव्हान मोडून काढण्यासाठी राजकीय इच्छशक्ती आपल्या नेतृत्त्वात नाही. समुद्रमार्गाने मोठ्या प्रमाणावर तस्करी चालते. बेकायदेशीर आयात होते (सोने, विदेशी चलन, शस्त्रे इ.). एका अर्थी समांतर अर्थव्यवस्था भारतात उभी राहिली आहे ही वस्तुस्थिती आहे. तेलगी हा एकाएकी निर्माण झाला नाही. तेलगी हा या समांतर अर्थव्यवस्था उभ्या करणाऱ्या बेकायदेशीर व्यवहारांच्या हिमनगाचे टोक आहे. अशा आव्हानांमधून संस्कृतीला, सामान्य जनतेला आणि अर्थव्यवस्थेलाही धोका निर्माण होतो. अशा धोकादायक चालणाऱ्या कृत्यांमागे विदेशी देशांचीही व्युहरचना असते. हे अधिक समजण्यासाठी आपण आपल्या देशाचा तीन भागात विचार करू या. गुजरात ते हिमाचल/उत्तर प्रदेश असा टप्पा घेतला तर या भागाकडे अमेरिकेचे लक्ष आहे कारण यातील मोठा भाग हा 'गहू' अन्नधान्य पिकविणारा प्रदेश आहे आणि अमरिकेला त्यात रस आहे. शिवाय गुजराथ, राजस्थान, पंजाब, जम्मु-काश्मिर या राज्यांच्या सीमा पाकिस्तान, अफगाणिस्थान, ताजिकीस्थान व चीन या देशांच्या आंतर्राष्ट्रीय सीमांशी लागून असल्याने भौगोलिक-राजकीय (GeoPolitics) दृष्टीनेही अमेरिकेला या भागावर आपले नियंत्रण असावे असे वाटते. दक्षिणेकडील जो 'द्वीप' भाग आहे त्यामध्ये फार कोणाला रस नाही. असेलच तर तो अरब देशांचा आहे

**मानवाच्या स्वरूपाचा व अंतर्जगतातील रहस्याचा वेध घेण्याचे काम याच देशात प्रथम सुरू झाले.**

आणि देशाचा जो मधला पट्टा आहे यामध्ये मोठ्या प्रमाणात खनिज संपत्ती आहे. यामध्ये जपानला मोठा रस आहे आणि त्या ठिकाणी जपानी बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणावर सहकार्याच्या नावाखाली भांडवली गुंतवणूक करीत आहेत. पश्चिम दिशेचा विचार केला तर राज्यकारभारात हस्तक्षेप करायला सुरुवात केली आणि अवघ्या १५०-१६० वर्षांमध्ये आपल्या देशावर पक्की पकड मिळवली. १९० वर्षे आपण याच इंग्रजांच्या गुलामीत राहिलो तो इतिहास डोळ्यांसमोर आणला तरी हजारो कोटी रुपयांचे अर्थसहाय्य देण्यामागचे बड्या राष्ट्रांचे हेतू स्पष्ट होतील. जागतिक महाशक्ती पुढील ५०-१०० वर्षांचा विचार करीत असतात आणि आम्ही पंचवार्षिक योजनांमध्ये पुरुषार्थ समजतो. दीर्घकालीन आव्हाने आणि संकटांचा कोणी विचार करताना दिसत नाही.

देशातील आदिवासी जनसंख्या असलेल्या प्रदेशात निर्माण होणारे प्रश्न काय सांगतात? आंध्र, तेलंगणा, महाराष्ट्रातील गडचिरोली सारखे जिल्हे, झारखंड, छत्तीसगड या प्रदेशांमध्ये नक्षलवाद्यांचा धुमाकुळ सध्या सुरू आहे. आदिवासींच्या विकासाकडे होणारे दुर्लक्ष हे यामागचे एक प्रमुख कारण आहे हे खरे आहे. वनवासी कल्याण आश्रमाने वनवासी क्षेत्रात वनवासींच्या विकासासाठी केलेले काम कम्युनिस्टांच्या नजरेत खुपते आहे याच आदिवासींना चिथावणी देऊन प्रस्थापित सरकारविरुद्ध लढण्यासाठी त्यांच्या हातात शस्त्रे दिली जात आहेत. ज्या आदिवासी समाजाचा/समुदायाचा अजिबात विकास झाला नाही म्हणून नक्षलवाद पोसला जातोय त्याच आदिवासींच्या हाती अत्यंत आधुनिक शस्त्रे येतात कशी? अलिकडेच मोहोळ रेल्वे स्टेशनच्या बाहेर कोट्यावधी रुपयांची हजारो काडतुसे, बाँब असलेला रस्त्यावर पडलेला प्रचंड दारुगोळा सापडला आणि त्यावरती सदर सामान १९७२ सालाचे सरकारी साठ्यातील असल्याचे दर्शविणारे शिक्केही आहेत. याचा अर्थ काय होतो? दक्षिणेतील प्रांतात नक्षलवादाचे थैमान तर पुर्वांचलातील प्रांतांमध्ये स्वतंत्र प्रांत, देशाची मागणी मागणारी आंदोलने, बोडोलँड, मिझो आणि नागांची बंडाळी, अशा सर्वांच्या हाती अद्ययावत शस्त्रास्त्रे, विदेशी चलन यामागचा अर्थ आपण भारतीयांनी नीट समजून घेतला पाहिजे. यामागचा धोका लक्षात घेतला पाहिजे.

दुर्दैवाने आमचे निर्वाचित प्रतिनिधीही याबाबतीत कुचकामी आहेत. एकेका प्रश्नांचा अभ्यास करून त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी हे प्रतिनिधी काम करताना दिसत नाहीत. पद, प्रतिष्ठा, पैसा आणि पेन्शन याच्यासाठी जीवाचे रान करतील पण देशाचे प्रश्न सोडविण्यासाठी काहीही करणार नाहीत. त्यासाठी लागणारा अभ्यास, निरपेक्ष वृत्तीने ध्येयवाद जोपासणे आणि तळागाळातील लोकांसमवेत परिवर्तनासाठी झटणे यापैकी त्यांच्याकडे काहीच आढळत नाही असे सध्याचे चित्र आहे आणि हे देशाचे दुर्दैव आहे. आम्ही आमची जंगलसंपत्तीचा विनाश करीत आहोत आणि कोणाकरिता? अनेक विकसित देश हजारो कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याची तयारी दर्शवितात आणि उद्योग भारतात आणतात. जणु काही भारतातील बेकारी दूर करण्याचा उदात्त हेतू (!) डोळ्यासमोर

**धर्म व तत्त्वज्ञान यातील सर्वोच्च ध्येये या भारतातच पराकोटीच्या उच्च स्तरांवर पोहोचली.**

ठेवूनच हे लोक आले आहेत अशा भोळ्या समजुतीने आम्ही त्या गुंतवणुकीचे स्वागत करतो. असे येणारे उद्योग कोणते आहेत? ते भारतात आणण्याचे प्रयोजन काय? याचा विचारच आमच्या मनात येत नाही. काही काळानंतर जेव्हा प्रदुषणाची समस्या अशा क्षेत्रात वाढते, आमचीच जंगल संपत्ती उजाड होते तेव्हा प्रदुषणकारी उद्योग भारतात आणण्याचा अशा देशांचा कुटील हेतू आम्हाला समजतो. पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते. या बाबतीत एक उदाहरण देतो. उत्तर प्रदेश सरकारने १९९४-९५ मध्ये त्यांच्या 'उत्तर प्रदेश वनसंरक्षण प्रकल्प समितीवर' सल्लागार समितीचा एक सदस्य म्हणून माझी नेमणूक केली. जागतिक बँकेकडून मिळू घातलेल्या ३३० कोटी रुपयांच्या प्रोजेक्टवर काम करायचे होते. स्विडीश शास्त्रज्ञांनी हा प्रोजेक्ट तयार केला होता त्यात दहा-अकरा उपविभाग होते. त्यातील एका विभागात कोणते प्रकल्प वनसंरक्षण, संवर्धन व त्यातील पंचायत, महिला आणि विविध गटांचा सहभाग यासाठी काय निश्चित प्रकल्प राबविता येतील तसे प्रस्ताव भरीव स्वरूपात तयार करण्याचे काम सल्लागार म्हणून मला करायचे होते, ते मी केले. त्यावेळी मला असे दिसले की प्रत्यक्षात त्यांना जागतिक बँकेनेच परस्पर कंत्राट दिले होते. या समितीतील स्विडीश सदस्य पेपर (कागद) उद्योगाचा आग्रह धरीत होते. या उद्योगासाठी लागणारा लगदा (pulp) स्वीडनहून येणार आणि त्यावर येथील कागद निर्मितीचा उद्योग चालणार. या उद्योगासाठी डेहराडून, रानीखेत अशा ठिकाणच्या जंगलातील वृक्षांची बेसुमार आणि कायदा धाब्यावर बसवून तोड करण्यात आली. पेपर पल्प त्यांनी पाठविलेला वापरायचा म्हणजे त्यांनी पल्प पाठविणे बंद केले की उद्योग बंद. बर पेपर निर्मिती येथे करण्याने त्याद्वारे होणारे प्रदूषण आपण सोसायचे आणि आपल्या देशात प्रदूषण टाळून यांनी नफा कमवायचा. पेपर उद्योग चालवायचा असेल तर त्याचे नियोजन नको का? वैज्ञानिक पद्धतीने जंगलाची निर्मिती, त्याचे संरक्षण आणि संवर्धन याचा विचार करून उद्योग सुरू होत नाही. दुर्दैवाने दीर्घकालीन विचार करणारे नेतृत्त्व आपल्याकडे निर्माण होत नाही ही मोठी समस्या आहे.

### जागतिकीकरण : आर्थिक सुधारणा-युगातील आव्हाने

आमच्यासमोर जागतिकीकरणातून, खाजगी-करणातून आणि उदारीकरणातून उत्पन्न होणारी आव्हाने आहेत. १९९१ साली आपण खुल्या आर्थिक व्यवस्थेचा स्वीकार केला. विद्यमान पंतप्रधान हे त्यावेळी देशाचे अर्थमंत्री होते. या सरकारनंतर अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार आले. त्यांनीही तेच धोरण पुढे राबविले. अर्थात त्यांच्यापुढे पर्यायही नव्हता. या सरकारने आधीच्या सुधारणांना विरोध करणं म्हणजे रंगलेल्या लहान मुलांच्या खेळात एखादा मुलगा रुसून अंगठा चोखत बसण्यासारखे वाटले असते. (Sore Thumb Act). जागतिकीकरणाचे हे आव्हान त्सुनामी लाटांसारखे आहे, जे थोपवणे अवघड आहे. त्याला धोरणीपणाने सामोरे जाणे गरजेचे आहे.

जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण व सुधारणा युगामुळे आपले सारे जीवनच बाजारपेठांनी व्यापलय. हजारो हॉटेल्स, कपड्यांची दुकाने, शॉपिंग मॉल्स यांनी

**शतकानुशतके होत असलेले आघात, परकीयांच्या शेकडो स्वाऱ्या आणि चालीरीतींमध्ये झालेले शेकडो बदल या सर्वांना पुरून उरणारा हाच भारत देश होय.**

आमच्या शहरांचे/गावांचे रस्ते गजबजून गेले आहेत. एकट्या पुण्यात केवळ औषधांची ४०००च्या वर दुकाने आहेत. दुकाने, दुकाने आणि दुकाने. जिकडे पहावे तिकडे दुकाने. दुसरे जीवनच नाही. या दुकानांनी व्यापलेल्या बाजारपेठेत शिक्षण हेही एक दुकानच झाले आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रात मार्केटिंग तंत्राचा मारा. या तंत्राने देश उभा राहणार नाही. विकास प्रक्रिया सगळ्यांपर्यंत पोहोचणार नाही. समाजात विषमता व धृवीकरण वाढेल. हे तंत्र समाजाला शाश्वत स्वरूपाचे समाधान देऊ शकणार नाही. बाजारपेठांमुळे निर्माण झालेल्या उपभोगवादाने भूक शमण्याचे नाव घेत नाही. लाकडावर लाकूड घासले की, अग्नी प्रदिप्त होतो. त्यात आणखीन लाकडे घातली तर अग्नी आणखी वाढतो. पाणी टाकल्याशिवाय तो थंड होणार नाही. माणसाची भूक वाढतीच आहे. हजारो कोटी डॉलर्स खर्च करून विदेशात काहींनी चंद्रस्वारीचे बुकींगसुद्धा केले आहे. माणसाला पृथ्वी अपुरी वाटायला लागली म्हणून आता चंद्राचे वेध. अशा उपभोगवादातून माणूस हावरट होतो आणि या हावरटपणातून व्यक्तिवाद फोफावतो. **'मी आणि मला' या पलीकडे विचार जात नाहीत. इतरांचा विचार करायचा असतो हे विसरले जाते.** माणसाच्या मोठेपणाचे मोजमाप त्यांनी किती मोठी पार्टी दिली, त्या पार्टीत किती अन्न वाया गेलं यावर केले जात आहे. अशा विकृत उपभोगापर्यंत समाज पोहोचला आहे. अशा अतिरेकी उपभोगवादातून व्यक्ती मोठी होते आणि समष्टी (समाज) लहान होत जाते. उपभोगाची भूक भागवायची म्हणजे पैसा हवा आणि पैसा मिळवायचा तो वाटेल त्या मार्गाने, विधिनिषेध न बाळगता मिळवायचा. अशा विचारांनी माणसाला ग्रासलं की मग १८-१९ वर्षांची शिकलेली/ न शिकलेली मुलं धमक्या देतात, खंडणी मागण्यासाठी अपहरण करतात, लुटालुट करतात, प्रसंगी खूनही करतात. अशा प्रकरणांमध्ये तथाकथित 'चांगल्या' घरातील मुलेसुद्धा सापडतात कारण त्यांना पैसे हवे असतात.

### राजकीय नेतृत्त्व : दूरदर्शीपणाचा अभाव

मंत्रीपद हवं म्हणून सहजपणाने २०० कोटी रुपये द्यायचे, उमेदवारी मागे घेण्यासाठी पैसे घ्यायचे, येन केन प्रकारे मला हवे ते मिळाले पाहिजे. या सर्व वातावरणात समाज दुर्बळ होतोय, संस्कृतीचा नाश होतो आहे आणि संस्कारमूल्ये हरवली आहेत हे चित्र भयावह आहे. देशाची प्रगती करण्यासाठी अनेक प्रकारे बदल करायला हवे आहेत, अनेक पातळ्यांवर प्रयत्न करायला हवे आहेत पण हे बदल लोकाभिमुख हवेत, देशाच्या संस्कृतीला पोषक हवेत, परंपरा आणि परिवर्तन यांचा सुवर्णमध्य साधणारे हवे आहेत.

आम्हाला नेमकं काय साधायचं आहे हे निश्चित ठरलं पाहिजे आणि ते कसं साधायचं हे ठरलं पाहिजे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व पातळीवर चर्चा व्हायला हवी आणि त्यानुसार धोरण ठरून कृती व्हायला हवी. पण दुदैवाने आज कोणालाही चर्चा नको आहे. आपल्या समोरील प्रश्नाला लगेचच उत्तर हवे असते व ते नोकरशहांजवळ त्यांच्या सर्वगुणसंपन्नतेमुळे तयारच असते! आपल्या-समोर असलेले उत्तर तात्पुरते समाधान करणारे आहे की दीर्घकालीन समाधान देणारे

**ही भूमी आपल्या अमर शक्तीनिशी व अविनाशी जीवनानिशी जगातील कोणत्याही पर्वताहून अधिक अविचलपणे उभी आहे.**

आहे याचा काही विचार नसतो. पाणी हवे आहे मग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विहीर (बोअरवेल) खणा. ती विहिर आटली तर आणखीन खोल खणा. साधे पाण्याची बाबतीत आमचे काही नियोजन नाही. हे नियोजन किमान पुढील पन्नास वर्षांचे हवे. सरदार सरोवरासारखी विशाल धरणे हवीतच पण त्याहीपेक्षा अधिक संख्येने अधिक ठिकाणी हजारोंच्या संख्येने छोटी धरणेही हवी आहेत. अशा योजनांमध्ये लोकसहभाग असायला हवा आणि त्यासाठी उत्तम नियोजन हवे. नव्या नव्या योजनांना आम्ही जन्म देतो पण आधी नियोजन केलेल्या गोष्टी पूर्ण झाल्या आहेत की नाहीत याकडे आमचे पूर्ण दुर्लक्ष असते. यातून अनेकदा विकासकामांमध्ये प्रादेशिक असमतोल आढळतो आणि त्यातून एकाच राज्याच्या दोन भागांमध्ये विकासाच्या योजनांवरून वाद उभे राहतात. एकट्या विदर्भाचा विचार केला तर पाण्याच्या संदर्भातील मंजूर केलेल्या एकूण प्रकल्पांपैकी अर्धवट स्थितीत असलेल्या प्रकल्पांची संख्या १८० ते १९० इतकी मोठी आहे.

**शिक्षण : अध्यापन क्षेत्रातील काही अनुभव**

माझे सारे आयुष्यच शिक्षण क्षेत्रात गेले आहे. १९५९ साली प्राध्यापक म्हणून अध्यापन सुरू केले आणि त्यानंतर काही वर्षातच अन्य जबाबदाऱ्या सांभाळत पुढे, आय.सी.एस.एस.आर चा सदस्य सचिव म्हणून (१९९१-९३) काम पाहिले, संशोधन केले. कारकिर्दीच्या शेवटी शिवाजी विद्यापीठाचा कुलगुरु म्हणून १९९५ ते २००० या काळात काम पाहिले. शिक्षण क्षेत्रातच सारे आयुष्य गेले असले तरी प्राथमिक शिक्षणक्षेत्राशी कधी संबंध आला नाही. आजच्या समस्यांकडे, समाजाकडे पाहिल्यानंतर असे वाटते की शिकणाऱ्या पिढीला **संस्कारातून शिक्षण मिळावे आणि शिक्षणातून संस्कार.** काही गोष्टी अशा असतात की ज्या शाळेत नाही मिळणार पण घरातील संस्कारातून त्या नक्की मिळू शकतात. आज शाळेत जाणाऱ्या मुलांच्या पाठीवर आपण दप्तराचे ओझे दिले आहे आणि ते सतत वाढतेच आहे. पाठीवर ओझी घेऊन रस्त्याने जाणारी मुले पाहताना खूप वाईट वाटते. अशी ओझी घेऊन जाणाऱ्या मुलांना शिक्षणातून कसला आनंद मिळणार? अलिकडेच एक व्यंगचित्र पाहण्यात आले. त्यात शाळेत जाणाऱ्या मुलाने विमानतळावर सामान वाहण्यासाठी वापरली जाणारी ट्रॉली धरली आहे आणि त्या ट्रॉलीमध्ये त्याचे शाळेचे दप्तर आहे. हे व्यंगचित्र सध्याच्या परिस्थितीवर पुरेसे बोलके भाष्य आहे.

या पार्श्वभूमीवर मला माझे इंग्लंडच्या वास्तव्यातील (१९७० ते १९७३) दिवस आठवले. माझा मुलगा तेथील शाळेत जात होता. शाळेत जातानाही आणि येतानाही तो आनंदाने दोन्ही हात हलवत येऊ शकत होता. याचे कारण शाळेत जाताना त्याला ना डबा न्यावा लागत होता ना दप्तर. शाळेतच त्यांना नाश्ता आणि जेवण मिळायचे. प्रत्येक मुलाच्या खाण्यापिण्याच्या सवयी, त्याची आवड-निवड याविषयी शिक्षिकांचे बारकाईने लक्ष असायचे. पालक-शिक्षकांच्या ज्या सभा व्हायच्या त्यावेळी त्यांच्या निरीक्षणाचे आश्चर्य वाटायचे पण इतक्या बारकाईने त्यांचे प्रत्येक विद्यार्थ्यांच्या प्रकृतीकडे,

**जिचे जीवन आत्म्याप्रमाणेच अनादी, अनंत व अविनाशी आहे अशा या भारतभूमीचे आपण सुपुत्र आहोत.**

सवयींकडे आणि अभ्यासाकडे लक्ष असायचे. या शिक्षिकाही शाळेत यायच्या त्या आपापल्या गाडीने कारण शिक्षिका जरी प्राथमिक शाळेतील असल्या तरी त्यांना मिळणारा पगार युनिव्हर्सिटी/महाविद्यालयात प्राध्यापकांना मिळणाऱ्या पगारापेक्षा फार कमी नव्हता. अशा शाळांमध्ये आणि अशा शिक्षिकांच्या सहवासात विद्यार्थ्यांना कसा आनंद मिळत असेल ते मला माझ्या मुलाच्या चेहऱ्यावर सहज समजायचे. शाळेचा अभ्यास शाळेतच व्हायचा आणि त्यामुळे मुलगा शाळेतून येतानाही अत्यंत उत्साहाने यायचा. या पार्श्वभूमीवर आपल्याकडे विद्यार्थ्यांची शालेय दिनचर्या आणि शिक्षक यांची काय स्थिती आहे? ऑफिसमध्ये आठ तास काम करून तुम्ही थकता मग आठ तास शाळेत जाऊन आलेला तुमचा मुलगा/तुमची मुलगी थकत नाही का? याचा विचार तरी आपल्याकडे होतो का? आम्ही फक्त मेकॉलेला शिव्या देतो. साडेतीन वर्षांनी जेव्हा आम्ही भारतात परत आलो तेव्हा इंग्लंडमधील शाळेत उत्साहाने जाणाऱ्या माझ्या मोठ्या मुलाला आपल्याकडील शाळेत जावेसे वाटेना. शाळेत जायची वेळ झाली की तो दप्तर लपवायचा, पुस्तक लपवायचा. शाळेत गेला की शिक्षकांना हसायचा.

याचे कारण कुठे तरी प्राथमिक शिक्षणाचा पाया आम्ही कच्चा ठेवला. आम्ही शिक्षणक्रमात सतत बदल करतो पण हे बदल किती विचारपूर्वक होतात? सतत प्रयोग होतात पण ते विचारपूर्वक नकोत का? आपला महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे असे आपण मानतो, तसे इतरांना सांगतो पण या महाराष्ट्रात ४० ते ४४ % एक शिक्षकी प्राथमिक शाळा आहेत, ४५ % शाळांना छप्पर नाही, जागा नाही ही स्थिती आहे. प्राथमिक शिक्षणाकडे अक्षम्य दुर्लक्ष हे एकच कारण यामागे असू शकते. पाया कच्चा राहिला म्हणून विषय वाढवायचे; क्लिष्ट आणि कठीण करायचे. त्यामुळे आपल्या मुलांच्या पाठीवरही ओझे आणि मनावरही. शिक्षणातून त्यांना आनंद मिळणार कसा?

ही झाली प्राथमिक शिक्षणाची स्थिती महाविद्यालयीन स्तरावर काय चित्र आहे? किमान १५०० विद्यापीठांची आवश्यकता आहे. विद्यमान पंतप्रधानांनी घोषणा केली आहे की ३० नव्या केंद्रीय विद्यापीठांची स्थापना करण्यात येईल. सरकारला भान आहे की नाही याची शंका वाटते. सध्या जी १२-१३ केंद्रीय विद्यापीठे आहेत ती विद्यापीठे म्हणजे पांढरे हत्ती आहेत. ही केंद्रीय विद्यापीठे विद्यार्थी निवडतात अगदी कमी (२०० ते २५०) पण त्यांच्यावर होणारा खर्च मात्र कोट्यवधी रुपयांचा. या पांढऱ्या हत्तींना पोसण्यात निधी मोठ्या प्रमाणावर खर्च होतो आणि मग तीनशे संलग्न महाविद्यालयातून शिकणाऱ्या दोन अडीच लाख विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी धडपडणाऱ्या शिवाजी विद्यापीठांसारख्या विद्यपीठांना मात्र दीड दोन कोटी रुपये पाच वर्षांमध्ये एकदा विकास निधी म्हणून द्यायचे आणि विद्यापीठांनी एवढा निधी दिल्याबद्दल समाधान मानावे अशी अपेक्षा करायची!! शिक्षणाच्या सर्व पातळीवर पुरेशी साधनं नाहीत, सामग्री नाही ही वस्तुस्थिती आहे. शिक्षणाकडे सवंगतेने पाहायचे, नेमणुका करताना क्षुद्र राजकीय स्वार्थ साधायचा, विद्यार्थ्यांना

**केवळ याच भूमीत सहानुभूती व परमसहिष्णुता ही तत्त्वे प्रत्यक्ष व्यवहारातही उतरवून दाखवली गेली.**

पास करण्यासंबंधी एक भूमिका घ्यायची की गळती थांबवायची असेल, कमी करायची असेल तर ७वी पर्यंत परीक्षा नको, सर्वांना पास करा असे म्हणायचे आणि ८वीमधील विद्यार्थी आपले नावही लिहू शकत नसल्याचे मान्य करायचे हे कशाचे लक्षण आहे? क्षुद्र राजकारण. मग गुणवत्ता कशी वाढणार?

शिक्षणावर तरी पुरेसा खर्च होतो का? आवश्यक तेवढा निधी उपलब्ध केला जातो का? ४० वर्षांपूर्वी नेमलेल्या कोठारी आयोगाने शिफारस केली होती की एकूण राष्ट्रीय उत्पन्नापैकी किमान ६ % निधी शिक्षणावर खर्च व्हावा. आजमितीला तो जेमतेम ४.१ % आहे. प्रगत राष्ट्रे शिक्षणाकडे कशी पाहतात हे जाणून घेणेही महत्त्वाचे वाटते. सिंगापूर सारख्या देशाचा शिक्षणावर होणारा खर्च आहे १५ ते १८ %. ते याला खर्च नाही, तर गुंतवणूक समजतात. ज्या राष्ट्रांना हे समजलं की शिक्षणावर होतो तो खर्च नाही तर ती उज्ज्वल भविष्यासाठीची गुंतवणूक आहे. ते पुढे गेले. एका कुलगुरु परिषदेत शासनाच्या वतीने सांगण्यात आले की विद्यापीठांना अधिक निधी वारंवार उपलब्ध करून दिला जात आहे, उच्च शिक्षणावर अधिक खर्च केला गेला आहे. दिशाभूल करणारी आकडेवारी सांगण्यात आली. दहा वर्षांपूर्वी विद्यापीठांवर २०० कोटी रुपये खर्च व्हायचे ते आज ३४० कोटी रुपये खर्च होतात. ही वाढ म्हणजे निव्वळ वाढ आहे. योजनापूर्वक केलेली वाढ नाही. एकूण खर्चाच्या तुलनेत शिक्षणासाठी किती % हा खर्च आहे? उच्च शिक्षणावर दीड टक्का निधी खर्च होत होता तो आता ०.८६ % इतका घसरला आहे, यासंबंधी माहिती संशोधकांनी उपलब्ध करून दिली आहे.

### सेवाभावी संस्था

शासकीय निष्क्रियतेच्या पार्श्वभूमीवर सेवाभावी संस्थांची भूमिका कशी आहे हे पाहणेही महत्त्वाचे वाटते. शासन स्वत: चालवते अशा संस्थांची संख्या कमीच आहे अनेक खाजगी संस्थांमार्फतच शिक्षणाचा प्रचार/प्रसार केला जातो अशा शासकीय अनुदानित संस्था मोठ्या प्रमाणात आहेत. महाराष्ट्रात इंजिनियरींग महाविद्यालयांचा विचार केला तर असे दिसते की १६० पैकी फारच थोडी म्हणजे जवळपास १७-१८ महाविद्यालये शासनाने चालविलेली आहेत आणि उर्वरित सर्व खाजगी संस्थांनी चालविलेली आहेत. या खाजगी संस्था म्हणजे एका काळच्या सेवाभावी संस्थाच असतात. सेवाभावी वृत्तीने, एखादे उदात्त राष्ट्रीय ध्येय डोळ्यासमोर ठेवून या संस्थांची सुरुवात झालेली होती पण दुर्दैवाने पुढे त्यांचीही दृष्टी व्यापारी बनते. फार म्हणजे फारच थोड्या संस्थांना आपल्या कामाचे प्रयोजन कळते. अशांच्या हाती शिक्षणाची सूत्रे द्यायला हवीत. व्यापारी दृष्टीने चालणाऱ्या आजच्या अनेक शिक्षण-संस्थांचा जन्म कोणत्या प्रेरणेने झाला हे पाहिले आणि आज त्या कशा चालविल्या जातात हे पाहिले की मी 'व्यापारी दृष्टी' का म्हणतो ते लक्षात येईल अर्थात असे घडण्याला शासकीय धोरणेही जबाबदार असतात हे खरे आहे. शासनच अशा संस्थांना स्वावलंबी तत्त्वावर अभ्यासक्रम सुरू करून निधी उभा करावा असा आग्रह करते आणि त्यातूनच पुढे

**आपल्या मायभूमीचे अवघ्या जगावर अपार ऋण आहे.**

व्यापारीकरण होते.

आज अनेक सेवाभावी संस्थांना बाहेरच्या देशातून पैसा येतो. कागदांवर जरी सेवाभावी स्वरूप असले तरी फार मोठ्या प्रमाणावर या सेवाभावी संस्थांचे व्यावसायिकीकरण झालेले आहे. विदेशांकडून पैसा घेऊन त्यांच्यासाठीच काम करणाऱ्या हस्तक संस्था असे त्यांचे स्वरूप बनते आहे. फार थोड्या (दहातील एक) सेवाभावी संस्थांमध्ये राष्ट्रहित, समाजहित याला प्राधान्य मिळताना दिसते.

शिक्षणाचे व्यापारीकरण झाले कारण 'शिक्षणाला' आम्ही 'प्रशिक्षण' म्हणून पाहायला लागलो. स्थापना करताना विद्यापीठ म्हणून स्थापन झालेल्या एका विद्यापीठाने आय.टी.आय. सारखे अभ्यासक्रम राबविणे हे कशाचे लक्षण आहे? हे बरोबर आहे का? विद्यापीठ स्थापन करताना त्यामागे ध्येयवाद होता. संस्कृत, प्राच्यविद्या, आयुर्वेद अशा विषयांच्या विकासासाठी, प्रसारासाठी आणि संशोधनासाठी हे विद्यापीठ स्थापन झाले होते. साक्षरता प्रसार हे विद्यापीठाचे काम आहे का? इलेक्ट्रिशियनचा कोर्स विद्यापीठाने चालवावा का?

शासकीय पातळीवर राजकीय सोय म्हणून दुग्धविकास मंत्री शिक्षणमंत्री होऊ शकतो. शिक्षणाची सूत्रं कोणाकडे असावी हे गांभीर्याने ठरवायला हवे, शिक्षणातून व्यक्तिमत्त्व घडतंय की नाही याकडे लक्ष द्यायला हवे. देशाची संपन्नता कशात आहे हे समजणारं शिक्षण द्या. ज्यांना शिक्षणाचे प्रयोजन कळतं अशांच्या हाती शिक्षणाची सूत्रे द्यायला हवीत.

समाजातील जो गरीब आहे त्याला जगण्याची चिंता आहे. गर्भश्रीमंतांना रस पैशात. मग समाजाचा विचार करायचा कोणी? सामान्यपणे मध्यमवर्ग समाजाचा विचार अधिक करतो असा अनुभव येतो परंतु या मध्यमवर्गातही आज 'मला काय त्याचे?' ही प्रवृत्ती वाढत आहे. ही मानसिकता देशाच्या दृष्टीने घातक व चिंताजनक आहे.

### एक दीपस्तंभ काय करू शकतो?

एखादी व्यक्तीसुद्धा राष्ट्रजीवनात बदल घडवून आणण्याच्या क्षमतेची असते त्यामुळे देशाच्या विकासासाठी मी काय करू शकेन? माझ्या एकाच्या प्रयत्नाने देशाच्या/समाजाच्या परिस्थितीत काय फरक पडणार आहे असा विचार व्यक्तिपातळीवर करणे योग्य नाही. उदाहरण म्हणून तीन भिन्न प्रकृतीच्या व्यक्तींचे कर्तृत्व पाहता येईल.

**१) महात्मा गांधी :** लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर हतबल झालेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसमध्ये महात्मा गांधीजींनी नवचैतन्य आणले. त्यांच्या पद्धतीने त्यांनी स्वातंत्र्य चळवळ राबवली. सत्याग्रह नावाचे शस्त्र ब्रिटिशांविरुद्ध आंदोलनाची रणनीती ठरवून परिणामकारकपणे वापरले आणि यामध्ये देशातील लाखो लोकांना सहभागी करून घेतले. स्वराज्य, स्वदेशी, स्वावलंबन या माध्यमातून आदर्शवाद जोपासला. आज सच्चा गांधीवाद जोपासणारे शोधावेच लागतील.

**२) श्री. गोळवलकर गुरुजी :** रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक. महात्मा गांधींच्या हत्येनंतर

**भारताचा संदेश हाच आहे की, शांती, संयम, सभ्यता, चांगुलपणा, चारुता, नम्रता या गुणसंपदेचाच शेवटी विजय होणार आहे.**

संघावर बंदी घालण्यात आली. अनेक स्वयंसेवकांची घरे उजाड झाली, अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. अशा स्थितीत आपल्या अध्यात्मिक बैठकीच्या आधारे त्यांनी स्वयंसेवकांना त्याही परिस्थितीत शांत राहण्याचा सल्ला दिला, संयमाने वागायला सांगितले. सत्याग्रह करून स्वयंसेवकांनी महात्मा गांधींच्या मार्गानेच बंदी लादणाऱ्या शासनाविरुद्ध लढा दिला. श्री. गोळवलकर गुरुजी यांच्या संयमाच्या शिकवणुकीतून समाजामध्ये संघाविषयीची अनुकुलता वाढली, कारण नसताना संघाला महात्मा गांधींच्या हत्येत गोवल्याचा संताप वाढला. शेवटी पंडित नेहरूंना सन्मानाने संघबंदी उठवावी लागली.

**३) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम :** अत्यंत गरीब मुस्लिम कुटुंबात जन्माला आलेले, रामेश्वराच्या मंदिराच्या ओट्यावर बसून अभ्यास करणारे, भगवत गीता पाठ करणारे, एर्नाकुलम स्टेशनवर वर्तमानपत्र विकणारे कलाम पुढे स्वकर्तृत्त्वाच्या बळावर अवकाश संशोधन, क्षेपणास्त्र संशोधन या क्षेत्रात एक महत्त्वाचे योगदान देणारे एक जगविख्यात शास्त्रज्ञ म्हणून परिचित झाले. आपल्या कर्तृत्वाच्या बळावरच त्यांना भारताच्या राष्ट्रपतीपदी बसण्याचा मान मिळाला. राष्ट्रपती म्हणून त्यांची कारकीर्द अनेक कारणांनी संस्मरणीय झाली. सामान्य लोकांशी संपर्क करणारे, देशातील लाखो विद्यार्थ्यांना थेट भेटून त्यांच्याशी संवाद करणारे आणि त्यांना प्रेरणा देणारे राष्ट्रपती म्हणून देशाचा गौरव बनले. अत्यंत साधी राहणी असणाऱ्या डॉ. कलाम यांनी आपल्या साधेपणाची सवय राष्ट्रपती भवनालाही लावली. राष्ट्रपतीभवनासाठी होणारा विद्युतखर्च हा कोट्यवधी रुपयांचा होता. सौरऊर्जेच्या माध्यमातून त्यांनी हा खर्च एक तृतियांश इतका खाली आणला. आपली प्रत्येक कृती हे देशाच्या भल्याची असू शकते असेच जणू अशा उदाहरणातून त्यांनी समाजाला सांगितले आहे.

*With Best Compliments From*

**DONATE GENEROUSLY FOR : VANAVASI WELFARE**
TO
**SHREE SUNDERNARAYAN**
**GAIMESH SANSKAR KENDRA**
**DEOBANDH TALUKA KHODALA, DIST. THANE**

- INSERTED BY -

**S. R. PUSALKAR & CO.**
MUMBAI

**जोपर्यंत धवल पावित्र्याचा विशुद्ध चारित्र्याचा सन्मान राखला जात राहील तोपर्यंत भारत मरणार नाही, तो अमरच राहील!**

# एक दीपसे जले दुसरा, जलते दीप अनेक।

डॉ. अशोक माधव निरफराके

*श्री. अशोक निरफराके हे राजा धनराज विद्यालयाचे विद्यार्थी असून १९६४ साली ११वीच्या माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत. एम.ए. (मानसशास्त्र) या परीक्षेत पुणे विद्यापीठात सुवर्णपदकाचे मानकरी. 'सर्जनशीलता' या विषयात विद्यावाचस्पती. मानसशशास्त्र विषयातील संशोधनासाठी जपानमधील नागोया विद्यापीठात काही काळ वास्तव्य. ज्ञानप्रबोधिनीच्या प्रज्ञामानस विभागाच्या उभारणीत मोलाचे योगदान. शीघ्र कवी असलेल्या श्री. निरफराके यांचे प्रतिभेच्या विकासासंबंधी विपुल लेखन प्रसिद्ध झाले आहे.*

आपल्या देशाने गेल्या ६० वर्षांमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात प्रगती केली आहे किंवा नाही हे ठरविताना पहिल्यांदा प्रगती कशाला म्हणायचे हे सुद्धा निश्चित करायला हवे. राहणीमानाचा दर्जा आणि जीवनमानाचा दर्जा असे निकष लावले तर माझे मत असे आहे की राहणीमानात खूप बदल झाले आहेत. भौतिक जगात याला प्रगती म्हटली जाते परंतु ते तितकेसे बरोबर नाही. एकूण जीवनमानाच्या दर्जाचा विचार केला तर मात्र समाधान वाटावे अशी स्थिती नाही. काही क्षेत्रात आपण धुमधडाक्याने प्रगती केली आहे. त्या क्षेत्रातील प्रगतीचा वेग थोडा कमी राहिला असता तरी फार बिघडले नसते. उदा. I.I.T. I.I.M. यासारख्या उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांची वाढ ज्या वेगाने झाली, त्यावर जेवढा खर्च झाला, त्या तुलनेत देशातील प्राथमिक शिक्षणाकडे मात्र आवश्यक तेवढे लक्ष पुरवले गेलेले नाही आणि त्यामुळे स्वातंत्र्याच्या ६० वर्षांनंतरही निरक्षरतेचे प्रमाण दुर्लक्ष करण्याएवढे कमी नाही ही वस्तुस्थिती आहे.

आगामी काही वर्षांमध्ये आपला देश जगात एक प्रबळ राष्ट्र, जगातील एक महासत्ता म्हणून उभे राहील असे वेळोवेळी आणि वेगवेगळ्या व्यासपीठांवरून सांगितले जाते. 'स्व'-रूपवर्धिनीसारख्या सेवाभावी शैक्षणिक संस्थेने मात्र याचा विचार करताना संस्थेचा जन्म ज्या विचारधारेतून झाला तो विचार प्राधान्याने डोळ्यासमोर ठेवायला हवा. स्वामी विवेकानंद, योगी अरविंद यांचे विचार काय सांगतात? रा.स्व. संघाच्या शिकवणीत 'आपले राष्ट्र परमवैभवाला न्यायचे आहे' असे सांगितले आहे. सत्ता नव्हे तर वैभव प्राप्त करायचे आहे.

हे वैभव दोन मार्गांनी मिळवता येते १) दैवी मार्गाने आणि २) असुरी मार्गाने. सत्ता, विनाशकारी अस्त्रे-शस्त्रे यांची निर्मिती/विक्री, दहशत अशा असुरी मार्गाने वैभव प्राप्त करणारे आहेत पण तो आपला मार्ग नाही. आपणही वेगवेगळ्या प्रकारची क्षेपणास्त्रे बनविली, क्षेपणास्त्रांचा मारा रोखणारे तंत्रज्ञान विकसित केले. असे असले तरीही तंत्रज्ञानाच्या बाबतीत आपण अमेरिकेसारख्या देशाच्या तोडीचे झालो आहोत असे नाही. मग या शस्त्रांच्या वेड्या स्पर्धेत आपण का उतरायचं? देशाच्या संरक्षणासाठी आवश्यक तेवढी अद्ययावत शस्त्रे असली पाहिजेत,

**द्वेषात असणाऱ्या सामर्थ्यापेक्षा प्रेमातले सुप्त सामर्थ्य अमर्यादित पटींनी मोठे आहे.**

ते योग्यही आहे, पण त्यापलीकडे आपण त्या मार्गावर फार जाऊ नये. तंत्रज्ञानाच्या दृष्टीने नव्हे तर जीवनमानाच्या दृष्टीने आपण क्रमांक एकचे कसे होऊ याचा विचार करायला हवा.

आज जीवनमानाच्या दर्जानुसार जगामध्ये आपल्या देशाचा क्रमांक १२७ च्या आसपास आहे आणि नॉर्वे, स्वीडन यासारख्या छोट्या देशांचा क्रमांक पहिल्या पाच क्रमांकामध्ये आहे. आमच्या डोळ्यासमोर जीवनमानाच्या दृष्टीने आमचा देश अग्रस्थानी असावा असे उद्दिष्ट असायला हवे. अर्थात त्यासाठी करावे लागणारे काम प्रचंड आहे. या देशात सर्वांपर्यंत शिक्षण पोहोचले पाहिजे, कोणाही महिलेला जगण्यासाठी देहविक्रय करावा लागणार नाही, कोठेही भूकबळी नाही, कुपोषण नाही, अशी स्थिती प्राप्त करावी लागेल. असे मूलभूत विषय अग्रस्थानी राहण्यासाठी आणि त्यातून जीवनमान उंचावण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामात सेवाभावी संस्थांची मोठी भूमिका असू शकते.

व्यक्तिगत पातळीवरही करण्यासारख्या अनेक गोष्टी आहेत. उच्च जीवनमानाची सुरुवात स्वत:पासून करायला हवी आणि उच्च जीवनमानाचा निकष ठरवताना घरात किती प्रकारची भौतिक साधने आहेत यापेक्षा घरामध्ये किती पुस्तके आहेत, उपयुक्त विषयांच्या सी.डी. आहेत असे निकष लावता येतील. **'आपण आणि भोवतालचे' असा विचार करून स्वत:च्या घरापलीकडे विचार करायची सवय जाणीवपूर्वक लावून घेतली तर व्यक्तिपातळीवरसुद्धा कितीतरी उपयुक्त कामे करता येतील.** उदा. घरामध्ये कामाला येणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबाला गरिबीच्या रेषेच्या वर आणण्यासाठी आपण काय करू शकतो? अशा घरातील शिकणाऱ्या मुलामुलींचे पालकत्व आपण घेऊ शकतो का असा विचार करणारी कुटुंबे वाढली तर **'एक दीपसे जले दुसरा, जलते दीप अनेक'** अशा न्यायाने ज्ञानाचा उजेड आणि सुखाची किरणं सर्व घरांमधून पसरू शकतील.

*With Best Compliments From*

❖ ❖ ❖

**BALDOTA SAMAL & ASSOCIATES**

'Krutanjali', Apts., 65/20, Erandwana,
Law College Road, Pune 411 004.
■ Tel. : 25433200 ■ Fax : 25432300

**आज भारताला कशाची आवश्यकता असेल तर ती भारताने परकियांच्या मोहजालातून, भ्रमजालातून आपली मुक्तता करून घेण्याची आहे.**

# आरोग्यम् धनसंपदा।

डॉ. शशिकांत अहंकारी

*डॉ. शशिकांत अहंकारी व त्यांच्या पत्नी डॉ. शुभांगी अहंकारी हे दोघेही गेल्या किमान १० वर्षांपासून ग्रामीण विकासाच्या कामात कार्यरत आहेत. उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर व उमरगा तालुक्यांमधील ६० गावांमध्ये 'हॅलो मेडिकल फौंडेशनच्या' माध्यमातून ते गावपातळीवर भारतवैद्यक महिला कार्यकर्त्या प्रशिक्षित करण्याचे काम करीत असून त्यांच्या माध्यमातून गावागावांमध्ये आरोग्यविषयक जनजागृती करणे, प्राथमिक आरोग्य सेवा पोहोचविणे असे काम केले जाते. फौंडेशनच्या माध्यमातून २५० महिला बचत गट चालविण्यात येत असून किशोरी विकास प्रकल्प, ग्रामीण आरोग्य विमा, स्वयंरोजगार या विषयांमध्येही काम चालते.*

भारत देश फारच मोठा आहे. स्वातंत्र्यानंतर देशाने साधलेली प्रगती आणि विकास हे मोजायचे ठरवलं तर तसं ते कठीणच काम आहे. भौतिकदृष्ट्या भरपूर प्रगती देशाने साधलेली आहे. पण शिक्षणक्षेत्र, आरोग्य क्षेत्र हे खरे तर विकास मोजमापाचं मापक म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात मात्र देशाची परिस्थिती अजून मागासलेपणाचीच आहे हे सर्वांना मान्य करावे लागेल. या क्षेत्रात अजूनही अपेक्षित बदल नाही. आरोग्य क्षेत्राचा विचार केला तर सर्व प्रकारच्या मृत्युदरात घट झालेली आहे पण अजूनही मातामृत्यु, बालमृत्यु होतच नाही असे ठामपणे सांगायला आपली जीभ तयार होत नाही. हजारी ४० अर्भक-मृत्यूला अजूनही आपल्याला सामोरे जावे लागते. प्रत्येक खेडी जवळच्या शहराला जोडली गेली. दळणवळणाची सोय उत्तम प्रकारे झाली पण या भौतिक विकासावर समाधान राहून भागणार नाही. आपला देश मानवी विकासात मात्र अजून मागेच आहे. मूठभर लोकांची सर्वांगीण प्रगती झाली. आज कृषिप्रधान म्हणून देशाची जगात ओळख होत असताना शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढत असलेले प्रमाण आटोक्यात आणू शकलो नाही. भ्रष्टाचाराचे तांडवनृत्य अजूनही बिनधोक चालूच आहे. प्रत्येक क्षेत्रातली निर्णयप्रक्रिया आणि समाजातील दुर्लक्षित घटक यामधील अंतर वाढत आहे पण कमी होत नाही. भौतिक विकासाबाबत असलेला समाधानीपणा हा आत्मघातकी आहे. आज अजूनही धर्मवाद-जातीवाद यावरून दंगली होतच आहेत. यामुळे देश वर्षानुवर्षे मागे जात आहे.

सर्वच क्षेत्रात समाधानकारक विकास साधायचा असेल तर अमर्त्यसेन यांनी म्हटल्याप्रमाणे देशाचा खऱ्या अर्थाने विकास साधायचा असेल तर शिक्षण क्षेत्र आणि आरोग्य क्षेत्र या क्षेत्रावर भर दिल्याखेरीज विकास शक्य नाही. आरोग्यावरचे बजेट एक पंचमांशपर्यंत वाढवल्याशिवाय आरोग्यसेवा दर्जेदार होणार नाही शिक्षण अजूनही आपण मोफत देऊ शकत नाही. मोफत शिक्षण पद्धतीचा अवलंब करणे अत्यंत गरजेचे आहे. शिक्षण आणि आरोग्य हा प्रत्येक माणसाचा अधिकार मानला गेला पाहिजे.

वरील प्रकारचा विकास साधताना मनुष्यबळ ही सर्वांत मोठी ताकद आहे याचा विसर पडायला नको.

**सुसंस्कृत देशांच्या मालिकेत आपले हकाचे स्थान मिळविण्यासाठी भारताने फक्त युगायुगांच्या प्रदीर्घ झोपेतून जागे होण्याचीच काय ती आवश्यकता आहे.**

नैसर्गिक साधनसंपत्तीचा/ताकदीचा उपयोग आपण फारच कमी प्रमाणात करतो. देश मोठा असला तरीदेखील सर्वच क्षेत्रातील भ्रष्टाचार हे एक फार मोठे आव्हान आहे. धर्मजात वर्गाच्या पातळीवरील विषमता अजूनही वाढते आहे. हे एक देशापुढचे मोठे आव्हान आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या (SEZ) बाबतीतला वसाहतवाद, जागतिकीकरण, खाजगीकरण, लोकसंख्यावाढ, तरुणांची बेरोजगारी, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील दांभिकता हे फा मोठे आव्हान आहे.

देश सामर्थ्यशाली होण्यासाठी चिरस्थायी टिकणारी शेती याकडून प्रामुख्याने विचार करणे गरजेचे आहे. भ्रष्टाचाराचे समूळ उच्चाटन झाल्या-शिवाय देशाचा विकास शक्य नाही. देशात उत्पादित झालेल्या मालाचा वापर होणे गरजेचे आहे. शिक्षण आणि आरोग्य या दोन क्षेत्रांचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे. शिक्षण पद्धत मोफत झाली पाहिजे व मानवी मूल्ये जोपासली पाहिजेत.

सेवाभावी संस्थानी समाजात काम करताना शासनाची भूमिका बजावण्याचं काम करू नये. सेवाभावी संस्थानी विकासात्मक मॉडेल निर्माण करण्याचे काम करणे गरजेचे आहे. हे करीत असताना महात्मा गांधीजींचा कस्तुरबा ट्रस्ट, बाबा आमटेंची महारोगी सेवा समिती अशा संस्थांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा. संस्था संशोधन क्षेत्रात, कार्यकर्त्यांच्या प्रशिक्षणात, वेगवेगळ्या चळवळींसाठी समाजमन बांधण्यात, मानवी अधिकारांबद्दलची जाणीव जागृती करण्यात नेहमी अग्रेसर असावी.

प्रचलित शिक्षण पद्धतीही भांडवलशाहीखाली दडपलेली आहे. 'आवडी'ने निवड करून शिक्षण आज घेता येणार नाही तर पगाराधिष्ठीतेवर आधारलेली शिक्षण पद्धत आहे. आजही शिक्षण पद्धत धनिकांची मक्तेदारी बनून राहिलेली आहे ही दुर्दैवी बाब आहे.

आज सेवाभावी संस्थाची परिस्थिती बघितली तर अशा संस्थांची प्रतिमा जनमानसात डागाळलेली आहे. ती प्रतिमा स्वच्छ करून घेतली पाहिजे. जनतेचा चिरस्थायी विश्वास संपादन करणे गरजेचे आहे.

●●●

*With Best Compliments From*

**N.R. BALDOTA FOUNDATION**

'Krutanjali', Apts., 65/20, Erandwana,
Law College Road, Pune 411 004.
■ Tel. : 25433200 ■ Fax : 25432300

**बंधूंनो, आपण आता सगळेच कठोर परिश्रम करूया. आता आपल्याला झोपायला वेळ नाही. आपल्या कामावरच भावी भारताचा उदय अवलंबून आहे.**

# स्वार्थ-साधना की आँधी में, वसुधाका कल्याण न भूले।

**परिमल चौधरी**

*प्राज इंडस्ट्रीज लिमिटेड कंपनीच्या संचालिका म्हणून काम पाहणाऱ्या परिमल चौधरी या इंग्रजी विषयाच्या पदवीधर असून त्यांनी जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विषयातील पदवी तसेच समाजशास्त्र विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तम गुणांनी धारण केली आहे. बिझिनेस इंडिया या सुप्रसिद्ध मासिकासाठी काही काळ त्यांनी पत्रकार म्हणून काम पाहिले आहे. अध्यापक या नात्याने, पुणे विद्यापीठाच्या जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विषयातील अभ्यासक्रमात काही काळ त्यांनी काम पाहिले आहे. न्युयॉर्कच्या सायराक्युज विद्यापीठातून 'रेडिओ, फिल्म अॅन्ड टि.व्ही' या विषयात त्यांनी एम.एस. पदवी धारण केली असून त्यांना **'फुलब्राईट फेलोशिप'** ने सन्मानित करण्यात आलेले आहे. परिमल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्राज फौंडेशनच्या माध्यमातून विविध सामाजिक कामे केली जात आहेत.*

आपल्या देशाने गेल्या ६० वर्षांमध्ये केलेल्या प्रगतीच्या गतीचा विचार केला तर असे म्हणता येईल की अजून बरेच काही करण्याचे राहून गेले आहे. एकीकडे असे दिसते की आपल्या देशाला असे काही वरदान मिळाले आहे की जगात हे अन्य कुणालाही मिळाले नसेल. तर दुसरीकडे आपल्या देशासमोर वेगवेगळ्या स्वरूपाच्या, तीव्रतेच्या समस्या उभ्या आहेत. आणि या समस्यांचे स्वरूपही प्रचंड आहे. आपल्या देशाने केलेल्या प्रगतीचा विचार मला खालील निकषांवर करावा असे वाटते -

१) आपल्या देशाने गाठलेला आर्थिक प्रगतीचा वेग.

२) धार्मिक, जातीय समिकरणांचा देशाच्या राजकारणावरील वाढता प्रभाव कमी करण्यात मिळालेले यशापयश.

३) सामाजिक समरसता उत्पन्न होण्यासाठी अतिश्रीमंत-गरिबीच्या रेषेखाली राहणारे, शिक्षित-अशिक्षित, यांच्यामध्ये निर्माण होत असलेली प्रचंड दरी कमी करण्याच्या दृष्टीने मिळालेले यशापयश.

वरील तीनही निकषांवर आपल्या देशाने केलेल्या प्रगतीचा विचार केला तर असे वाटते की प्रगतीची ही गती, आपल्या देशासारखी परिस्थिती असलेल्या (लोकसंख्या, परंपरा इ.) अन्य देशांनी केलेल्या प्रगतीच्या गतीच्या तुलनेत खूपच कमी आहे. माझ्या मते ही गती योग्य प्रमाणात वाढण्यासाठी आपल्याला तीव्र राजकीय इच्छाशक्ती, लोकांचा सक्रीय सहभाग आणि युवापिढीतून उद्याचे नवे नेतृत्व घडवू शकणारी कार्यक्षम यंत्रणा याची नितांत गरज आहे. कारण अशा रचनेतूनच वेगवेगळ्या क्षेत्रातील नव्या पिढीला प्रोत्साहन आणि दिशादर्शन मिळू शकेल,

प्रगतीचा वेग जरी अपेक्षेपेक्षा कमी असला तरी या प्रगतीतून आपली काही बलस्थानेही स्पष्टपणे दिसतात. तशाच आपल्यातील काही कमतरताही दिसतात.

### आमची बलस्थाने

- वेगवेगळ्या पातळीवर वेगवेगळ्या समस्या येऊनही या देशात लोकशाही टिकली आणि रुजली.

- जगातील सर्व देशांच्या तुलनेत आपल्या देशात सर्वाधिक प्रमाणात तरुण वयोगटाची जनसंख्या आहे.
- बुद्धिगुणसंपदेच्या बाबतीत आपला देश सर्वाधिक समृद्धी लाभलेला देश आहे.

**आमच्यातील कमतरता**

- संपत्तीचे असमान वाटप.
- संपूर्ण साक्षरता हे आज स्वातंत्र्याच्या ६० वर्षांनंतरही (संपूर्णपणे साकारले न गेलेले) एक स्वप्नच आहे.
- भारतीय नागरिकांच्या आरोग्याची स्थिती. (अधिक काळजी करावी अशी वाटते.)
- हवामानात होत जाणारे बदल आणि या बदलत्या वैश्विक वातावरणात होणाऱ्या हवामानाच्या बदलांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांचे नजीकच्या भविष्यकाळात भारताच्या भवितव्यावर होणारे परिणाम याविषयी आम्ही जागरूक नाही.

आपल्या बलस्थानांचा विचार करून देशाच्या विकासाचा विचार करताना आपल्यातील कमतरतांचाही विचार करावा लागेल. आमच्याकडे जगातील सर्व देशांच्या तुलनेत सर्वाधिक तरुण लोकसंख्या आहे हे आमचे बलस्थान असले तरी ही तरुण पिढी आरोग्यसंपन्न राहिली पाहिजे आणि त्यांना त्यांच्या बुद्धीची चमक दाखविण्यासाठी आणि त्याद्वारे देशाचे वैभव वाढविण्यासाठी आधी शिक्षणाची योग्य संधी मिळाली पाहिजे. तसेच वैश्विक पातळीवर हवामानात जे बदल होऊ लागले आहेत त्याचा मुकाबला आम्ही कसा करणार आहोत याचा विचार करून त्या आव्हानांना सामोरे जाण्याची आमची कृतीयोजना तयार असायला हवी.

सेवाभावी संस्थांनी आजवर विविध सरकारी, सामाजिक उन्नयनाच्या योजना प्रत्यक्षात साकारण्यासाठी सरकारी यंत्रणेला सहकार्य करणाऱ्या सहकाऱ्याची भूमिका उत्तम साकारली आहे. कारण कागदावर उत्तम असलेल्या योजना सरकारी यंत्रणेद्वारे गरजूंच्या रांगेतील शेवटच्या माणसापर्यंत परिणामकारकरित्या पोहोचत नाहीत हा अनुभव सर्वत्र येतो. त्या ठिकाणी जर सेवाभावी संस्था असतील तर गरजूंच्या रांगेतील शेवटच्या माणसालाही त्याचा लाभ मिळू शकतो. समाजाच्या जीवनमानात पूर्वीपेक्षा अधिक चांगली स्थिती आणण्यासाठी कटिबद्ध असलेल्या सेवाभावी संस्था एक शक्ती बनून काम करतात. सर्वच नाही पण काही सेवाभावी संस्थांच्या बाबतीत तर अशा संस्थांची माणसे आपले सर्व कौशल्य, आपली सर्व बुद्धिमत्ता पणाला लावून पूर्णपणे झोकून देऊन काम करतात. एकूणच सेवाभावी संस्थांच्या देश विकासातील स्थानाकडे पाहताना हे जाणवते की कमी-जास्त प्रमाणात अशा सर्वच संस्थांनी आपापल्या कामाच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा एक सर्वंकष दृष्टिकोन समाजाला दिला आहे आणि दुर्लक्षित सामाजिक प्रश्नांकडे आणि क्षेत्राकडे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. माझ्या मते सेवाभावी संस्थांचे हे मोलाचे योगदान आहे.

भविष्यातही सेवाभावी संस्थांची सामाजिक

**ज्यांची आपण सर्वप्रथम पूजा करावी असे देव म्हणजे आपले देशबांधव होत.**

विकासाच्या कामात महत्त्वाची भूमिका असणार आहे. समाजाच्या विकासासाठी सरकार वेळोवेळी ज्या-ज्या योजना घोषित करते किंवा त्यांची अंमलबजावणी करते अशा सर्वांवर सेवाभावी संस्थांचे सतत लक्ष असते आणि त्या योजनेच्या हेतूविषयी, अंमलबजावणीविषयी अशा संस्था वेळोवेळी विश्लेषणात्मक भुमिकेतून आपली मते सर्वांसमोर ठेवत असतात. याशिवाय सेवाभावी संस्था आणखीन महत्त्वाची गोष्ट करीत असतात. सरकारी योजनेतून किंवा एकूणच समाजाच्या नजरेतून जो उपेक्षित घटक निसटलेला असतो, दुर्लक्षित झालेला असतो अशा घटकांना योग्य तो लाभ मिळवून देण्यात सेवाभावी संस्थांची भूमिका फार मोलाची असते.

अगदी मूलगामी विचार करायचा झाला तर असे म्हणता येईल की -

- प्राथमिक शिक्षण समाजाच्या अगदी तळापर्यंत झिरपले गेले पाहिजे.
- हे काम यशस्वी होण्यासाठी कोणत्या परिस्थितीत, कोणत्या कारणांसाठी अनेक मुलामुलींना शाळा मध्येच सोडून का द्यावी लागते याचा नीट अभ्यास व्हायला हवा. अशा प्रकारच्या कोणत्याही कारणांमुळे किंवा परिस्थितीमुळे कोणाचेही शिक्षण खंडित होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. त्यासाठी आमची कृतीयोजनाही निश्चित असायला हवी.
- शहरी गरीब, भटक्या जाती-जमाती, ऊस-तोडणी कामगारांसारखे भटके श्रमजीवी, वेगवेगळ्या कारणांनी होणारे स्थलांतरीत, जातींच्या उतरंडीत दूर फेकले जाणारे, समाजाच्या मूळ प्रवाहापासून दूर राहणारे आदिवासी / वनवासी अशा वेगवेगळ्या परिस्थितीमधील लोकांच्या मुलांना शिक्षण देताना अभ्यासक्रमात काय बदल करायला हवेत, कोणत्या नावीन्यपूर्ण कल्पना राबवून शिक्षण स्थल-काल सुसंगत कसे करता येईल याचा अधिक विचार करायला हवा.
- शिक्षण क्षेत्रात झोकून देऊन काम करणारी, उत्तम शिकवू शकणारी आणि उत्तम शैक्षणिक पार्श्वभूमी असलेली माणसं येण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना आकर्षक वेतन देण्याची गरज आहे.
- माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण-क्रमामध्ये विद्यमान अभ्यासक्रमाशी समांतर अशा संगणक साक्षरतेलाही प्राधान्य मिळावे.
- अल्प कालावधीच्या रोजगारक्षम अशा छोट्या-छोट्या सेवाव्यवसायांमध्ये सर्व-सामान्य तरुणांना उत्तेजन कसे मिळत राहील याचा विचार विविध उद्योग व कौशल्य शिक्षणविषयक शिक्षणक्रम ठरविताना व्हायला हवा.
- डॉक्टरेटसारख्या उच्च पदवीचे शिक्षण बौद्धिक पातळीच्या दृष्टीने अधिक कठीण, अधिक स्पर्धात्मक परंतु आर्थिकदृष्ट्या प्रोत्साहित

**परस्परांचा मत्सर करण्याऐवजी व परस्परांशी कलह करीत बसण्याऐवजी आपल्या या देशबांधवांची पूजा आपण केली पाहिजे.**

करणारे असायला हवे. या दृष्टीने या संदर्भातील विद्यमान धोरणात आवश्यक ते बदल व्हावेत. असे बदल करण्याने अनेक लाभ होतील.

डॉक्टरेटसारख्या उच्च पदवीच्या शिक्षणामध्ये ताजेपणा येईल. शोध निबंध लिहिणाऱ्यांचा ज्ञान अद्ययावत असण्याकडे कल वाढेल आणि त्यामुळे प्रत्यक्षात काहीच शोध नसलेले फुटकळ शोधनिबंध लिहिल्याबद्दल दिल्या जाणाऱ्या पीएच.डी.च्या भारंभार पदव्या वाटल्या जाणार नाहीत. एका अर्थाने हे क्षेत्र सुरक्षित हातांमध्ये राहील.

सेवाभावी संस्थांनी आगामी काळात काम करताना आपल्या कार्यपद्धतीतही काही बदल करून घेणे आवश्यक आहे असे मला वाटते. कोणत्याही सेवाभावी संस्थेचे उद्दिष्ट जरी उद्योगांसारखा नफा कमावण्याचा नसले तरी सेवाभावी संस्थांचे कामही तितकेच प्रभावीपणाने चालले पाहिजे तर त्यांना आपले उद्दिष्ट साकारता येईल. यासाठी सेवाभावी संस्थांनी व्यावसायिक किंवा उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ लोकांच्या सहकार्याने आपले काम पुढे न्यावे. अशा क्षेत्रातील तज्ज्ञांच्या बुद्धिमत्तेचा, अनुभवाचा आणि व्यावहारिक सल्ल्यांचा उपयोग सेवाभावी संस्थांना आपले उद्दिष्ट साकारताना निश्चित होईल. तसेच एकाच प्रकारची कामे एकाच क्षेत्रात वेगवेगळ्या सेवाभावी संस्थांनी करण्यापेक्षा एखाद्या क्षेत्रातील वेगवेगळ्या सेवाभावी संस्था संघभावनेने एकत्र आल्या तर तज्ज्ञता असलेल्या आपापल्या क्षेत्रात त्यांना अधिक ताकतीने काम करता येईल.

व्यक्तिगत पातळीवर प्रत्येकजण देशासाठी काही ना काही निश्चित करू शकतो. माझ्याच बाबतीत मी असं म्हणेन की मला जी उच्च शिक्षणाची संधी मिळाली आहे आणि जे सामाजिक स्थान प्राप्त झाले आहे त्याचा उपयोग करून मी पर्यावरणाचे प्रश्न आणि त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक प्रश्नांसंदर्भात समाजातील कृतिशील संवेदनशीलता जागवण्याचे काम करण्याला तसेच अनुरूप कृतीयोजना साकरण्याला सर्वोच्च प्राधान्य देईन. पृथ्वीची जी असुरक्षित स्थिती दिवसेंदिवस बनत चालली आहे आणि त्यातून सजीव जातींच्या/मनुष्यजातीच्या अस्तित्वालाच जो धोका निर्माण होऊ पाहतो आहे याविषयी जागरूकता उत्पन्न करणे ही गोष्ट माझ्या दृष्टीने सर्वांत प्राधान्यक्रमाची आहे. बदलत जाणारे वातावरण/हवामान आणि त्याचा भारतावर, भारतातील लोकांवर होणारा परिणाम याविषयी लोकांना माहिती करून देणे हे एक नवेच काम करावे लागणार आहे. उद्योगांचे सामाजिक ऋण (Corporate Social Responsibility) या संकल्पनेनुसार आमच्या कंपनीने जो कृती आराखडा तयार केला आहे तो नेमका याच विषयात काम करण्यासंबंधीचा आहे. सर्वांना सहभागी करून घेत प्रत्यक्ष काही कृती कार्यक्रमांची जोड देऊन आमची कंपनी या विषयामध्ये प्रत्यक्ष काही काम करीत आहे आणि हे काम करताना आवश्यक तेथे अशा विषयात तज्ज्ञता असलेल्या अन्य संस्थांच्या सहकार्याने हे काम करण्याचे आम्ही ठरविले आहे.

●●●

**अगामी वर्षे आपली थोर भारतमाता हीच आपली आराध्यदेवता असली पाहिजे.**

# विस्ताराच्या दिशेने....

*वर्ष २००७ चे कार्यवृत्त सादर करताना 'स्व'-रूपवर्धिनीचे प्रयत्न काय आहेत व काय साधायचे आहे याची थोडक्यात रूपरेषा आपल्यासमोर मांडीत आहे.*

*भगवद्गीतेमध्ये 'उद्धरेदात्मनात्मानम्' असे सांगितले आहे. आपली प्रगती आपल्या गुणवत्तेतूनच होणार आहे. ही गुणवत्ता वर्धिनीच्या विद्यार्थ्यांनी स्वत:हून वाढविणे, तिचा विकास करणे आणि त्यासाठी जे जे म्हणून सहाय्य लागेल ते ते त्यांना उपलब्ध व्हावे असा वर्धिनी प्रयत्न करीत आहे.*

*वर्धिनीच्या कामाला २८ वर्षे पूर्ण झाली आहेत. काही अडचणींमुळे रौप्यमहोत्सवी वर्षात ठरविलेला विस्तार प्रकल्प थोडा लांबला आहे. आता लोहगावच्या विमानतळ परिसरातील चऱ्होली (बुद्रुक) येथील आपले भूखंड आपल्या ताब्यात आले आहेत आणि आपल्या अनेक विस्तार प्रकल्पांना चालना मिळण्याची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे.*

*हे युग बौद्धिक क्षमतांची परिसीमा गाठणाऱ्या प्रयत्नवादी व्यक्तींचे आहे. त्यासाठी अमाप परिश्रम, एकाग्रता आणि सुदृढ देहयष्टी यांची आवश्यकता आहे. या गुणांची जोपासना करतानाच समाजाभिमुखतेचेही बाळकडू वर्धिनीच्या विद्यार्थ्यांना मिळावे असा आमचा प्रयत्न आहे.*

*केवळ ज्ञानार्जनापेक्षा त्यातून त्वरित अर्थार्जनाची, म्हणजे एका अर्थाने करिअरची संधी निर्माण व्हावी त्यासाठी औद्योगिक शिक्षण, नव्या-नव्या क्षेत्रात पदार्पण, वाढत जाणाऱ्या सेवा क्षेत्रातील अनेक कौशल्यांचे मार्गदर्शन व काही प्रमाणात प्रत्यक्ष शिक्षण मिळावे यासाठी चऱ्होली येथील जागेत अनेक प्रकल्प राबविण्याचे आम्ही ठरवीत आहोत. यामध्ये वैमानिक क्षेत्र, आरोग्यसेवेशी संबंधित काही प्रकल्प अशांचा समावेश आहे. चऱ्होली येथे हे नवे प्रकल्प कार्यान्वित झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रगतीचे व समृद्धीचे दालन खुले होणार आहे असा मला विश्वास वाटतो. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये क्षमता आहेत परंतु त्यांनी अशा सर्व नव्या प्रकल्पांची माहिती घ्यावी आणि त्यासाठी आवश्यक ती कौशल्ये आत्मसात करण्याचा प्रयत्न करावा असे मी आवाहन करतो. असेच आवाहन या निमित्ताने वर्धिनीच्या कामावर प्रेम करणाऱ्या देणगीदार, हितचिंतक आणि मार्गदर्शकांनाही करतो की त्यांनी वर्धिनीच्या या विस्तार प्रकल्पांसाठी सक्रीय सहकार्य करावे.*

(पुरुषोत्तमभाई श्रॉफ)
**कार्याध्यक्ष**
**'स्व'-रूपवर्धिनी**


**मी भारतीय आहे आणि प्रत्येक भारतीय माझा भाऊ आहे.**

# आर्थिक आघाडीवरून...

'काम कितीही सांगा, काम करीन. फक्त निधी गोळा करण्याचे काम सांगू नका. मला ते जमणार नाही.' प्रत्यक्ष काम करणाऱ्या अनेक कार्यकर्त्यांची अशीच मन:स्थिती असते. पण सार्वजनिक संस्थेचे काम सुरळीत चालवायचे असेल तर आर्थिक आघाडीकडे दुर्लक्ष करून चालतच नाही. निधी संकलनाच्या बाबतीत 'स्व'-रूपवर्धिनीचा अनुभव खूप उत्साहवर्धक आहे. चांगल्या कामाला भरभरून आर्थिक मदत करणारा खूप मोठा वर्ग समाजामध्ये आहे आणि अत्यंत आत्मियतेने हा वर्ग वर्धिनीसारख्या सामाजिक कामांकडे पाहत असतो ही अनुभूती संस्था स्थापनेपासूनच वर्धिनी घेत आहे. समाजाच्या अशा आपुलकीमुळे कोणतेही शासकीय आर्थिक साह्य मिळत नसतानाही वर्धिनीचे काम वाढते आहे.

आर्थिक वर्ष २००६-०७ चा विचार केला तर वर्षभरामध्ये एकूण निधी रुपये ३९०००००/- इतका जमा झाला. व संपूर्ण वर्षाची आर्थिक गरज पूर्ण होऊन रुपये २००००००/- इतकी रक्कम अधिक शिल्लक राहिली. अर्थात यापैकी रुपये १२०००००/- एवढी रक्कम केवळ मार्च महिन्यात देणगीरूपाने जमा झाल्याने या वर्षांत ही रक्कम खर्ची पडू शकली नाही. एका दृष्टीने समाजाने पुढील वर्षासाठी वर्धिनीला आधीच साहाय्य केले असल्याने कामाचा उत्साह वाढला आहे.

खर्चाचा विचार करता एकूण प्रत्यक्ष खर्च झाला रुपये १८,१०,२१५.२५ यापैकी व्यवस्थापकीय खर्च, विविध करांपोटी झालेला खर्च व उद्दिष्टांपोटी झालेला खर्च याचे प्रमाण खालील प्रमाण होते.




व्यवस्थापकीय खर्च
रु. ३,५१,२७७.३०
करांपोटी झालेला खर्च
रु. ४१,९०४.००
उद्दिष्टांवर झालेला खर्च
रु. १४,१७,०३३.९५

**आवाहन :** नित्य चालू असलेल्या कामाची वाढ आणि संकल्पित शिबिरसंकूल निर्मितीसाठी होणाऱ्या खर्चासाठी आपले आर्थिक सहकार्य मिळत रहावे. आलेला प्रत्येक रुपया हा योग्य कामी खर्च होईल याची काळजी आम्ही निश्चित घेऊ.

आपला समाज हेच एकमेव जागृत दैवत आहे.

# दु:खद निधन

वर्षभरामध्ये वर्धिनीशी संबंधित दु:खद घटना घडल्या. या कालावधीत खालील व्यक्तीचे देहावसान झाले.या सर्व कुटुंबियांच्या दु:खात वर्धिनी सहभागी आहे.

- श्रीमती इंदिराबाई गोगावले
- श्री. दादासाहेब डिंबळे
- श्री यशवंत कदम
- श्री. काशिनाथ राणे
- श्री. रमेश वल्लभदास श्रॉफ
- श्री. वसंतराव खटावकर
- श्रीमती प्रवासिनी जोशी
- श्रीमती मंगलाबाई अभ्यंकर
- श्री. अनंत यादव
- कुमार सुदीप पगारिया
- श्री. विकास विष्णू तांबट
- श्रीमती सुधा अनंत कुलकर्णी



- श्रीमती अंजनीबाई माशेलकर
- श्री राजाराम इनामदार
- श्रीमती प्रेमलता सामळ
- श्रीमती सुशिलाबाई मुतालिक
- सौ. नीलाताई वरखेडकर
- श्री. भाऊसाहेब शहा
- श्री. कृ.ल. गद्रे
- श्री. मारुतराव पाटोळे.
- श्री. चिमणलाल दोशी
- अमेय संजय मोघे
- श्रीमती सुलभा वसंत आगाशे
- सौ. वसुधा शरद वाघ



**'दि.दा.'** या नावाने वर्धिनी परिवारात सर्वांना परिचित असणारे वर्धिनीचे प्रधान शाखा प्रमुख श्री. दिनकर दा. जोशी सर यांचे प्रदीर्घ आजाराने दि. २२/८/०७ रोजी दु:खद निधन झाले. वर्धिनीच्या स्थापनेपासून वर्धकांना प्रेरणा देणारे दि. दा. हे अत्यंत तळमळीने काम करणारे कार्यकर्ते म्हणून शैक्षणिक विश्वात प्रसिद्ध होते. वर्धिनीची स्वामी अखंडानंद शाखा ही त्यांच्या धडपडीतून, प्रेरणेतून सुरू झाली. आज या शाखेच्या कामाचा जो विस्तार झाला आहे, हे त्यांच्या परिश्रमाचे फळ आहे. कोयना भूकंप, पानशेत धरण फुटी या सारख्या आपत्तींच्या वेळी त्यांनी केलेले काम हे अत्यंत प्रेरणादायी व आदर्श असे होते.

**ॲड. श्री. प्रभाकर लकडे :** वर्धिनीचे काम सुरू झाल्यानंतर अनेक वर्षे ॲड. लकडे यांचे घर हेच वर्धिनीचे कार्यालय होते. अशा आत्मियतेच्या आधारावरच वर्धिनीचा आजचा विस्तार झाला आहे.

**श्रीमती कमलाबाई कुलकर्णी :** वर्धिनीचे काम सुरू झाल्यानंतर स्वत:ची जागा नसतानाही अनेकांची घरं हीच वर्धिनीची हक्काची ठिकाणं होती. श्री. सुनील कुलकर्णी यांचे घर यापैकी एक. त्यांच्या घरात वर्धिनीची प्रयोगशाळाही होती आणि ग्रंथालयही. घरी वेळी अवेळी येणाऱ्या वर्धकांचे स्वागत श्रीमती कमलाबाई अतिशय हसतमुखाने करीत. त्यांच्या आत्मियतेमुळेच अनेकांना त्या घरी वारंवार जावे असे वाटे.

**आपल्या अवतीभोवती वावरणाऱ्या असंख्य माणसांतील विराट देवाची आराधना केली तर इतर सर्व देवांची आराधना केल्यासारखेच ठरेल.**

## दैनंदिन शाखा आणि प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

**शाखा विभाग प्रमुख - श्री विनोद बिबवे**

❖ **रामकृष्ण शाखा**
२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख - **श्री. किशोर बेलोसे**
युवकप्रमुख - **श्री. शैलेश पैलवान**

❖ **स्वामी विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर,
वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. किरण सूर्यवंशी**
युवकप्रमुख - **श्री. संदीप जोगळे**

❖ **स्वामी अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय, बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. हर्षद कुलकर्णी**
युवकप्रमुख - **श्री. विनोद बिबवे**

❖ **स्वामी सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत, कर्वेनगर, पुणे -५२
शाखाप्रमुख - **श्री. कैलास अंडील**
युवकप्रमुख - **श्री. अजीत नाईक**

❖ **स्वामी योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे - ३०
शाखाप्रमुख - **श्री. प्रसाद गाडे**
युवकप्रमुख - **श्री. प्रशांत वेदपाठक**

❖ **स्वामी अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. स्वप्नील येनपुरे**
युवकप्रमुख - **श्री. मंदार रायरीकर**

❖ **स्वामी दयानंद सरस्वती शाखा**
विश्वकर्मा विद्यालय, अप्पर इंदिरानगर, पुणे-३७
शाखाप्रमुख - **श्री.प्रशांत कवडे**
युवकप्रमुख - **श्री.विनोद बिबवे**

❖ **स्वामी श्रद्धानंद शाखा**
महर्षि आण्णासाहेब शिंदे विद्यालय, घोरपडे पेठ, पुणे - ४२
शाखाप्रमुख - **श्री. निलेश धायरकर**
युवकप्रमुख - **श्री. संदीप मोरे**

❖ **स्वामी ब्रह्मानंद शाखा**
म.न.पा. शाळा क्र. १६८, हिंगणे खुर्द, पुणे-५१
शाखाप्रमुख - **श्री. धनंजय डोबे**
युवकप्रमुख - **श्री. अजीत नाईक**

❖ **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे-११
शाखाप्रमुख - **कु. गौरी बोर्लीकर**
युवतीप्रमुख - **श्रीमती विद्याताई किंजवडेकर**

❖ **आजोळ**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११
शाखाप्रमुख - **सौ. मंजुषाताई कुलकर्णी**
सहाय्यक - **कु. मधुमिता निलाखे**
(संपर्क - सोम. ते शुक्र. दु. २ ते ५)

❖ **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११
शाखाप्रमुख - **श्रीमती तस्लीम फणीबंद**
सहाय्यक - **सौ. प्रिती शहा, कु. हर्षदा फुलावरे**

❖ **शारदामणि महिला विभाग**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे-११
(संपर्क - सोम. ते शुक्र. स. १० ते १, शनि. ९ ते १०.३०)
महिला विभाग प्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे**
'पाकोळी' बालवाडी प्रमुख - **सौ. स्वातीताई कारेकर**
बचतगट समन्वयक - **सौ. वासंती कुलकर्णी**
नेत्रचिकित्सा प्रकल्प समन्वयक - **श्रीमती सुजाता कुदळे, सौ. सुरेखा बेंडाळे**
उद्योग शिक्षण - **सौ. विजयाताई कुलकर्णी, सौ. लता सत्तुर, सौ. माधुरी गुरव, सौ. नंदाताई बेंडखळे, सौ. सरिता गायकर**
ग्रंथालय - **श्रीमती नीला कुडलिगार**
साक्षरता प्रसार - **श्रीमती सुगंधा कबीर**

❖ **संगणक विभाग**
विभागप्रमुख - **श्री. अविनाश जोशी**
**श्री. निशिकांत वाईकर, ओंकार सोनावणे**
संपर्क - सोम. ते शु.क्र. दु. १२ ते सायं. ५

❖ **स्पर्धापरीक्षा व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र**
केंद्रप्रमुख - **सौ. सुवर्णा पाठक**
संपर्क - सोम. ते. शनिवार दु. १२ ते ५ सायं. ६ ते ८


❖ **फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प**
विभागप्रमुख - **श्री. सुनील कुलकर्णी**
**सहाय्यक - श्री. प्रशांत कवडे**

❖ **मृद्गंध गिरीभ्रमण गट-समन्वयक**
**श्री. चंदन हायगुंडे, श्री. निशिकांत वाईकर**

**या राष्ट्ररूपी जहाजाला आपल्याच प्रमादामुळे काही छिद्रे पडली आहेत.
आपण ती बुजवून टाकली पाहिजेत. हे कार्य आपल्या हृदयाचे रक्त देऊन आपण आनंदाने करू या.**

## प्रार्थना

नमस्कार देवा तुला आमुचा हा
करी आमुची मायभूमी महा ॥
हिचे रूप चैतन्यशाली दिसावे
जगाला कळावी हिची थोरवी ।
स्मरूनी हिच्या त्या कथा अन् व्यथाही
हिला न्यायचे रे पुन्हा वैभवी ।
अशा सर्व स्वप्नांस सामर्थ्य द्यावे
म्हणूनीच देवा नमस्कार हा ॥१॥







जनांचा प्रवाहो इथे चाललेला
सदा संस्कृतीच्या मुळापासुनी ।
पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या
आम्ही भिन्न ना त्यांचियापासुनी ।
तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला
तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥२॥



स्फुरो कल्पनाशक्ति अभ्यास-यत्ने
बनो शुद्ध बुद्धीही तेजस्विनी ।
शरीरास आरोग्य, संकल्प चित्ती
नि आत्म्यास इच्छा शुभाकांक्षिणी ।
पदी धैर्य, बाहूत शौर्य स्फुरावे,
घडावी विवेकी कृती-ध्यास हा ॥३॥



प्रभो तू चिदानंदरूपी असोनी
अणूरेणु ब्रह्मांड तू व्यापिले ।
तुझे अंश आम्ही, तुझ्या पूजनाचे
पहा दिव्य हे ध्येय स्वीकारले ।
पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ
प्रतिज्ञेस या तूचि साक्षी रहा ॥४॥

हे भारतीया, सीता-सावित्री-दमयंती या तुझ्या स्त्रियांचा आदर्श आहेत.

# असे उपक्रम... असे तास... असे दिवस

**संस्थेच्या इमारतीत चालणारे उपक्रम**

**सकाळी ६ ते दुपारी १२ वाजेपर्यंत**

१) व्यायामशाळा : सकाळी ६ ते ८
२) बालवाडी : सकाळी ८ ते दुपारी १२
३) अभ्यासिका : सकाळी ८ ते दुपारी १२

**दुपारी १२ ते सायं. ६ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) उद्योशिक्षण वर्ग, साक्षरता वर्ग : दुपारी १२ ते ४
२) आजोळ प्रकल्प (दुपारशाखा) : दुपारी २ ते ५
३) अभ्यासिका : दुपारी १२ ते सायंकाळी ६

**सायं. ६ ते रात्री १२ पर्यंत चालणारे उपक्रम**

१) शाखाविभाग : सायं. ६ ते रात्री ९
२) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग : सायं. ६ ते रात्री ८
३) अभ्यासिका : सायंकाळी ६ ते रात्री १२

**आठवड्यातून एक दिवस चालणारे उपक्रम**

१) माता बालसंगोपन केंद्र (आरोग्य केंद्र) - प्रत्येक बुधवार
२) कुटुंब सल्ला केंद्र - प्रत्येक मंगळवार

**सोमवार ते रविवार चालणारे उपक्रम**

१) दैनंदिन शाखा प्रकल्प*
२) अभ्यासिका
३) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग

**सोमवार ते शनिवार उपक्रम**

१) बालवाडी
२) उद्योग शिक्षण वर्ग
३) साक्षरता वर्ग
४) फिरती प्रयोगशाळा / ग्रामविकास प्रकल्प**
५) सेवावस्ती संस्कार वर्ग
६) कुटुंब सल्ला केंद्र
७) शिवणवर्ग
८) बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण
९) बचतगट
१०) नेत्रचिकित्सा विभाग

* हा प्रकल्प पुणे शहराच्या वेगवेगळ्या भागातील शाळांमध्ये संध्याकाळच्या वेळात चालतो.
** हा प्रकल्प मुळशी तसेच हवेली तालुक्यातील निवडलेल्या तेरा गावांमध्ये चालतो.
उर्वरित सर्व प्रकल्प संस्थेच्या इमारतीत त्यांच्या त्यांच्या वेळामध्ये चालतात.

**कार्यालयीन व्यवस्थापक**

श्री. शिवदास शंकर तथा आप्पासाहेब पोतदार,
**कार्यालय** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
सौ. वासंती कुलकर्णी, कु. स्मिता कुलकर्णी, श्रीमती प्रगती तांबट
(☎ २६१२१७०४, २६१३४३१०) **संपर्क** - सोमवार ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ५.३०

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं. ६.१५ ते रात्री ८.३०
शनिवार दु. ४.३० ते सायं. ७.३०
रविवार स. ७.३० ते १०.००

**हे भारतीया, हे विसरू नकोस भारत मातेसाठी वेदीवर बळी जाणारा म्हणूनच तुझा जन्म झाला आहे.**

SWAROOPWARDHINEE MONTHLY MAHMAR- 31296/13/1/2007-TC
PHM/SR/143/VII/07, PHM/SR/144/VII/07
Concessional postage under Regd No. L2/RNP / PNW / M-137/2008-2010
DT. of Publication - 25th every month Dt. of Posting - 25th at PSO Mkt'yd Pune



चिखलातिल नवपंकज बालक
भारतभूध्वजधारक आहे ।
विश्वविजयकामना मनातिल
पहिले पाऊल टाकित आहे ॥

वर्ष पाचवे, अंक पहिला

हे मासिक 'स्व'रूपवर्धिनी संस्थेच्या मालकीचे असून संस्थेच्या वतीने मुद्रक व प्रकाशक श्री. शिरीष रामचंद्र पटवर्धन यांनी प्रबोध उद्योग १२४८, शुक्रवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे छापून २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक पुणे-११ येथे प्रसिद्ध केले.